# आजचा सुधारक

विवेकवादी चिंतनाला वाहिलेले मराठी मासिक

वर्ष 26 विशेषांक जुलै 2015


## गोवंश हत्या बंदी कायदा : वस्तुस्थिती


| | | |
|---|---|---|
| 2 | गोहत्या बंदी कायद्याची गरज का?.................................... | *डॉ. शरद कुंटे* |
| 4 | गोवंश हत्या बंदी कायदा......................................... | *न्या. (निवृत्त) चंद्रशेखर धर्माधिकारी* |
| 12 | गोवधबंदीची चळवळ......................................... ... | *इरावती कर्वे* |
| 17 | गोहत्या बंदीः कशासाठी?. ................................ | *जगन फडणीस* |
| 25 | गोहत्या बंदी कायदा: एक पाउल मागे!................................ | *अशोक गर्दे* |
| 28 | गोहत्या बंदीः सावरकर आणि विवेकानंद....................... | *दत्तप्रसाद दाभोळकर* |
| 30 | गोवंश हत्याबंदी कायदा : वस्तुस्थिती आणि भूमिका ......... | *उमेश सूर्यवंशी* |
| 34 | राजकारणाच्या खेळात पवित्र गोमांस ............................ | *डॉ. राम पुनियानी* |
| 36 | गोवंश हत्याबंदी कायदा मागे घ्या! ............................... | *डॉ.सुलभा ब्रह्मे* |
| 38 | लोकशाही विरोधी मूलभूतहक्कविरोधी.......................... | *संपादकीय, मुक्तछंद* |
| 40 | बलवीर पुंज यांची गोहत्याबंदी............................. | *विप्लव मेश्राम* |
| 43 | अल्पसंख्याकांसोबत शेतकऱ्यांनाही मारणार काय?.................. | *सुरेश द्वादशीवार* |
| 47 | आता गोमाता केवळ पूजेपुरतीच उरणार का? ............ | *नीळकंठ रथ* |



संस्थापक – संपादक

**दि. य. देशपांडे**

(1918-2006)

कार्यकारी संपादक

**प्रभाकर नानावटी**



**संपर्कः**

प्रभाकर नानावटी pkn.ans@gmail.com 9503334895

भरत मोहनी bharat_i@yahoo.com 9822736808

aajacha.sudharak@gmail.com



www.aajachasudharak.in

# गोहत्या बंदी कायद्याची गरज का?

*डॉ .शरद कुंटे*

महाराष्ट्रात गोहत्या प्रतिबंधक कायद्यावर राष्ट्रपतींनी अलीकडेच स्वाक्षरी केली. हा कायदा शिवसेना-भाजप सरकार सत्तेवर असतानाच म्हणजे 15 वर्षांपूर्वीच राज्य शासनाने संमत करवून घेतला होता. पण राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीअभावी तो रखडला होता. त्या काळातील यूपीए शासनाचा या कायद्याला विरोध होता. या विधेयकावर टीका करणे काही राजकीय व्यक्तींना सोयीचे वाटते. पण आपला दृष्टिकोन राजकीय अथवा धार्मिक असा एकांगी न ठेवता तो आर्थिक, औद्योगिक, सामाजिक असा ठेवून विचार करता येणार नाही का?

**विधेयकाच्या बाजूचे आणि विरोधातले मुद्दे**

हे विधेयक अयोग्य आहे हे आर्थिक निकषावर मांडणारे लोक कोणते मुद्दे उपस्थित करतात.

1) गोमांस खाणारा खूप मोठा वर्ग देशात आहे. इतर कोणत्याही मांसापेक्षा ते स्वस्त आहे.

2) गोमांस निर्यातीतून मोठ्या प्रमाणावर परकीय चलन मिळते.

3) गोहत्या केली तरच चर्मोद्योग वाढतील.

4) गाय शेतकरी अगतिकतेतून विकतो. त्याला ती पोसणे परवडत नाही. अशा परिस्थितीत कसायाने तिला मारून मांस, रुधीर, चामडे इत्यादी उपयुक्त पदार्थ मिळवले तर बिघडते काय?

5) आधुनिक शेती ट्रॅक्टरसारख्या यांत्रिक उपकरणांच्या आधारे चालते, बैलाच्या आधारावर नाही. जुन्या पद्धतीची शेती परवडत नाही. आधुनिक पद्धतींचा वापर करण्यास पर्याय नाही.

**या विधेयकाच्या समर्थनात असलेले मुद्दे**

1) देशात मुळातच पशुधन कमी आहे. असे असताना पशूंची बेसुमार कत्तल चालू ठेवली तर अल्पावधीत देश पशुविहीन होऊन जाईल आणि पर्यावरणाचा समतोल ढासळेल.

2) गोमांस निर्यातीतून मिळणा-या उत्पन्नापेक्षा कितीतरी अधिक उत्पन्न दूध आणि त्याच्या उत्पादनांच्या निर्यातीतून मिळवता येते हे हॉलंड, इस्रायल यांसारख्या देशांनी दाखवून दिले आहे. पशूपासून एकदाच मांस मिळवता येते. पण दुग्धजन्य पदार्थ दीर्घकाळ मिळवता येतात.

3) शेतीला रासायनिक खते आणि कीटकनाशके यांपासून फार नुकसान होत आहे. शेती नापीक होणे हा दीर्घकालीन तोटा आहे. गेल्या काही वर्षांपासून आंबा, द्राक्ष यांसारखी फळे आणि भाजीपाला देखील यूरोपीय मार्केटमधून परत पाठवला जातो अथवा स्वीकारलाच जात नाही, कारण त्यात रासायनिक कीटकनाशकांचा अंश सापडतो. यामुळे शेती उद्योग आणि निर्यात व्यापार यास मोठा धोका निर्माण झाला आहे.

4) गेल्या काही वर्षांत शेतीचे तुकडे पडत चालले आहेत. वाढत्या लोकसंख्येमुळे शेतावर अवलंबून असलेल्यांची संख्या वाढत चालली आहे आणि त्याप्रमाणात शेती कुटुंबाच्या गरजा पूर्ण करू शकत नाही. शेतीतून येणा-या उत्पन्नाबरोबरच दुग्धोद्योगासारखे जोड उद्योगही शेतक-यांची गरज झाली आहे.

5) छोट्या शेतक-याला ट्रॅक्टर परवडत नाही. यांत्रिक शेती फक्त मोठ्या शेतक-यासच परवडते.

6) ट्रॅक्टर अथवा पाणी उपसा पंप डिझेलवर चालतात. सर्वच शेतक-यांनी ही उपकरणे वापरली तर आज 100 पट अधिक ट्रॅक्टर लागतील. तेवढे निर्माण करण्याची क्षमता नाही. भारत डिझेलच्या बाबतीत परावलंबी आहे. वाढती तेल आयात आपल्या अर्थव्यवस्थेला परवडणार नाही. त्यामुळे येणारे परावलंबित्व हे त्याहून अधिक धोक्याचे आहे.

7) यांत्रिक कत्तलखाने हे हवा व पाण्याचे प्रचंड प्रमाणावर प्रदूषण करतात. या कत्तलखान्यांना इतक्या प्रचंड प्रमाणावर पाणी लागते की तो पुरवठा करणे आज सर्वच आस्थापनांना परवडेनासे झाले आहे. गोवंश शेतीबरोबरच ग्रामीण भागातील वाहतुकीसाठी मोठ्या प्रमाणावर वापरला जातो. पशु हत्येमुळे हे प्रमाण कमी होत जाईल.

8) गोबर गॅस, कंपोस्ट खत, गोमूत्रापासून कीटकनाशके, औषधे, शेणापासून कागद, साबण आणि अनेक घरगुती उपयोगाच्या वस्तू बनवता येतात. पशुसंख्या वाढवली तर त्या सर्व उत्पादनांपासून ग्रामीण भागात फार मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण करता येतील.

**वास्तव काय आहे**?

महाराष्ट्रात यापूर्वीच पशु क्रूररता प्रतिबंधक कायदा होता. त्या आधारे पशुहत्या आणि वाहतूक यावर अनेक निर्बंध पूर्वीही होतेच. नवीन कायद्याने हे निर्बंध अधिक व्यापक झाले आहेत एवढेच. आपल्या राज्यात गोहत्या बंदीचे काय दुष्परिणाम होतील याची चर्चा करणा-यांनी आधी ज्या इतर राज्यांत गोहत्या बंदीचा कायदा लागू आहे तिथे काय परिस्थिती आहे हेही पाहिले तर वस्तुस्थिती समजण्यास अधिक मदत होईल. कानपूर आणि दिल्ली येथे देशातील सर्वाधिक चर्मोद्योग केंद्रित झाले आहेत. उत्तर प्रदेशात गोहत्या बंदी आहेच. तरी हे उद्योग तिथे फोफावले याचा अर्थ काय? मृत पशूंचे कातडे गोळा करण्याची या शहरातील उद्योेगांनी उत्तम व्यवस्था बसवली आहे. तसे महाराष्ट्रातही होऊ शकणार नाही का?

इस्रायलने आपल्याच देशातून गीर गायी नेल्या. तिथे त्यांच्यासाठी योग्य वातावरण राहील, उत्तम पशुखाद्य, पुरेसे पाणी, स्वच्छता, वैद्यकीय सुविधा यांची नीट व्यवस्था लावून दुधाचे उत्पादन प्रचंड वाढवले. तो वाळवंटी देशदेखील दूध आणि दुधाचे पदार्थ निर्यात करतो. आज आदर्श गोशालांच्या व्यवस्थापनासाठी हॉलंड किंवा इस्रायलचे तज्ज्ञ बोलावण्याची आपल्यावर वेळ का येते? आपण हे संशोधन का करू शकत नाही? ओला चारा, कडबा कुटी किंवा पेंड या पारंपरिक पशुखाद्यांवरच आपण आजही अवलंबून आहोत. जगातल्या बहुतेक देशांत सूक्ष्मजीव प्रक्रियेने उच्च पोषण मूल्ये असलेले पशुखाद्य तयार करण्याचे कारखाने प्रगत झाले आहेत. त्या आहाराने गायी चांगल्या धष्टपुष्ट होतात, अधिक दूध देतात, पशुखाद्याची किंमतही तुलनेने खूप कमी होते. आपण अशा प्रकारच्या संशोधनापासून का दूर राहिलो?

दूध, तूप, लोणी, शेण, मूत्र ही गोधनापासून मिळणारी मुख्य उत्पादने आहेत. यापैकी प्रत्येकावर प्रक्रिया करून पाश्चात्त्य देशांत शेकडो पदार्थ बनवतात आणि त्यांची निर्यात करतात. हे प्रक्रिया उद्योग आपल्याकडे फारसे प्रगत झालेलेच नाहीत. अगदी भाकड गाय देखील शेण आणि मूत्र देतेच. त्यापासून गॅसवर खत तयार करण्याच्या उद्योगांतही अधिक प्रयोग व्हायला हवेत.

नॅडॅप पद्धतीने शेणापासून खत तयार करण्याचे प्रयोग महाराष्ट्राच्या विविध भागात चांगले लोकप्रिय होत आहेत. शेण, पालापाचोळा आणि अन्य ओला कचरा कुजवून त्यावर सूक्ष्म जीव प्रक्रिया केली जाते. या पद्धतीने खत पुष्कळ मोठ्या प्रमाणात, उत्तम दर्जाचे आणि कमी किमतीचे उपलब्ध होते. गोमूत्र अर्कापासून अनेक प्रकारची कीडनाशके तयार करता येतात. यामुळे पर्यावरणाचे प्रश्न तर निर्माण होत नाहीतच; पण महागड्या कीटकनाशकांवर अवलंबून राहण्याचीही वेळ येत नाही.

देशातल्या जवळजवळ 600 गोशालांमध्ये आता शेण आणि मूत्र यापासून विविध औषधे आणि अन्य जीवनोपयोगी वस्तू तयार करण्याचे यशस्वी प्रयोग होत आहेत. महाराष्ट्रातील अकोला आणि नागपूरजवळच्या देवळापार येथल्या गोशालेने अशा शंभराहून अधिक वस्तूंची निर्मिती केली आहे. गोमूत्र अर्काचा कॅन्सरवरील उपचारांमध्ये उपयोग करण्याच्या पद्धतींची दोन अमेरिकन, एक यूरोपियन आणि

एक चिनी पेटंट देवलापारला मिळाले आहे. याचा अर्थ या प्रकारांनी ज्या कंपन्या औषधे बनवतील त्यांना मोठी धनराशी स्वामित्व हक्क म्हणून देवळापार गोशालेला द्यावी लागेल. या सर्व संशोधनांची दिशा एकच आहे की एक भाकड गाय बाळगणा-या शेतक-याला देखील गायीचे शेण आणि मूत्र यापासून मिळणारे उत्पन्न हे तिचा चारा आणि औषधोपचाराच्या खर्चापेक्षा अधिक असले पाहिजे. गाय ही शेतक-याला ओझे न वाटता आर्थिक आधार वाटेल.

गोहत्याबंदी हा विषय घटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये आहे .आजवर सुमारे 20 वेगवेगळ्या केसेसमध्ये उच्च आणि सर्वोच्च न्यायालयांनी गोहत्या बंदी होणे घटनेस धरून आहे; इतकेच नव्हे तर भारतीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने आवश्यक आहे असे निर्णय दिले आहेत .ज्या-ज्या राज्यांनी आजवर गोहत्या बंदीचा कायदा केला, त्या-त्या ठिकाणी हा कायदा रोखण्यासाठी हितसंबंधींनी कोर्टबाजी केलीच आहे .पण एकाही ठिकाणी न्यायालयाने या हरकतींना थारा दिलेला नाही हे लक्षात घेतले पाहिजे. दुसरे असे की फक्त भाजपशासित राज्यांनीच गोहत्या बंदी कायदा राबवला आहे असे नाही .हरियाणा आणि अरुणाचल प्रदेशमध्ये भाजप सरकार नव्हते तेव्हाही हा कायदा पारित करण्यात आला आहे.

'लोकमत'च्या सौजन्याने

●●●

# गोवंश हत्या बंदी कायदा

*न्या. (निवृत्त) चंद्रशेखर धर्माधिकारी*

महाराष्ट्रात गोवधबंदीचा जो कायदा अस्तित्वात होता. पण तो प्राणवान होत नव्हता, कारण तो अपूर्ण होता. बैल व इतर गोवंश यांच्या गर्दीत गाईची घुसखोरी करून गोहत्या होतच असे. एरवीही तो कायदा सर्वंकष व संपूर्ण नव्हता. असे अनुभवास येते की, भारतीय विधानसभांना ज्यात चोरावाटा नसतील असा कायदा करण्याची इच्छाच नाही. जेणेकरून कायदा केला तरी ज्यांना गोहत्या करायची आहे त्या कसायांना त्यातून 'चोरवाटा' काढता येतील. भारतीय संविधान हे जगातले एकमेव संविधान आहे की, ज्यात कलम 48 मध्ये असा संकल्प करण्यात आला आहे, ''आधुनिक व शास्त्रीय रीतीने कृषी व पशुसंवर्धन यांची सुसूत्र व्यवस्था लावण्यासाठी राज्य प्रयत्नशील राहील आणि विशेषत: गाई व वासरे आणि दुभती व जुंपणीची गुरे यांच्या जातींचे जतन करणे व त्या सुधारणे आणि त्यांच्या कत्तलीस मनाई करणे याकरिता उपाययोजना करील.'' तर कलम 51 क जे नागरिकांच्या मूलभूत कर्तव्याबाबतचे आहे त्यात असे नमूद करण्यात आले आहे की, सजीव प्राण्याबद्दल करुणाबुद्धी बाळगणे हे प्रत्येक भारतीय नागरिकाचे कर्तव्य आहे. यावरून हे स्पष्ट होते की, हा प्रश्न भावनिक व धार्मिक नाही. तर त्याचा भारतातील कृषि जीवनाशी व संवैधानिक मूल्याशी घनिष्ठ संबंध आहे.

शेतक-यांच्या आत्महत्यांबाबत जे सर्वेक्षण करण्यात आले आहे त्यावरून हे स्पष्ट झाले आहे की, ज्या शेतक-यांजवळ गोवंशाचे पशुधन होते, त्यांनी आत्महत्या केलेल्या नाहीत. दुर्दैवाने या कृषिप्रधान देशाच्या केंद्रीय कृषिमंत्रालयाने जे काही तांत्रिक मुद्दे उपस्थित करून या विधेयकास विरोध दर्शविला होता ती कारणे टेक्निकल म्हणजे तांत्रिक होती. खरे तर आज या विधेयकाच्या विरोधातील सर्वांची उत्तरे सर्वोच्च न्यायालयाच्या सात सदस्यीय न्यायपीठाच्या निर्णयात देण्यात आलेली आहेत. तरी ही किंवा म्हणूनच 14 जून 2006 च्या पत्रान्वये केंद्रीय गृहविभागाने महाराष्ट्रशासनाच्या मुख्य सचिवास प्रश्न विचारून विचारणा केली की, आता अंदाजे 11

वर्षानंतर महाराष्ट्र शासनास या विधेयकाचा पाठपुरावा करण्यात स्वारस्य आहे का? याचे उत्तरही महाराष्ट्र शासनाने दिले नाही. त्यानंतर ऑक्टोबर 2006 मध्ये या प्रश्नावर संबंधित विभागाने टिप्पणी तयार केली व त्यात कारणमीमांसा करून अशी नोंद केली की, ''राज्यशासनास सदर दुरुस्ती-विधेयकांमध्ये अद्यापही स्वारस्य आहे,'' व सदर टिप्पणी त्या विभागाचे मंत्री मा. अनीस अहमद यांच्याकडे सादर केली. या मंत्रिमहोदयांनी काहीही कारण न देता त्यावर असा शेरा मारला की, ''विधेयकाचा पुनर्विचार करणे योग्य'' व त्यावर पुन्हा काहीही कारण न देता मुख्यमंत्रांनी 26 डिसेंबर 2006 ला सही केली. त्यानुसार 3 जानेवारी 2007 च्या पत्रान्वये राष्ट्रपतींच्या कार्यालयास कळविण्यात आले की, 'सदर विधेयकाचा पुनर्विचार करण्याची प्रक्रिया सुरू आहे.' परंतु त्यानंतर प्रक्रिया सुरू झालीच नाही. कारण अशा विधेयकाचा पुनर्विचार करण्याचा अधिकार शासनास नाही हे विधेयक विधानमंडळाच्या दोन्ही गृहांनी पारित केले आहे व त्यानंतर पुनर्विचार व्हावयाचा असेल तर तो विधानमंडळासच करता येईल. आता 19 वर्षांचा कालावधी लोटल्यानंतर हा कायदा अंमलात येत आहे, हेही नसे थोडके. तरीही विरोधासाठी विरोध करणे कितपत योग्य आहे याचा विचार करावयास हवा. आणि तेही भारताच्या व महाराष्ट्राच्या लागून असलेल्या प्रदेशात अनेक वर्षापासून हा कायदा अस्तित्वात असताना. याचाही विचार विरोधकांनी गांभीर्याने करावयास हवा. आता या कायद्याला 19 वर्षे का लागली या इतिहासाचा अभ्यास वर्तमानात कर्तव्यबुद्धीने जगण्यासाठी व भविष्यात या कायद्याची सशक्तपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने व्हावयास हवा. कारण आपल्याला कायद्याचे राज्य हवे आहे. व सर्वोच्च न्यायालयाने घोषित केलेला कायदा संविधानाच्या कलम 141 अन्वये सर्वांवर बंधनकारक आहे व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयात सर्व प्रश्नांचा विचार करण्यात आलेला आहे.

सरकारी आकडे बघितले तरी महाराष्ट्रात आवश्यकतेपेक्षा गोवंशीय पशुधन व ब-याच कमी संख्येत उपलब्ध आहे. आहेत त्या बैलांना आंधळे व लंगडे करून ते शेतीसाठी उपयुक्त नाहीत असे ठरविले जाते व त्यांची सर्रास कत्तल होते. संपूर्ण गोवंशहत्याबंदीबाबतचे कायदे भारतातील 13 प्रदेशात अंमलात आहेत. हे प्रदेश आहेत गुजरात, राजस्थान, मध्यप्रदेश, छत्तीसगड, पंजाब, हरयाणा, हिमाचल प्रदेश, जम्मू आणि काश्मीर, उत्तर प्रदेश, उत्तरांचल, बिहार, झारखंड व दिल्ली. यांतील महाराष्ट्राला लागून असलेल्या प्रदेशांतील गोवंशातील प्राणी महाराष्ट्रात आणण्यात येतात व त्यांची कत्तल केली जाते. परिणामी त्याही प्रांतातील गोवंशहत्याबंदी-कायद्याचे उल्लंघन करण्यास महाराष्ट्र प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या मदत करत होता. सर्वोच्च न्यायालयाच्या सात सदस्यीय न्यायपीठाने त्याच्या निकालात स्पष्ट म्हटले आहे की शेण व मूत्र यांचा व्यवस्थित उपयोग केला गेला आणि बायोगॅस, ऑरगॅनिक शेती, इंधन शेण व गोमूत्रापासून तयार होणारी औषधे यांचा विचार केला तर गोवंशातील प्राणी कुठल्याही वयात उपयुक्तच असतो.

एवढेच नव्हे, तर सर्वोच्च न्यायालयाच्या सात न्यायमूर्तींनी 2005 साली दिलेल्या निकालात असे म्हटले आहे की 'गाय व बैल यांचे शेण कोहिनूर हिऱ्यापेक्षा मूल्यवान आहे'. शेण व गोमूत्र यापासून जे कम्पोस्ट खत निर्माण होते, त्यामुळे धान्याचे उत्पादन तर वाढतेच पण जमिनीचा कस सुधारतो व धान्याची गुणवत्ताही वृद्धिंगत होते. या बाबींचा विचार केला तर संविधानाने जीविताचा जो मूलभूत अधिकार नागरिकास प्रदान केला आहे, त्याचे संरक्षणही होते, कारण सकस आहार हा जीविताच्या अधिकाराचा अविभाज्य भाग आहे. व त्या आधाराचे अधिष्ठान शेण व गोमूत्र यापासून तयार होणारे खत आहे. आता हे वैज्ञानिकदृष्टया प्रयोगान्ती सिद्ध झाले आहे

की गोवंश हा मरेपर्यंत उपयोगी असतो, कारण त्यांच्याद्वारा जे शेण व गोमूत्र मिळते व औषधादी पदार्थ निर्माण होतात ते मानवाच्या दृष्टीने जीवनोपयोगी आहेत.

मुस्लिम-कायद्यात किंवा धर्मात असे कुठेही म्हटलेले नाही की 'बकरी ईद'च्या दिवशी बैलाचीच कुर्बानी दिली पाहिजे असा स्पष्ट निकाल सुप्रीम कोर्टाने 1995 सालीच दिला होता. त्यात म्हटले आहे की बकरी ईदला सशक्त प्राण्याचीच कत्तल करून कुर्बानी द्यावी असे मुस्लिम धर्मात मानले असले तरी गाय, बैल व गोवंशातील प्राणी यांची, म्हणजे विशिष्ट प्राण्याचीच कुर्बानी दिली पाहिजे, असे धर्म म्हणत नाही. तसा धर्माचा आदेश नाही. आजवर महाराष्ट्रात बकरी ईदच्या दिवशी लाखांनी सशक्त बैलांची कुर्बानीच्या नावाखाली कत्तल होत आहे. आणि तीही वाटेल तिथे. हे बैल कत्तलीसाठी उपयुक्त आहेत, असे प्रमाणपत्र डॉक्टर व अधिका-यांना द्यावेच लागते. कारण कसायांची सुरी मानेवार फिरेल व आपलीच कत्तल होईल अशी त्यांना भीती असते. विशिष्ट प्राण्याचे मांस भक्षण करण्याचा मूलभूत अधिकार कुणालाही असू शकत नाही. एरवी ज्या नरभक्षक जाति-जमाती होत्या त्यांचा तो अधिकार मान्य करायचा का? याचाही विचार करावा लागेल. पाश्चात्त्य विश्वात असा एक देश आहे जेथे नरभक्षक जमात आहे. त्या देशाचे अर्थकारण बिघडले. तेव्हा त्यांनी तेथील शासनास कळविले की पर्यटन वाढावे व त्याद्वारे उत्पन्नांत भर पडावी. म्हणून ते पुन्हा नरभक्षण करण्यास तयार आहेत. वाटल्यास ते मेलेल्या माणसांचे भक्षण करतील व ते बघायला जगातील अनेक लोक पर्यटक बनून आपल्या देशात येतील व त्यायोगे राष्ट्रीय उत्पन्नही वाढेल व त्यांच्या आहाराचाही प्रश्न सुटेल. असे होऊ द्यायचे काय याचाही विचार तर करावाच लागेल ना? शेवटी सर्व बाबींशी हक्क व अर्थकारण ते अमानवीय असले तरी, बलवत्तर ठरू द्यायचे काय? हाच यक्ष प्रश्न आहे. एका वंशातील प्राण्यांच्या कत्तलीवर प्रतिबंध घातल्याने सर्वच पौष्टिक अन्नावर बंदी येते काय? याही प्रश्नांची मीमांसा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयात करण्यात आलेली आहे.

शेतक-यांच्या आत्महत्यांचा अभ्यास केला तर असे दिसून येते की, ज्यांच्याकडे गाय आहे, स्वत:ची बैलजोडी आहे, त्यांनी आत्महत्या केल्या नाहीत. एकीकडे आत्महत्या करणा-या शेतक-यांच्या कुटुंबीयांना गाय व बैलजोडी देण्याची गोष्ट शासन करते व दुसरीकडे सशक्त बैलांची कत्तल होऊ देते आणि कत्तलीसाठी ते योग्य व्हावेत म्हणून बैलांना लंगडे, आंधळे करायचे हे कुठवर चालणार होते? कुर्बानी ती असते, जेव्हा व्यक्ती आपल्या आत्म्यांचा अंश समाजाप्रती, देव व अल्लाप्रती समर्पित करीत असतो. उपयुक्त प्राण्यांची कत्तल करून कुर्बानी देता येत नाही, हेही कळू नये हीच खरी शोकांतिका आहे. आपल्या धर्माबद्दल इतर धर्मीयांना आदर वाटावा असे वाटत असेल, तर इतर धर्मीयांच्याही भावनेचा आदर करणे शिकावयास हवे ना? कारण तेच सेक्युलर, म्हणजे धर्मनिरपेक्षवृत्तीचे अधिष्ठान आहे. यात कृपया राजकारण किंवा पक्षकारण आणू नये. तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचे वाचन व अध्ययन सर्व मिडिया चॅनेलनी व वर्तमानपत्रांनी करावे अशी नम्र विनंती आहे.

शहरातील सुबुद्ध समाजासाठी शेतक-यांच्या आत्महत्यांचा प्रश्न ही फक्त वर्तमानपत्रांतील बातमी असते. क्रिकेट मॅचमधील रनस् म्हणजे धावा मोजण्यासारखेच ते दैनंदिन वृत्त असते. पण शेतक-याला आत्महत्या का कराव्या लागतात व त्यासाठी आपण सर्व कितपत जबाबदार आहोत, याचा साधा विचारही आपण करू इच्छित नाही हीच या प्रश्नाची खरी शोकांतिका आहे. ज्या व्यवसायाच्या भरवशावर 98 टक्के लोकांचे पोट भरले जाते,

त्याची उपेक्षा करणे म्हणजे आत्मघात आहे, याची साधी जाणीवही दिसून येत नाही. महागाई वाढली म्हणून ‘महागाई’ भत्ता वाढवून घेण्यासाठी आंदोलन करणारे सर्वच स्तरांतील पगारदार सर्वच एकत्रित होऊन, जेव्हा धान्याचे भाव कमी करावेत, म्हणून आंदोलन करतात, रस्त्यावर उतरतात तेव्हा ते हे विसरतात की संपूर्ण समाजाने शेतकर्‍यांच्या विरुद्ध केलेले ते कटकारस्थान असते. कारण इतर सर्व गोष्टी त्याला उच्च भावातच खरेदी कराव्या लागतात. व त्याच्या उत्पादनाचे भाव मात्र सारखे कमी करावेत अशी ओरड केली जाते, तेव्हा त्याचे जगणेही हराम होते याची साधी जाणीवही तथाकथित ‘शहरी’ लोकात दिसून येत नाही. त्यामुळे शेतक-यांच्या आत्महत्येचा प्रश्न फक्त वरवरचा नाही. फक्त हळहळ व्यक्त करून तो संपणार नाही. याचा गांभीर्याने व खोलात जाऊन विचार करण्याची गरज आहे. प्रसिद्ध दार्शनिक खलील जिब्रान यांनी म्हटल्याप्रमाणे ‘ज्याप्रमाणे आपणा सर्वांच्या अनाकलनीय दुर्लक्षाशिवाय शेतक-यांच्या आत्महत्या होत नसतात. एका अर्थाने ती आपली सर्वांची मूक संमतीच असते. याची जाणीव ठेवल्याशिवाय ह्या प्रश्नाचे उत्तर सापडणार नाही.

शेतीच्या मदतीनेच पाषाण युगात राहणारा मानवप्राणी ‘गृहस्थ’ झाला. त्याने आपले ‘घर’ थाटले. ‘कुटुंब’ व कौटुंबिक भावना प्रस्थापित केली, ती शेतीच्याच सहाय्याने. म्हणूनच मानवीय संस्कृती व सभ्यता यांचा खरा अधिष्ठाता शेतकरीच आहे. ‘इंडियाज कल्चर इज अग्रिकल्चर’ असे आपण नुसते म्हणतो. पण कृती मात्र त्याच्या विरुद्ध असते. कुठल्याही देशाला संपन्न व यशस्वी होण्यासाठी तीन मार्ग आहेत.

1) युद्ध - ज्याने इतरांना पराजित करुन त्यांचे धन लुबाडले जाते,

2) व्यापार - ज्यात प्रमाणिपणापेक्षा लबाडीच अधिक असते.

आम्ही कधी गोरा बाजार पाहिलाच नाही. तर तो सदैव कमी-अधिक प्रमाणात काळाबाजारच होता, ‘ऑनेस्टी इज द बेस्ट पॉलिसी’ असे त्याचे धोरण किंवा तत्त्वज्ञान असते. आणि ‘पॉलिसी’ या शब्दाचा सामान्य माणसांच्या शब्दात सांगायचे तर साधासोपा अर्थ आहे. ज्यात ‘खोटे’ हे खरे आहे हे भासवून सामान्यजनांना लुबाडण्यात येते. त्यालाच तर पॉलिसी म्हणतात ना? आणि तिसरा व सर्वोत्द्धष्ट मार्ग शेती आहे. असे मानण्यात आले होते. जमिनीत एक बीज पेरले, त्याची काळजी घेतली तर त्या बदल्यात अनेक धान्यांची बीजे मिळत असतात व त्यामुळे संपन्नेत भर पडत असते. असा संपन्न होण्याचा जो सर्वोत्कृष्ट मार्ग होता, त्याला आज प्रतिष्ठाच उरली नाही, हेच खरे दु:ख आहे. आता धान्याची अगर अन्नधान्याची पैदास करण्याऐवजी पैशाचीच पैदास करणारे व तेही वाटेल त्या मार्गाने आणि याची संख्या वाढते आहे व तेच भाग्यवान व सुप्रतिष्ठित मानले जातात. शेतीच्या व्यवसायाला प्रतिष्ठाच उरली नाही आणि जेथे उत्पादक-परिश्रमाला प्रतिष्ठा नसते तेथे ‘बेश्रमांना’ किंवा बेशरम लोकांनाचा प्रतिष्ठा प्राप्त होत असते. परंतु तरीही शेतक-याने अन्य उपाय नाही म्हणूनच शेती करावी, असे हे दुष्ट चक्र आहे.

राहुल गांधी विदर्भातील एका खेड्यात शेतक-याच्या घरी गेले होते. त्या शेतक-याला तीन मुले होती. राहूल गांधींनी त्यांना विचारले की ते भावी आयुष्यात काय होऊ इच्छितात व काय करू इच्छितात. सर्वांनी एकमुखाने उत्तर दिले की शेती सोडून अन्य कुठलाही व्यवसाय ते करू इच्छितात. व त्यासाठी शेतीचा एक तुकडा विकून शासकीय अधिका-यांना पैसे खाऊ घालून, भ्रष्टाचाराच्या मार्गाने कुठली तरी सरकारी नोकरी ते प्राप्त करू इच्छितात. कारण त्यांच्यासमोर त्यांच्या आई-वडिलांची हलाखीची स्थिती प्रत्यक्षात उभी होती. आजही फक्त

मूर्ख शेतकरीच अन्नधान्याची पेरणी करतो. श्रीमंत व प्रतिष्ठित शेतकरी तर पैशाचीच पैदास करतात. त्याच धान्याची व फळांचीच ते पैदास करू इच्छितात. ज्याच्यापासून मद्यनिर्मिती होत असते व भारतात आजमितीला मद्याची सर्वाधिक उत्पत्ती करणारा प्रदेश म्हणून महाराष्ट्राची ओळख आहे. आता अन्नधान्य व फळे याची उत्पत्तीही फक्त मद्यनिर्मितीसाठीच व्हावी अशी शासकीय योजना आहे. त्यातही वकील, डॉक्टर, आदि प्रतिष्ठित व्यावसायिक हे त्यांच्या सेवेचे मूल्य ते स्वतः ठरवितात, पण शेतक-याला त्यांच्या उत्पादनाचा खर्च व पिकाचा भावही ठरविण्याचा अधिकार नाही, ते सारे मध्यस्थ दलाल व शासन ठरविते. ज्यांना अस्तित्वात असलेली परिस्थिती माहितही नसते. हा कुठला न्याय आहे? याचा साधा विचारही आम्ही करू शकत नाही. आता शेतक-याला शेतीच्या उत्पन्नाचा उचित भाव तर हवाच आहे, पण त्याखेरीज त्याला त्याच्या व्यवसायाला प्रतिष्ठाही हवी आहे. त्याला केवळ सहानुभूती नको आहे, हक्क हवे आहेत. प्रतिष्ठा हवी आहे. म्हणूनच तर हिंदीचे प्रसिद्ध कवी भवानीप्रसाद मिश्र यांनी म्हटले आहे

दो सूत कांतो, चार दाने उपजाओ
कि तुम खाते पहनते हो, जरासी शर्म तो खाओ!

पण आम्हाला आता कशाचीच लाज वाटत नाही. हेच तर खरे दुर्दैव आहे.

पूर्वी बियाणे घरचे असे, ते गावचे लोक परस्परांत वाटून घेत. खतही घरचेच असे कारण पशुधन हे शेतक-यांचे धन होते. स्वतःची बैलजोडी असे. त्यामुळे टॅक्क्टर, बी-बियाणे, खते यासाठी कर्ज घ्यावे लागत नसे. शेतात पिकले नाही तर गाईचे दूध विकून अन्य छोटे छोटे गृहउद्योग करून किंवा शेणगोमुत्राचा उपयोग करुन जगण्याची सोय होती. घरच्या घरी दोर किंवा शेतीला उपयुक्त अन्य वस्तूंची निर्मिती होत असे. घरी उखळ होते, जाते होते, घरच्या महिला गृहोपयोगी वस्तू सामुदायिक श्रमांतून निर्माण करीत. लोणची, शेवया तयार करणे हा सांस्कृतिक कार्यक्रम होता. आता नायलॉन दोर आले. ब्रॅन्डेड पिकल आले व विसर पडला की फक्त मदरचे नाव दिल्याने आईच्या हातच्या लोणच्याची त्यास चव प्राप्त होत नसते. वस्तूला चव येण्यासाठी मायेचे प्रेम आवश्यक असते. ज्याचे मुल्य असते व त्यास फक्त किंमत नसते. ऑस्कर वाईल्डचे प्रसिद्ध वाक्य आहे की, 'ज्याला सर्व वस्तूंची फक्त किंमतच कळते पण मूल्य कळत नाही त्याला विक्षिप्त माणूस म्हणतात'. अशा विक्षिप्त अर्थकारणात शेतक-याने जगावे कसे व त्यास जगावेसे का वाटावे हाच खरा यक्षप्रश्न आहे. महात्मा गांधी म्हणायचे, योजना पाण्यातील वलयासारखी असावी. पाण्यात दगड टाकला तर सर्वप्रथम छोटेसे वलय तयार होते, मग त्यातून त्याहून मोठे व नंतर त्यातून मोठाली वलये निर्माण होतात. म्हणून पंचवार्षिक योजनेचे पहिले वलय गृहोद्योग, मग ग्रामोद्योग, नंतर छोटे उद्योग व शेवटी स्वदेशीच मोठे उद्योग, असा प्रवास असावा लागतो. हेच पंचायती राज्याचे अधिष्ठान आहे. पण आज सारेच उफराटे होते आहे. लोकांना आता ताजे अन्नच खाण्याची सवय उरली नाही. मुंबईत व इतर मोठ्या शहरांत रविवारी सायंकाळी घरी स्वयंपाकच होत नाही. आईलाही सुट्टी हवी असते. चंगळवादी संस्कृति फोफावत आहे. म्हणून गगनचुंबी इमारती उभ्या झाल्यात. परिणामी इमारतींची उंची वाढते आहे पण माणसे ठेंगणी होत आहेत. रस्त्यांची रुंदी वाढते आहे पण मने अरुंद होत आहेत. माणसाला माणूस नकोसा झाला आहे, भौगोलिक शेजार उरला पण शेजा-यांतील संबंध संपले आहेत. सारे संबंध रिफ्रिजरेटरमध्ये गोठले आहेत. अंकल चिप्सचा जमाना आहे. ज्यात चिप्स कमी व हवाच

जास्त असते. त्यात धान्य व खाण्याच्या वस्तू परदेशातून आयात होत आहेत. शेतक-यांचा जोडधंदा काढून घेतल्यामुळे शेतीत काम नसेल तेव्हा त्याने काय करायचे, कसे जगायचे हाच प्रश्न उत्पन्न होतो आहे. पूर्वी ‘कापूस ते कापड’ असा स्वावलंबनाचा प्रवास होता. घरात बाजाराची मूल्ये शिरली नव्हती. एका सर्वेक्षणावरुन हे उघड झाले आहे की, ज्या शेतक-यांजवळ त्याच्या मालकीची बैलजोडी होती, त्याच्या घरी गाय होती व घरचेच बियाणे व खत होते त्या शेतक-याला आत्महत्या करावी लागली नाही. पशुधन बेदखल होणे हे कृषींसंस्कृतींचे दुर्दैव आहे. गाय व बैल मरेपर्यंत उपयोगीच असतात. त्यांचे शेण खतासाठी, मूत्र फवारणीसाठी वापरले जाते. त्यापासून औषधे तयार करण्यात येतात. ‘कॅन्सर’सारख्या रोगावरही त्या औषधांचा प्रयोग केला जातो. पूर्वीच्या कौटुंबिक व्यवस्थेत रक्ताची नाती होती. तशीच मानलेली स्वायत्त नाती होती. प्रत्येक घर कुठल्या तरी नात्याने जोडलेले असे. याखेरीज परिवारांत प्राणी व वनस्पतीही सामील होते. भारत हा एकमेव देश आहे येथे नदीला मातेचा मान आहे, पर्वत पिता आहे. भूमीही भूमाता आहे. येथे तुळशी, वड, पिंपळ आदी वृक्षांची पूजा केली जाते. एवढेच नव्हे, नंदीबैलही देवता आहे आणि गाई-बैलही पूजनीय मानले गेले ही त्यागावर आधारित संस्कृती संपून आता चंगळवादावर आधारित ‘भोगसंस्कृती’ वाढली. त्यामुळे सर्वत्र मनीपॉवर, मसल पॉवर व माफिया पॉवर, पॉवरफुल होत आहेत. पण ज्यांची पूजा आम्ही करतो, त्यांना जीवित ठेवण्यासाठी आम्ही काहीच करीत नाही व पैसा तर लबाड असतो. त्याची खरी किंमत सारखी बदलत असते. याखेरीज सत्तेचा दुरुपयोग व भ्रष्टाचार हे शिष्टाचार ठरत आहेत. शेतक-यांच्या भल्यासाठी जेवढ्या योजना अंमलात आल्या, जेवढे पैसे दिले गेले, त्यांपैकी दहा टक्केही त्यांच्यापर्यंत पोहचत नाहीत, असे पंतप्रधान राजीव गांधी म्हणाले होते. नुकतेच महाराष्ट्रात गायींचे वाटप करण्यात आले असे म्हणतात. पण त्यातील एक टक्का गायीही शेतक-यांना मिळाल्या नाहीत सा-या राजकारणांतील व्यक्तींनी वाटून घेतल्या. सरकारी कर्जे हे फार गुंतागुंतीचे असे गौडबंगाल आहे. तेही वेळेवर व गरजेप्रमाणे मिळत नाही. म्हणून खाजगी सावकारांचीच चलती आहे. देशात बेरोजगारी आहे, पण शेतीसाठी मजूर मिळत नाही, सर्वांना व्हाईट कॉलर कामच हवे. जेथे नियमित दरमहा पगार मिळतो व काम न केले तरी चालते. याखेरीज पगाराव्यतिरिक्त भरपूर उपरची कमाई असते. पैसा, व्यसने व शानशौकी यांनाच प्रतिष्ठा असल्याने मंदिरे जशी वैभवाची प्रतीके ठरत आहेत, तशीच लग्न आदी सर्वच समारंभ वैभवाची प्रतीके आहेत, आणि या सर्व दुष्टचक्रात शेतकरी सापडला आहे. त्यामुळे प्रतिष्ठेचे व सुखाचे जीवनच जर प्राप्त होत नसेल तर त्याच्यापुढे आत्महत्या करण्यापलिकडे पर्यायच उरत नाही. कारण तो आता विधाता नाही, फक्त विषय उरला आहे. विधाते वेगळेच आहेत. धान्य धारणा याऐवजी धन धारणाच फोफावत आहे व त्यांचीच प्रतिष्ठा आहे.

आचार्य विनोबाजी म्हणतात की, ‘‘शेती हे ब्रह्मकर्म आहे व शेतकरी ब्रह्मर्षी आहे. शेती हीच खरी उपासना आहे’ पण आज त्या ब्रह्मर्षीच्या नशीबी अगदी वेगळया प्रकारच्या त्रिवेणी संगमावर नित्य जाण्याची वेळ आली आहे. तो त्रिवेणी संगम आहे, ‘‘खुर्ची, थैली आणि टोपी’’ खुर्ची अधिका-यांची, थैली दलालांची किंवा ठेकेदारांची तर टोपी पुढा-यांची. अशा परिस्थितीत त्याने का जगावे? व कसे जगावे हाच प्रश्न आहे. त्याने शोषण केव्हापर्यंत व का सहन करावे?

पूर्वी असे म्हणत असत की ब्रह्मर्षी शेतकरी अधिक पैसे मिळतील म्हणून धान्याऐवजी अफू, गांजा व तंबाखूची शेती करीत नसे. व्यसनांची शेती करणे त्याला महापातक वाटत असे. आज महाराष्ट्रातील खेड्यात शहरातील उच्चभ्रू माणूस गेला की यजमान प्रश्न विचारतो? ज्वारीची की बाजरीची चालेल? यजमान म्हणतो कुठलीही भाकरी चालेल. तेव्हा यजमान स्पष्ट करीत विचारतो की भाकरी नव्हे, दारू ज्वारीची की बाजरीची हवी आहे. पूर्वी शेतकरी ज्यांनी त्याला जीवनभर साथ दिली, जे त्याच्या उदरभरणाचे साधन होते, ती गाय अगर बैलही तो प्राणी मेल्यावरही त्यांचे कलेवर विकत नसे तर त्यांची पूजा करून त्यांना शेतात पुरत असे. गाय किंवा बैल कसायाला विकले जात नसत. आज तर येथे मुलाबाळांनाच पोसणे परवडत नाही तेथे गाय बैल पोसले तर चारा व पाणी याच्या अभावामुळे कसे परवडावे म्हणून कसायाला विकले जातात. आणि तेही सर्रास! ह्याला मी कृषी संस्कृतीचे मरण म्हणतो. पण आज शेतक-याचे जीवनच इतके कठीण व भ्रष्ट झाले आहे की, त्यांस किंमतच उरली नाही. खरे तर ते अत्यंत पवित्र जीवन आहे. ज्याचा ईश्वराशी पदोपदी संबंध येतो. पाऊस वेळेवर पडला नाही, अवेळी पडला, किंवा फारच जास्त पडला, म्हणजे दरवेळी ईश्वराची करुणा भाकल्याशिवाय इलाज नाही. या खेरीज नांगर, बी-बियाणे, वीज पुरवठा, पाणी, खत हेही त्याच्या अखत्यारीतील नाहीत. ऊनवारापाऊस, वगैरेही ईश्वरी कृपेवर अवलंबून आहे. त्याला कशाचाच अंदाज बांधता येत नाही. कशाचीच शाश्वती नाही. देवी कृपा करील व सरकार कृपा करील या आशेवर तो जगतो आहे. पण यात अवकृपेचीच भर पडते आहे. नांगरल्याशिवाय काहीच मिळत नाही पण नांगरल्यावरही काहीही पदरात पडत नाही अशी परिस्थिती आहे. याखेरीज कर्जाचे ओझे आहेच. सावकारी पाश घट्ट आवळले जात आहे. अशा परिस्थितीत कर्जमाफीसारख्या जुजबी योजनांनी शेतक-यांच्या आत्महत्यांचा प्रश्न सुटणार नाही. त्यासाठी सर्व समाजाने व सरकारनेही सर्वंकष योजना आखून प्रयत्न करावयास हवे. याशिवाय शेतक-याला इतर सा-या वस्तू महागातच विकत घ्याच्या लागतात, त्यामुळे महागाईची झळ त्याला सर्वाणिक जाणवते. मुलांचे शिक्षण, मुलीचे लग्न, याचेही खर्च असतात पण त्याने अज्ञानी व दरिद्रीच राहावे ही मानसिकता सोडून देऊन त्याच्या उत्पादक परिश्रमाला प्रतिष्ठा लाभेल व कृषिव्यवसाय परवडेल, एवढेच नव्हे तर त्याच्या उत्पन्नातून मानाचे व प्रतिष्ठेचे जीवन जगता येईल अशी परिस्थिती निर्माण केल्याखेरीज शेतक-यांच्या आत्महत्या थांबणार नाहीत. हेच ख-या अर्थाने यातील अंतिम सत्य आहे. आज तर महागाई वाढली म्हणून समाजातील सर्व स्तरांतील लोक महागाई भत्ता वाढवून घेतात. व धान्याचे भाव कमी व्हावेत असा एकमुखाने प्रस्ताव करतात हे सर्व शेतक-यांविरुद्ध उद्योगपती, भांडवलदार व समाजाने उभारलेले षडयंत्र व कट कारस्थान आहे, असे म्हटले तर ती अतिशयोक्ती होणार नाही.

आता हा कायदा अंमलात आल्यानंतर, असा कायदा असावा, असे ज्यांना वाटत होते त्यांची जबाबदारी वाढली आहे. कायदा वाट मोकळी करून देतो, पण त्या वाटेने जाण्याची प्रेरणा देत नाही आणि अशा सामाजिक कायद्यांना लोकमताचा आधार मिळाला नाही, तर कायदा प्राणवान किंवा प्राणदायी ठरत नाही. व त्याची सुचारु रूपाने अंमलबजावणीही होत नाही. म्हणून गांधीजींनी ‘गोसेवा’ शब्द वापरला होता, ‘गोरक्षा’ नव्हे. ‘सेवे’ शिवाय ‘रक्षण’ होत नाही हे कटू सत्य आहे. तसेच केवळ पूजा करूनही रक्षण होत नाही. असंख्य लोक गंगेची पूजा करतात, पण तरीही ती मलिन का होते? कारण पूजा करणे सोपे आहे. त्या सोबत कर्तव्य जोडलेले नाही.

त्याचमुळे लोकांची पापे धुता धुता गंगाच मलिन झाली व आत तिच्या स्वच्छतेसाठी करोडो रुपये खर्च करावे लागत आहेत. केवळ 'रक्षण' करण्याने 'जीवन' त्यासाठी गाय व बैली यांची 'सेवा' करावी लागेल. त्यांची उपयुक्तता वाढवावी लागेल. त्याखेरीज ते प्राणी जीवित राहणार नाहीत व त्यासाठी केलेल्या कायद्याची सुचारूपेण अंमलबजावणीही होणार नाही.

तसेच गाय व बैल यांच्या जीविताचा प्रश्न फक्त अर्थकारणाशी जोडून चालणार नाही. ख-या अर्थाने तो सांस्कृतिक प्रश्न आहे. ज्याचे 'मूल्य' असते त्याची किंमत लावता येत नाही. ख-या अर्थाने मनुष्याने ज्या दिवशी 'पशु'ला परिवारात स्थान दिले, पशुपालनाची भूमिका स्विकारली, त्याच दिवसापासून त्याने ख-या अर्थाने सांस्कृतिक दृष्टया क्रांतिकारी पाऊल उचलले त्याच दिवशी 'भोग संस्कृति' ऐवजी 'त्याग संस्कृति' सशक्तपणे उदयास आली. पशु समाजाचा अभिन्न अंग झाला, तो आमचा 'सहयोगी' झाला. विज्ञानसुद्धा संस्कृति संपन्न करणारे असावे लागेल. ते संस्कृतिचा विनाश करणारे असता कामा नये. ही त्याची मर्यादा मानावीच लागेल. संस्कृतीचा खरा अर्थ आहे अधिकाधिक जीवांना अभयदान व जीवनदान प्रदान करणे. यासाठी अर्थकारण व विज्ञान हे दोन्ही मानवनिष्ठ असणे आवश्यक आहे. एरवी सर्व अर्थकारण अनर्थकारण होत असते. अर्थशास्त्र फक्त स्वार्थशास्त्रच नव्हे तर विपत्तिशास्त्र ठरत असते. याची हवी तशी जाणीव दिसून येत नाही हे दुर्दैवी सत्य आहे.

गोवंशहत्याबंदी कायदा हा भारतीय संस्कृतीचे जतन करण्यासाठी नितांत आवश्यक आहे, याची हवी तशी जाणीव समाजाला दिसत नाही, हेही दुर्दैवी सत्य आहे. या सहस्रांतील सर्वांत श्रेष्ठ मानव, महात्मा गांधींनी म्हटले आहे की 'गाय हे करुणेचे काव्य आहे. या सौम्य व दयाळू पशु मूर्तिमान करुणा आहे. ती करोडो लोकांची आई आहे'. गोरक्षणाचा अर्थ आहे ईश्वराच्या संपूर्ण मूक सृष्टीचे रक्षण. याची सुरवात गायीपासून होते. हा रक्षणाचा प्रश्न अत्यंत महत्त्वपूर्ण आहे, कारण देवाने त्यांना वाणी दिलेली नाही'. ते पुढे म्हणतात पशूंचे संरक्षण सेवेशिवाय होत नसते. म्हणूनच त्यांची सेवा करणे हाच त्यांना जीवन प्रदान करण्याचा व त्यांच्या पूजेचाही अभिन्न व महत्त्वाचा भाग आहे. त्यांनी म्हणूनच म्हटले आहे की 'मी गायीची पूजा करतो व त्या पूजेचे समर्थन करण्याकरिता सर्व जगाशी सामना करण्याची माझी तयारी आहे'. त्यांची हीच भावना संपूर्ण गोवंशाबद्दल होती. त्यांनी 'सेवा' हे संरक्षणाचे साधन मानले होते.

त्यामुळे आता गोभक्त, गोशाळा व पांजरापोळ यांचे हे कर्तव्य व दायित्व आहे की, त्यांनी संपूर्ण गोवंशाच्या संरक्षणाची हमी द्यावयास हवी. या वंशातील कुठलाही प्राणी संरक्षणासाठी आला तर त्यास असे संरक्षण लाभेल अशी शाश्वती द्यावी लागेल. तरच अशा संस्थांना अर्थ प्राप्त होऊ शकेल. अशा कायद्याची अंमलबजावणी फक्त पुलिस, शासन अगर न्यायालयावर टाकून जबाबदारीतून मुक्त होता येणार नाही. अशा संस्थांनी व गोभक्तांनी हे प्राणी प्रतिष्ठेने जगू शकतील अशा योजना आखाव्या लागतील. त्यांच्यासाठी चारा व पशुखाद्याची उत्पत्ती करणे ही त्यांची केवळ नैतिकच नव्हे तर संवैधानिक जबाबदारी आहे. या संस्था सेवासंस्था आहेत, त्या व्यापारी किंवा औद्योगिक संस्था नाहीत याची जाणीव ठेवावी लागेल. आज दुर्दैवाने अशा संस्थांचे स्वरुप बदलत आहे, हे दुर्दैवी सत्य आहे. आता गोवंश हत्याबंदीचा कायदा अंमलात आल्यानंतर हे दायित्व व जबाबदारी त्या संस्थांना स्वीकारावी लागेल ते स्वेच्छेने केले तर प्राणवान ठरेल, एरवी तशा

कायदेशीर बंधनाची व दायित्वाची कायद्या-अंतर्गत अंमलबजावणी करावी लागेल. ती पाळी गोभक्त व या संस्था येऊ देणार नाहीत अशी मी आशा बाळगतो. पण माझ्या मनात शंका आहे, हे मी नाकारू शकत नाही. कारण आमचा विश्वास पूजेवर जेवढा आहे तेवढा जगविण्यावर नाही ही खरी मानवीय मूल्यांची शोकांतिका आहे.

गोवंशहत्याबंदीचा संपूर्ण आशय समजून घेणे अगत्याचे आहे. पण त्यासोबतच त्या वंशातील प्राण्यांना प्रतिष्ठेने जगता येईल व त्यांची उपयोगिता वाढेल असे अर्थकारण व कृषिसंस्कृति विकसित करावी लागेल. तोच आपल्या योजनांचा अभिन्न भाग असावा लागेल. हा प्रश्न फक्त धार्मिक किंवा भावनिक नसून तो आर्थिक व सांस्कृतिक मूल्याचे रक्षण करण्याचा आहे. सुदैवाने पार्लमेंटमधील राष्ट्रपतींच्या भाषणत जैविक शेतीवर भर देण्याबाबत घोषणा करण्यात आली आहे. आज वैश्विक स्तरावरही शाकाहार व जैविक शेतीह्यांवर भर देण्यात येत आहे. ही भूमिका प्रत्यक्षात उतरावी म्हणून सशक्तपणे योजना आखाव्या लागतील.

हे खरे आहे की काही अंशी अवैध गोवंशहत्या करण्याकडे कसायांचा कल असेल. कारण दुर्दैवाने आपल्या देशात कायदे पाळणारांपेक्षा अनेक हिकमती करून कायदे मोडणा-यांची अधिक प्रतिष्ठा आहे. ज्यांच्यापर्यंत कायद्याचे हात पोचत नाहीत त्यांच अतिविशिष्ठ व्यक्ती मानले जातात. एवढेच नव्हे तर सफाईदारपण कायदे मोडण्याची तुमची क्षमता हेच तुमच्या प्रतिष्ठेचे लक्षणच नव्हे तर मापदंड व मानदंड आहे. हे ही दुर्देवी सत्य आहे. परंतु महात्मा गांधीनी दारुबंदीच्या संदर्भात म्हटल्याप्रमाणे ‘दारूबंदी असली तरी चोरट्या दारुभट्टया काही प्रमाणात चालू राहतील हे नि:संशय, पण त्यांचे प्रमाण म्हणजे सरकारच्या कार्यक्षमतेचे नव्हे, अकार्यक्षमतेचे प्रमाण होय!’ मी या सोबत एवढेच म्हणू इच्छितो की ते समाजाच्या संवेदनशीलतेचे नव्हे तर असंवेदनशीलचेही लक्षण आहे.

●●●

# गोवधबंदीची चळवळ

*इरावती कर्वे*

स्वत:ला हिंदुत्वनिष्ठ म्हणवणाऱ्या कांही मंडळीनी आजकाल गोवधबंदीच्या चळवळीची धमाल उडवून दिली आहे .गोवधबंदीची चळवळ काही आजचीच नाही ,पुष्कळ दिवसांची आहे .कधी कधी ती मंदावते , तर कधी जोरात येते .गेली काही दिवस ह्या चळवळीला जोर चढला आहे व तिचा हिंदू मंदिरातून व हिंदूच्या व्रतोप्रवांसाचे दिवस साधून फार जोराचा प्रचार चालला आहे.

ह्या चळवळीबद्दल स्वातंत्र्यवीर सावरकर ह्यांनी एक उत्कृष्ट लेख पूर्वी लिहिलेला आहे .त्यांच्या लेखानंतर मी लिहिण्याची गरज नाही .हा त्यांचा लेख लोकंच्या डोळ्यांपुढे सध्या नाही म्हणून पुन्हा एकदा ह्या चळवळीबद्दल लिहिणे भाग पडत आहे .तरीसुध्दा सावरकरांचा लेख सर्व मराठी मासिकांनी व वर्तमानपत्रांनी पुन्हा एकदा छापावा अशी माझी आग्रहाची विनंती आहे .

**हिंदू धर्म आहे तरी काय?**

हिंदू धर्म आहे तरी काय ,त्याची थोडक्यात राहोच ,पण विस्ताराने तरी व्याख्या करणे शक्या आहे का , ह्याबद्दलही माझ्यापेक्षा हजारो पटींनी जेष्ठ व श्रेष्ठ लोकांनी विचार केलेला आहे .खुद्द लोकमान्यांनी ह्या बाबतीत केलेले विवेचन फार मार्मिक व मार्गदर्शक आहे .हिंदूचे एक असे दैवत नाही ,एकच असा विचार नाही व मुक्तीचे साध्य साधण्यासाठी सांगितलेली साधनेही अनेक आहेत ,असे हिंदू धर्माचे

लक्षण लोकमान्य करतात .हिंदुस्थानचा गेल्या तीन हजार वर्षांचा इतिहास हेच पुन्ह पुन्हा सिध्द करतो.

आपले स्वत:चे आचारधर्म आपण पाळावे व इतरांना त्यांचे पाळू द्यावे अशी प्रथा प्राचीन काळापासून भारतात अद्ययावत चालू आहे.

हयाच कारणामुळे अनेक चाली-रीती भारतात दिसतात .काही जमाती मांस खातात ,काही खात नाहीत; काहींत मामा व आत्याच्या मुलीशीं लग्ने करतात, काहींत सर्व तऱ्हेचे निकट सापिंड्य लग्नाच्या बाबतीत निषिध्द आहे; बऱ्याच जातींत स्त्रिया चोळी घालतात ,तर काहींच्यात ही चाल निषिध्द आहे; एक ना दोन ,अशी उदाहरणे हजाराने सांगता येतील .एकाच समाजात राहणाऱ्या लोकांनी एकमेकांच्या भिन्न व्यवहाराबद्दल सहिष्णुता बाळगणे हे एक कर्तव्य आहे .ज्या वेळी एखाद्या व्यवहारामुळे एखाद्या व्यक्तीच्या व समाजाच्या न्याय्य व्यवहाराला अडथळा येईल ,तेव्हाच अशा स्वातंत्र्याला राजाज्ञेने बंध घालता येईल .एखाद्या समाजाला आपले काही व्यवहार योग्य वाटले नाहीत , तर त्यावर बंदी घालता येईल; एरवी दुसऱ्याचे न आवडणारे व्यवहार बंद करावयाचे असल्यास मत परिवर्तन – तेही दांडगाईने नव्हे – हाच एक मार्ग न्याय्य व शिष्टसंमत आहे .

**देवळांचे हिंदू समाजातील स्थान**

हिंदूंचे सर्व थोर राजे ह्याच न्याय्याने वागत आले .परकी राजांनी केलेली कृत्ये ह्याच कारणामुळे जुलमी व सर्वथैव निंद्य ठरली .दुर्दैव एवढेच की ह्या जुलमी व निंद्य प्रकाराला समाजातील सर्व शक्ती एकवटून प्रतिकार फार वेळा झाला नाही .प्रत्येकाने आपल्या मनाप्रमाणे आपल्या दैवताची पूजा करावी हे हिंदू धर्माचे तत्त्व आहे .त्याप्रमाणे वागणूक ठेवताना इतरांनी आमच्या आमच्या दैवतांचे व मंदिरांचे पावित्र्य भ्रष्ट करता कामा नये ,त्यासाठी प्राण खर्ची करू ही भावना हिंदूंनी दाखविली नाही . नाहीतर हिंदू मंदिरांची मोडतोड व त्या जागी चर्च, मशीदी, ह्यांची स्थापना होती ना .ह्या बाबतीत असेही म्हणता येईल की ,हिंदूंची दैवतपूजा कौटुंबिक स्वरूपाची होती .त्यामुळे मशीद व चर्च ह्यांना मुसलमान व ख्रिस्ती धर्मात जे विशिष्ट स्थान आहे ते देवळाला हिंदू समाजात नाही .काही का असेना , हिंदूंची देवळे शेकडोंनी फुटली हे खरे .आता तरी आपण जागरूकपणे देवळाचे पावित्र्य ठेवण्यासाठी झटतो म्हणावे तर तेही माही .कुठच्याही लहानमोठ्या देवळांत जा ,स्वच्छता ,प्रसन्नता व पावित्र्य अपवादानेच आढळतात .सर्व तऱ्हेच्या बेवारशी व रोगी जनावरांचे वसतीस्थान म्हणजे हिंदू देवळांचे आवार झाले आहे .पुष्कर सरोवराच्या रम्य परिसरात एक प्रसिध्द देऊळ ब्रम्हदेवाचे आहे .तेथे देवळाभोवतालच्या ओवऱ्यांवरील गच्चीवर सर्व पुजारी व यात्रेकरू शौचविधी उरकतात! पूर्वी देवळांना भव्य आवारे असत ,देवळाला वाट रूंद ठेवलेली असे .हल्ली देवळांची आवारे व शेजारील रस्ते पुजारी व दुकानदार ह्यांनी हळूहळू पुढे सरकत इतकी बळकावली आहेत की ,देवळात जाण्याची वाट अरूंद बोळासारखी झालेली आहे .काही मंदिरात तर पुजाऱ्यांच्या भोप्यांच्या घरातूनच जावे लागते देवाचे आवार पूर्वी केवठे होते हे शोधून ते परत तेवढे करवले तर एक मोठे समाजकार्य होईल .हिंदू देवळांतून व घरांतून भजन म्हणून एक कार्यक्रम असतो .गायन व नृत्य हे ईश्र्वरसेवेचे एक अंग फार प्राचीन काळापासून समजले जाते .अजूनही काही मंदिरांतून सकाळी व संध्याकाळी वीणावादन व गायन चालते .चिंदवराला रोज सकाळ-संध्याकाळ उतत्कृष्ट भक्तिगीते गाइली जातात .जगन्नाथाच्या मंदिरात जयदेवाच्या गीतगोविंदाचा काही भाग रोज म्हटला जातो .अशा ठिकाणी मन काही क्षण का होईना ,देवाच्या पायाशी स्थिरावते; पण कित्येक ठिकाणी भजनाच्या नावाखाली गायनाची ,वाद्यांची व ज्या भक्ताने गीते रचिली त्याची विंटबना मात्र झालेली आढळते .प्रत्येक भक्ताच्या हातात टाळासारखे कर्कश वाद्य असते ,त्याच्यावर आवाज चढवावा लागतो म्हणून प्रत्येक जम गळा फोडून ओरडत

असतो .माधुरीचा सर्वथैप लोप होऊन कर्कश ,विसंवादी नाद मात्र उमटत असतो .देव बहिरा आहे अशी ह्या लोकांची ठाम समजूत झालेली असते .अशा भजनाने आसपासच्या वीस-पंचवीस घरांना त्रास होतो , ही दुष्ट प्रथा बंद पाडून सुस्वर सामुदायिक भजन करणे शक्य आहे .त्यामुळे हिंजूचे दैवतपूजन जास्त मंगल होईल ,पण तिकडे कोणी लक्ष देत नाही .एवढेच नव्हे तर अशी टीका करणारा नास्तिक व पाखंडी समजला जातो.

**गोवधवंदीची चळवळ दडपणाची!**

ख्रिस्ती व मुसलमान ,विशेषत: मुसलमान ,लोकांचे अनुकरण करून आततायीपणा करण्याकडे मात्र प्रवृत्ती वाढू लागली आहे .वेदवाङ्मय ,इतिहास व पुराणे हे जसे आमचे धर्मग्रंथ आहेत तसेच ते जुन्या चालिरीती व इतिहास ह्यांचे कोठार आहेत .भारताच्या प्राचीन इतिहासाचे संशोधन करावयाचे तर ह्या ग्रंथाचा फार कोटेकोरपणे अभ्यास करावा लागतो .त्यात सारखी भर पडत गेली आहे .ती भर कोणती व पुर्वीचा शक्य तितका जुना ग्रंथ कोणता ,हे शोधून काढणे आवश्यक आहे .अशा अभ्यासात पूज्य दैवते व व्यक्ती ह्यांच्या चरित्रावर उलटसुलट टीका होणे अपरिहार्य असते .अशा वेळी भावना दुखावल्याचा हलकल्लोळ करणे रास्त नाही .जुन्या पंडितांचे ग्रंथ ,स्वमतमंडन व परमतखंडन करताना त्यांनी केलेली विधाने पाहिली म्हणजे कसल्याही तऱ्हेचे पावित्र्यविडंबन करण्याचे त्यांनी ठेविले नाही हे दिसून येईल .चीड येईल असे लिखाण लिहिण्याच्या बाबतीत ह्या प्रतिवादी भयंकर पंडितांच्या मानाने हल्लीची पिढी कच्चीच आहे असे दिसून येईल .जैनांनी सनातन्यांच्या इतिहास व पुराणग्रंथाचा जो विचका केला आहे तितका दुसऱ्या कोणीच केला नसेल .शैवांनी वैष्णवांची व वैष्णवांनी शैवांची जी निंद्य चेष्टा केली आहे तितकी इतर धर्मीयानीसुध्दा हिंदूची केलेली नाही.

ह्या गोष्टी येथे सांगण्याचे कारण असे की ,हिंदुत्वाचा अभिमान धरणारे लोक ,काही अपवाद वगळल्यास ,स्वतःची शुद्धी न करता इतरांवर व्यर्थ दडपण आणू पाहत आहेत .गोवधबंदीची चळवळ ही अशा चळवळीपैकी आहे .तिला तर्काचा ,इतिहासाचा ,धर्माचासुद्धा आधार नाही .जे हिंदू राजे धर्मरक्षणार्थ लढले व ज्याच्यां हातात राज्यसत्ता होती ,त्यांनीही सरसकट गोवधबंदी अंमलात आणली नाही . शिवाजी महाराजांच्या राज्यात भररस्त्यावर गाय मारू देत नसत; पण मुसलमानांनी गाय मारावयाची नाही व गोमांस खायचे नाही अशी बंदी नव्हती .खुद्द पुण्याला पेशव्यांच्या ब्राह्मणी राज्यातही संपूर्ण गोवधबंदी होती असा खात्रीदायक पुरावा सापडत नाही .मग आताच गोवधबंदीची चळवळ का उसळली! हिंदू धर्माबद्दस काही विशेष आस्था वा काही नवी मानवीमूल्ये ह्या आंदोलनाच्या बुडाशी आहेत असे वाटत माही .जी तरुण मंडळी ह्यांत पडली आहेत ती सद्भावनेनेच कार्य करीत असणार ,पण त्यांना शांतपणे विचार करावा अशी त्यांना आग्रहाची विनंती आहे .

**गोमांसभक्षणाचा इतिहास**

गोमांसभक्षणाचा इतिहास मोठा उद्‌बोधक आहे .गाय ,बैल ,शेळ्या ,व मेंढ्या ह्यांचे कळप पाळणारे बहुतेक ह्या ना त्या स्वरूपात ह्या प्राण्यांचे मांस खातात व त्यांचे कातडे पांघरण्यासाठी ,पादत्राणे करण्यासाठी वगैरे नाना तऱ्हेच्या उपयोगासाठी वापरतात .पूर्वी आर्य भारतात आले तेव्हा त्यांच्याजवळही अशा तऱ्हेचे कळप होते व त्या प्राण्यांचे दूध ,मांस व कातडे यांचा उपयोग ते सर्रास करीत असत .उष्ण प्रदेशात मांस लवकर नासते व म्हणून जनावर मारले की ,शक्य तितक्या लवकर ते खाऊन संपवावे लागते .शेळी मेंढीसारखे जनावर 5-10 जणांना संपवता येते; पण गायबैलांचे मांस संपायला चांगली 50 माणसे लागतील .त्याचप्रमाणे शेळ्या-मेंढ्या एका मालकाजवळ खंडोगणती असतात ,तर गुरे 10 नीच मोजावी लागतात .युरापातील थंड प्रदेशात ,विशेषतः हिवाळ्यात मांस आठवडेच्या आठवडे टिकू शकते .एखादे गुरू मारून ठेवले तर एक कुटुंब कित्येक दिवस त्यावर जगू

सकेल .भारतातील उष्ण हवेत ते शक्य नव्हते त्यामुळे गुरुं मारणे म्हणजे एक मोठा मेजवानीचा प्रसंग समजला जाई व कोणी थोर ऋषी आले तरच गाईचे कोवळे मांस शिजवले जाई .ब्राह्मणांचा सर्वात मोठा सन्मान करणे – किंवा पाहुण्याचा सन्मान करणे म्हणा – ह्या विधीला मधुपर्क असे नाव आहे व त्यात गोमांस अवश्य म्हणून उल्लेख आहे .आर्य पादत्राणे वापरीत व ती गाईबैलांच्याच कातड्याची असत .म्हैस बाळगणे जुन्या आर्यांना ठाऊक नव्हते .प्राचीन आर्यांचे पंचगव्य) गाईपासून झालेले पाच पदार्थ ( म्हणजे दूध ,दही ,तूप ,लोणी व मांस असे होते.

एकंदरीनेच आर्यांना मांस वर्ज्य नव्हते .मुंज झाल्यापासून ब्रह्मचर्याची दीक्षा सुटेपर्यंत आयुष्य अतिशय साधेपणे व कष्टाने घालवावे असा नियम होता .तेवढ्या वेळात ज्या गोष्टी वर्ज्य होत्या त्यांत मध , मांस वगैरे कायला रुचीकर लागणारे पदार्थ होते .लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट अशी की ह्या ब्रह्मचर्याच्या काळात सर्वच तऱ्हेचे मांस वर्ज्य होते ,फक्त गोमांसच वर्ज्य असे नव्हते .

**धर्म कमकुवत करू नका!**

एकंदरीनेच मांस खाण्याविषयी ब्राह्मणांचे मत कसे होत गेले व त्यातही निषिद्ध कसे व कधी झाले हे नीट सांगता येत नाही .फिलाडेल्फिया विद्यापीठात प्रो .ब्राऊन म्हणून एक संस्कृत पंडित आहेत . त्यांनी ह्या विषयावर लिहिलेला एक लेख नुकताच पाहण्यात आला .त्यांतही प्रो महाशयांना ह्या प्रश्नाचा उलगडा झाला नाही ,असे दिसते .पण त्यात त्यांना असे दाखवून दिले की ,हा निषेध असूनही हिंदू भारतात निरनिराळ्या जमाती गोमांस भक्षण करीत असे उल्लेख सापडतात .

ब्राह्मणांना एकंदर मांसभक्षण निषिद्ध झाले ते बुद्धाच्या तत्वज्ञानाचा पाडाव करता करता त्यातील काही तत्त्वज्ञानाचा पाडाव करता करता त्यांतील काही तत्त्वे सनातन्यांनी स्वीकारली म्हणून झाले की , मध्ययुगात जैन मताचा प्रसार झाला त्यामुळे झाले ,हेही ठामपणाने सांगता येत नाही .ह्याबाबत एक लक्षात ठेवणे जरूर आहे की ,हिंदुस्तानाबाहेरील बुद्धधर्मीय मांसभक्षण - गोमांसभक्षण धरून – करतात .काही कारणामुळे ब्राह्मणांना मांसभक्षण व त्यातूनही गोमांसभक्षण निषिद्ध झाले; पण निषेध हा हिंदू धर्माचा गाभा असे मानता येणार नाही व हिंदू धर्माच्या नावाखाली गोवधबंदीची चळवळ करणे म्हणजे दिशाभूल करणे व हिंदू धर्मात एक निषेध दृढमूल करून तो धर्म आणखीच कमकुवत करणे होय.

**दूधपुरवठा नि गोवध**

गोवधामुळे भारतातील लोकांना पुरेसे दूध मिळत नाही असाही एक सर्वथैव खोटा प्रचार गेल्या महाशिवरात्रीला झाला .भारतात निम्मे लोक म्हणीचे दूध पितात; त्यांचे दुग्धपान युरोपाप्रमाणे सर्वस्वी गाईवर अवलंबून नाही .शिवाय ज्यांना दूध मिळत नाही त्यांना खायला व प्यायलाही नीट मिळत नाही .सर्वांना दूध घेण्याची ऐपत आहे व इच्छा आहे पण पुरेसा पुरवठा नाही अशी परिस्थिती असती , तर एक महत्वाचे अन्न म्हणून त्याचे रेशनिंग करण्याची मागणी पुढे आली असती .जे दूध पीत नाहीत ते दारिद्र्यामुळे .त्यांना – निदान गरीब लहान मुलांना – दूध मिळावे म्हणून सरकारचे व कित्येक सार्वजनिक संस्थांचे प्रयत्न चालू आहेत .त्या प्रयत्नांना हातभार लावून सर्वांना दूध मिळावे असा प्रयत्न करण्याचे टाकून दुधाचा पुरवठा व दूध घेण्याची ऐपत ह्या गोष्टीशी ज्यांचा संबंध नाही अशा गोवधबंदीच्या चळवळीत सामर्थ्य खर्च करणे म्हणजे वेळेचा अपव्यय व बहुजन समाजाची दिशाभूल जाणूनबुजून करणे होय .

ज्या देशातून सरसकट गोवध होतो ,जेथले गरीबगुरीब गोमांस खातात ,तेथे गाईचे दूध उत्तम मिळते व त्याची किंमतही मुंबई – पुण्यास द्यावी लागते त्यापेक्षा कमी पडते .गोवधाचा दूध-पुरवठ्याशी संबंध मुळीच नाही .

गाईम्हशीच्या दुधाचा उल्लेख आला म्हणून थोडे विषयांतर करून एक गोष्ट नमूद करते .गाईचे दूध मुलांना मानवते म्हणून ते म्हशीपेक्षा चांगले हेही एक अजब तर्कच आहे .म्हशीच्या दुधाची साय काढली व त्यात पाणी घातले तर मुलांना ते उत्तम मानवते व प्रौढांना तर म्हशीचे दूध चांगलेच मानवते .म्हशीचे दूध गोडीने व कसाने गाईच्या दुधापेक्षा जास्त चांगले असते .त्याचे दही पण गाईच्या दह्यापेक्षा घट्ट व रूचकर असते शिवाय गाईला होणारे बरेचसे रोग म्हशीला होत नाहीत . युरोपमध्ये काही प्रदेशांतून गाईंना फार मोठ्या प्रमाणाच क्षयरोग झालेला असतो व ते दूध प्यायल्याने माणसालाही तो रोग होतो ,म्हणून पाश्चराइज्ड) जंतुरहित (न केलेले असे खेडेगावचे दूध पिऊ नका असे सांगणाऱ्या धोक्याच्या सूचना प्रजेला देतात .स्वित्झर्लंडमध्ये गाई बऱ्याच प्रमाणात अशा रोगाने पछाडलेल्या असतात ,म्हणून बहुतेक दुधाचे चीझ व चॉकलेट बनवून टाकतात .कारण ह्या दोन पदार्थांचा कृतींत रोगजंतू मरून जातात .तेव्हा गोदुग्धाच्या धारेत वाहवून न जाता उत्तम सकस दुधाचे रांजणत जणू अशा आपल्याकडील ओबडधोबड ,काळ्या म्हशीचेही स्मरण ठेवले तर कृतज्ञता व्यक्त केल्यासारखे होईल.

**एक राजकीय पवित्रा**

हिंदूच्या देवळातील काही प्रकार वर वर्णन केलेच आहेत .आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे देवळाच्या आवारात मोकाट सुटलेले गाईबैल व कुत्री चालतात ,पण काही जातींची माणसे मात्र आलेली चालत नाहीत .काशीच्या देवाचे नाव विश्वेश्वर आहे .सबंध विश्व राहोच ,पण हिंदूतल्या सगळ्या जातींनासुध्दा तो देव जवळ करीत नाही .तो पतितपावन तर नव्हेच नव्हे .तो दुसऱ्यांना पावन करीत नाही ,तर स्वतःच दलितांच्या स्पर्शाने पतित होतो! हरिजनांनी मंदिरप्रवेश केला म्हणून विश्वेश्वराचे नवे देऊळ बांधणाऱ्यांचा कडकडून निषेध शिवरात्रीची पर्वणी साधून का बरे केला गेला नाही! स्वधर्मीयांच्या आचारविचारांची दखल का बरे घेतली गेली नाही! इतरांनी अमके खावे का नाही ,अमके जनावर मारावे की नाही ह्याची विवंचना करण्याचे कारण काय? हा खटाटोप धर्माच्या उन्नतीसाठी नसून एक राजकीय पवित्रा मात्र आहे .मोकाट सुटलेली ही मोठी जनावरे दुकानदारांच्या मालात तोंड घालतात व रस्त्याने येणाऱ्या – जाणाऱ्याला ढुशा देतात .रस्त्याने जाणाऱ्या गुरांचा पादचाऱ्यांना ,विशेषतः शाळकरी मुलांना फार त्रास होतो .कधी कधी जिवावर बेतते .त्या गुरांच्या मागून भर रस्त्यावर थांबून शेण गोळा करणाऱ्या बायका पाहून मानभावांचा शेनपुंजी दृष्टांत सात शतकांनंतरही खरा आहे ह्याची प्रचिती पटली ,तरी येणाऱ्या जाणाऱ्या वाहनाखाली ह्या बाया सापडणार की काय अशी सारखी भिती वाटते .गुरांवर योग्य नियंत्रण व मोकाट जनावरे जप्त करण्याची तोबडतोब व्यवस्था झाली पाहिजे . पण वर म्हटल्याप्रमाणे धर्माच्या नावाखाली माणसांपेक्षा जनावरांनाच जास्त किंमत दिली जात आहे .

**धर्मसंरक्षणाच्या खुळचट कल्पना**

ज्या गाई-बैलांबद्दल एवढी सहानुभूती त्यांना वागणूक काय मिळते? त्यांचे कष्ट घेऊन त्यांना अत्यंत निकृष्टावस्थेत जेमतेम जिवंत ठेवण्यापलीकडे हिंदू काहीही करीत नाहीत .त्यांना पराणीने टोचणे; जनावर काम देईनासे झाले की ,त्याला इतके कमी खाणे द्यायचे की ,ते भुकेने तडफडून मरते . अशापेक्षा त्याला मारणे काय वाईट? आंध्रात मोठमोठे गाडे असतात .आंध्रात बेलही फार उमदे व मोठाड असतात .त्यांना गाड्याला जोडले तर बैलांचे ढुंगण व गाड्याची पुढची कड ह्यांत निदान फुटाचे तरी अंतर असते व बैल मोकळेपणे चालू शकतो .महाराष्ट्रात मात्र बैल इतक्या दाटीवाटीने बांधलेला असतो की गाड्याची पुढची बाजू शेपटीला व ढुंगणाला घासून रक्त गळत असलेले लेखिकेने अनेकदा पाहिलेले आहे .गाडीचा आकार सुधारून जोखड व गाडीची पुढची बाजू यांत भरपूर अंतर ठेवण्याबद्दल लोकांचे मन वळवले तर बैल दुवाच देतील .गोमांस खाणाऱ्यांच्या प्रदेशांत गुरांना जी वागणूक मिळते

ती भारतांतील हिंदू कधीही देत नाहीत .भारतात गोधन इतके निकृष्ट आहे की ,गोमांसखाऊ विलायतेत जेवढे दूध दर गाईमागे मिळते त्याच्या एकचतुर्थांशही येथे मिळत नाही .बैलांची काम देण्याची शक्तीही कमी असते .गुरे जास्त व चारा कमी म्हणून गुरांना चांगले खाणेपिणे क्वचितच मिळते .गंगा व ब्रम्हपुत्रा ह्या नद्यांच्या खोऱ्यांतून नुकताच माझा एक प्रवास झाला .गुरांचे शेकडो कळप वाटेत भेटले; पण त्यातील फार थोडी गुरे सशक्त व पुष्ट दिसली .बाहेर हाडे निघालेली ,थकली-बागलेली गुरेच अधिक .हा उन्हाळा तरी काढतील की नाही ,असे त्यांना पाहून वाटले .जेथे जेथे अशा गुरांचा कळप , तेथे तेथे शेजारच्या वृक्षावरून मोठमोठी गिधाडे बसलेली पाहून अंगावर काटा आला .एखादे दुसरे गुरु तरी 4/5 मैलांत रोज मरतेच .मेजवानी मिळण्यासाठी फक्त उंच वृक्षावर वाट पाहावयाची एवढेच गिधाडांचे काम .अशी भुकेने व रोगाने मेलेली जनावरे हिदुस्थानात खूपच असतात .त्यांच्या कातड्यांपासून केलेल्या पादत्राणांना 'अहिंसक' चपला म्हणतात .ही अहिंसेची चेष्टा की जाणूनबुजून स्वीकारलेले औदासिन्य? इतर धर्मांचे लोक गुरे कसाईखान्यात एका घावाने मारतात .आम्ही हिदू त्यांना उपाशी-तापाशी ठेऊन मारतो .कायद्याने पहिल्या तऱ्हेच्या वधाला बंदी व्हावी आमचे हे मागणे व त्यामुळे हिंदूसंरक्षण होईल ही आमची कल्पना! खरोखर ह्या प्रचाराला बळी पडण्याइतके आपण खुळे झालो आहोत का?

**हट्टाग्रह का ?**

गाय ,म्हैस ,घोडा ,उंट ,शेळ्या ,मेंढ्या वगैरे जनावरे फार उपयुक्त आहेत .ते गाड्या ओढतात ,नांगर ओढतात ,दूध व मांस असे सकस अन्न भरपूर प्रमाणात पुरवतात ,त्यांच्या कातड्यांपासून असंख्य उपयुक्त व नित्याच्या वापरातल्या वस्तू होतात .त्यांच्या खुरशिंगांपासून सरस बनतो .तोच सरस शुद्ध करून त्यात निरनिराळे रंग व सुगंधी द्रव्ये घातली म्हणजे बाजारात मिळणारी जेलीची भुकटी होते . त्यांच्या हाडाचा चुरा हे उत्तम खत आहे .त्यांची चरबीही उपयुक्त असून तिचा मोठ्या प्रमाणावर व्यापार चालतो .ह्या राष्ट्रीय संपत्तीची सर्व तऱ्हेने भरपूर उपयोग कसा करता येईल ,ड्याचे शास्त्रशुद्ध शिक्षण जनतेला हवे .धर्माच्या नावाखाली भावना चेतवून द्वेशबुद्धी निर्माण करण्याने राष्ट्राचे कधीही हित होणार नाही .

गोवधाने हिंदूंच्या भावना दुखावतात; डुकरे मारणे किंवा खाणे मुसलमानांना निषिद्ध आहे ,तर अल्पतम प्राणी म्हणजे ढेकूण ,उवा ,पिसवा वगैरेसुद्धा मारणे जैन धर्माच्या विरुद्ध आहे .सर्वांनी एका राज्यात राहावयाचे म्हटले तर प्रत्येकाला शक्य तर आपले आचारधर्म पाळण्याची मुभा देता येईल .पण इतरांवर बंधन कसे घालता येईल? ज्या हिदूंना गाई पूज्य वाटतात त्यांना रोज त्यांना नमस्कार करावा .व आपली पापे नष्ट करावीत; त्यांचे दूधतूप खावे; पण इतरांनी त्यांच्याच समजुतीप्रमाणे वागावे असा आग्रह योग्य नाही.

\- 1958

(इरावती कर्वे यांच्या *आमची संस्कृती* या पुस्तकातील लेखाचा काही भाग)

●●●

# गोहत्या बंदीः कशासाठी?

*जगन फडणीस*

सध्याच्या सरकारने गोहत्या बंदीची घोषणा केली आहे .याचे दूरगामी परिणाम आर्थिक, धामिर्क व सामाजिक क्षेत्रावर होणार आहेत .गोहत्या बंदी खरोखरच धमार्चे सांगितली आहे काय? भारताच्या खऱ्या संस्कृतीचे पाईक काय म्हणतात? गाय ही देवता आहे काय? या विषयी......

घटनेतील मार्गदर्शक तत्वांचा आधार घेऊन महाराष्ट्रात गोहत्याबंदी कायदा करण्यात येणार आहे . त्यापूर्वी एकसारखा नागरी कायदा करण्याची घोषणा केली गेली आहे .या दोन कायद्यांबाबतच महाराष्ट्र सरकारला मार्गदर्शक तत्वांची घाई झालेली आहे .घटनेने राजकीय लोकशाहीच बहाल केलेली नाही तर कल्याणकारी राज्याची दिशाही दाखवून दिलेली आहे .मार्गदर्शक तत्वांमधील तरतुदी हा हक्क नाही . मार्गदर्शक तत्वे ही सरकारच्या धोरणाची मूल्ये आहेत .मार्गदर्शक तत्वे सरकारची धोरणे सांगणारी आहेत .कदाचित याचमुळे भारती जनता पक्ष घटना बदलण्याचा विचार अधूनमधून मांडत असावा. घटनेने प्रजासत्ताक व्यवस्था दिलेली आहे .घटनेने धर्मनिरपेक्ष राष्ट्राची संकल्पना मांडलेली आहे . मूलभूत हक्कही सांगितले आहेत .पण सरकारच्या धोरणाची दिशा काय असेल याचीही चौकट घालून दिलेली आहे .अशा घटनेशी प्रामाणिक राहावयाचे तर भाजपाला अभिप्रेत असलेल्या धर्मराष्ट्राचे स्वप्न साकार होणार नाही .म्हणून भाजपाला घटनेत बदल हवा आहे .त्याचप्रमाणे मार्गदर्शक तत्वांपैकी काही तत्वांचा अर्धा भाग मांडून भाजप जनतेची दिशाभूल करीत असतो .महाराष्ट्रात भाजप-शिवसेना युतीच्या सरकारचे एकसारखा नागरी कायदा व गोहत्याबंदी कायदे करण्यामागचे राजकारण हा याच त्यांच्या धोरणाचा परिपाक आहे .गोहत्याबंदीचा कायदा करण्यासंबंधात घटनेच्या 48 व्या कलमाचा आधार घेतला जात आहे.

**माणसांपेक्षा पशूंचे प्रेम**

गोहत्याबंदीच्या कायद्यासंबंधीचे 48 वे कलम एकसारख्या नागरी कायद्याबाबतचे 44 वे कलम ही दोन्ही कलमे मार्गदर्शक तत्वांत सांगितली आहेत .मार्गदर्शक तत्वांत केवळ ही दोनच कलमे नाहीत .या दोन कलमांत एकूण अठरा बाबी मार्गदर्शक तत्वांत नमूद केलेल्या आहेत .त्या सर्वांचा ऊहापोह करण्याचे कारण नाही, पण काही मार्गदर्शक तत्वांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल .कारण त्यांच्या सर्वसामान्य जनतेशी प्रत्यक्ष संबंध पोहोचतो .माणसाच्या जीवनाशी ज्याचा संबंध येतो त्या मार्गदर्शक तत्वांचा आग्रह भाजप व शिवसेनेसारख्या संघटना धरीत नाहीत .माणसांपेक्षा भाजप-शिवसेना यांना जनावरे अधिक महत्वाची वाटतात !तसे नसते तर भाजप-सेना युतीच्या सरकारने माणसासंबंधी जी मार्गदर्शकतत्वे घटनेत आहेत त्यांचा प्रथम आग्रह धरून तसे कायदे करण्याची तयार ठेवली असती !स्त्री व पुरूष यांना जगण्यासाठी आवश्यक साधने एकसारखीच उपलब्ध करून देणे, संपत्तीचे आणि उत्पादनाच्या साधनांचे केंद्रीकरण होणार नाही हे पाहणे, समान कामासाठी समान वेतन, स्त्री,पुरूष व वाढत्या वयाची मुले यांच्या सुदृढ आरोग्याकरिता आवश्यक असणारे आणि त्यांचे शोषण थांबवणारे कायदे करणे, बेरोजगार, वृद्ध, आजारी, अपंग यांना आर्थिक मदत भत्ता देणारा, कामाचा हक्क मानणारा, औद्योगिक व शेतमजूर यांना त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी गरजेइतका वेतन देणारा, चौदा वर्षांपर्यंतच्या मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण देणारा असे विविध कायदे केले तर सर्वसामान्य माणसाच्या पदरात त्याचे लाभ पडणार आहेत .या कायद्यांच्या अंमलबजावणीमुळे गोरगरीब माणसाच्या परिस्थितीत आमूलाग्र बदल घडून येणार आहे .परंतु भाजप व शिवसेना यांना मार्गदर्शक तत्वांतील या तरतुदी दिसत नाहीत किंवा त्यांना त्यांचे महत्व वाटत नाही .भाजप-सेना यांना मार्गदर्शक तत्वांतील एकसारख्या नागरी कायद्याचे 44 चे आणि गोहत्याबंदीचे 48 चे कलमच आठवते .मार्गदर्शक तत्वांतील या कलमांचा दुरूपयोग करून त्यांचा चुकीचा अर्थ लावून धममांधं राजकारण पेटवण्याची संधी त्यांना साधावयाची आहे .याकरिता भाजप-शिवसेना यांच्या सरकारने तसे कायदे करण्याचा निर्णय घेतला आहे.

**48 व्या कलमातील तरतूद काय सांगते?**

गोहत्याबंदीच्या48 व्या कलमातील तरतूद असे सांगते, 'आधुनिक व शास्त्रीय पायावर आधारीत शेती आणि पशूसंवर्धन करण्याचा सरकारने प्रयत्न करावा. चांगल्या जातीच्या जनावरांची पैदास करून त्यांची जोपासना करावी आणि त्यासाठी गायी, वासरे, दुभती आणि भाकड जनावरे यांच्या हत्येला बंदी करणारा कायदा करण्याचा प्रयत्न करावा.' जनावरे मारण्याला प्रतिबंध का करावा? तर आधुनिक व शास्त्रीय पायावर पशुसंवर्धन करण्यासाठी कायद्याने प्रतिबंध करावा .चांगल्या जातीच्या जनावरांच्या संवर्धनासाठी पशुहत्या बंद करावी .याकरिता भाकड जनावरांचा उपयोग होणार असेल तर त्या जनावरांची आणि दुभत्या व शेतीला उपयुक्त होणाऱ्या जनावरांची हत्या बंद करण्यासाठी कायदा करण्याचा प्रयत्न करावा, हा 48 कलमांचा अर्थ होतो .आधुनिक व शास्त्रीयदृष्ट्या संवर्धन करणे, चांगल्या जातीच्या जनावरांचे संरक्षण करणे आणि दुभती जनावरे मारली न जाणे हा या कलमांचा हेतू आहे. सर्वोच्च न्यायालयाने अब्दुल हकीम विरूद्ध बिहार राज्य यांच्या खटल्यात म्हणूनच भाकड जनावरांना 48 व्या कलमाचे संरक्षण लागू होत नाही .असा निर्णय दिलेला आहे) . ऑल इंडिया रिपोर्टर 1961-सर्वोच्च न्यायालय पान 448 (दुभत्या जनावरांत गायीबरोबर म्हैस व शेळीही येते .बैल, रेडा व बोकड-बकराही उपयुक्त प्राण्यांत येतो मग म्हैस, रेडा, शेळी, बकरा-बोकड यांची हत्या करण्यास बंदी का केली जात नाही? आणि फक्त गोवंशहत्या बंदीचाच कायदा करण्याचा विचार का सुचतो? गोहत्याबंदीचा कायदा हा जणू काय मुसलमानांच्या विरूद्ध कायद्याचा भाग आहे, या दृष्टीने त्याचा विचार केला जातो. ज्यांचा उपयोग नाही अशी किंवा भाकड जनावरे असतील तर त्याचा किती गंभीर परिणाम होतो याचा विचार पुढेही केला आहे .पण महाराष्ट्रातीलच उदाहरण घेऊन या परिणामांच्या गांभीऱ्याचा विचार करू . एका जनावराला रोज 45 लिटर पाणी लागते. (अवर्षण प्रवणक्षेत्र पुनर्विलोम समिती-डॉ.सुब्रम्हण्यम समिती, अहवाल) महाराष्ट्रात एक कोटी सत्तर लाख जनावरे आहेत. त्यापैकी साडेतीन लाख जनावरे भाकड व निरूपयोगी आहेत .रोज 45 लिटर या हिशोबाने भाकड व निरूपयोगी जनावरांसाठी महिन्याला 45 अब्ज 90 कोटी लिटर पाणी लागते .महाराष्ट्रात पाण्याचा थेंब न थेंब अडवा आणि जिरवा अशी बिकट अवस्था आहे .या अवस्थेत भाकड व निरूपयोगी जनावरांकरिता दरमहा एवढे पाणी द्यावयाचे हा पाण्याचा अपव्यय नाही काय? पाणी तर मुबलक नाही .म्हणून चांगल्या जनावरांचे पाणी कमी करून भाकड व निरूपयोगी जनावरांना पाणी पाजले जात आहे .तीच गोष्ट चाऱ्याची आहे .चांगल्या जनावरांचा चारा कमी करून भाकड जनावरांना चारा देतो त्यामुळे चांगल्या जनावरांचीही आपण हानी करीत आहोत .दूध उत्पादनावर व जनावरांच्या उपयुक्ततेवर, त्यांच्या कार्यक्षमतेवर त्याचा परिणाम होत असतो .चांगल्या जनावरांना चारा-पाणी कमी देतो आणि भाकड निरूपयोगी जनावरांनाही चारा कमी दिला जातो .त्यामुळे भाकड निरूपयोगी जनावरांचे शेण-मुत्रही कमी मिळते. म्हणजे खत मिळण्याच्या दृष्टीनेही त्यांचा फारसा उपयोग होत नाही .चांगल्या जनावरांना चारा पाणी कमी झाले तर 48 व्या कलमाला अभिप्रेत असलेल्या पशुसंवर्धनाचा हेतूच साध्य होत नाही .मग महाराष्ट्र सरकार गोवंशहत्येच्याच बंदीचा कायदा करण्यास का निघाले आहे? मुसलमान गायी मारतात आणि गोमांस खातात किंवा त्यांचे मांस निर्यात करतात ही बहुसंख्य हिंदुंची धारणा आहे .त्यामुळे असा कायदा हा मुसलमानांची जिरवण्यासाठी, त्यांच्याविरूद्ध केला आहे असे वातावरण निमार्ण करण्यासाठी हा कायदा केला जात आहे .सर्वोच्च न्यायालयाने एकसारखा नागरी कायदा करावा असे मतप्रदर्शन केले म्हणून तसा कायदा करीत आहोत असे सांगितले जाते .पण एकसारखा नागरी कायदा करण्याचा प्रयत्न करावा असे मतप्रदर्शन सर्वोच्च न्यायालयाने केल्यानंतर पाचच दिवसांनी सर्वोच्च न्यायालयाने कंत्राटी कामगार पद्धती नष्ट करणारा कायदा केंद्र व राज्यांनी करावा असा निर्णय दिला .त्यानुसार कंत्राटी कामगार पद्धती नष्ट करणारा कायदा करणार असे मात्र महाराष्ट्र सरकार म्हणत नाही .पण एकसारख्या

कायद्याबाबतचे मतप्रदर्शन, किंवा मार्गदर्शक तत्वांतील 48व्या कलमानुसार गोहत्याबंदीचा कायदा करण्याची तत्परता दाखवली जात आहे .गाय पवित्र आहे म्हणून असा कायदा केला जात आहे असे म्हंटले जाईल .पण गाय केव्हापासून पवित्र झाली? वैदिक काळात गायीचा कसा उपयोग होत होता? तिचे काय स्थान होते.....?

**वेदकाळात गोमांस खाल्ले जात होते**

वैदिक काळापासून इ.स.दहाव्या शतकापर्यंत भारतात गायीचा कसा उपयोग केला जात होता; गायीपेक्षा अन्य प्राणी कसे पवित्र मानले जात होते; भारतीयांना गाय केव्हापासून पवित्र झाली; आणि गोवंश हत्याबंदी कायद्याचे कोणते परिणाम होतील याचा विचार या निमित्ताने केला पाहिजे .मुसलमान किंवा ख्रिश्चन लोकच गोमांस अथवा ज्याला बीफ म्हणतो ते मांस खातात ही जी कल्पना आहे ती चुकीची आहे .भारतात फार प्राचीन काळापासून अतिशय मोठ्या प्रमाणावर गोमांस खाल्ले जात होते .ब्राम्हण लोकसुद्धा गोमांस खात असत .भारतात गोमांस निषिद्ध नव्हते .'ऋग्वेदाच्या काळी बैल, गायी, मेंढ्या ह्यांच्यासारख्या पशूंचे मांस यज्ञात देवतांना अर्पण करण्यात येत असे .यज्ञाकरिता फक्त वंध्या गायीचा वध करण्यात येत असे .ब्राम्हण ग्रंथाच्या काळीही हा प्रघात चालू होता...' (धर्मशास्त्राचा इतिहास - महामहोपाध्याय पां .वा.काणे (गोमांस भारतात निषिद्ध नव्हते आणि यज्ञात गायीचा बळी दिला जात होता .'गायी व घोडे यांना यज्ञात बळी देत असत .ही प्रथा वेदांनी वर्णिली आहे....' '.... गाय, बैल, बकऱ्या, मेंढ्या, घोडे व उंट यांचा मांसाकरिता उपयोग होत असे.' असा उल्लेख तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या 'वैदिक संस्कृतीचा विकास' या ग्रंथातही आहे .यज्ञात गायीचा बळी दिला होता . 'बृहस्पतीला हिस्सा मान्य नसल्यामुळे त्याने यज्ञात पिष्ट-पशूचा बळी देण्याचा प्रस्ताव ठेवला परंतु वेदिकांना ते मान्य झाले नाही' असे भीष्माचार्यांनी युधिष्ठीरला सांगितले होते, असे डॉ.आ.ह.साळुंखे यांनी 'आस्तिक शिरोमणी चार्वाक' या ग्रंथात महाभारतातील शंतीपर्वाचा दाखला देऊन सांगितले आहे . गोमांस भारतीयांना निषिद्ध नव्हते .उलट, गोमांसाचे पदार्थ कसे करावेत हेही ज्यांना हिंदू लोक धर्मग्रंथ मानतात त्यात सांगितले आहे.

बॅ.मुकंदीलाल 1944 पर्यंत उच्च न्यायालयाचे न्यायाधीश होते .त्यांनी बौद्ध धर्माचा 1956 मध्ये स्वीकार केला आणि 'गाय' या विषयातील ते गाढे विद्वान मानले जातात .आनंदाच्या घटनांच्या वेळी म्हणजे जन्म, विवाह, पाहुण्यांचे आतिथ्य अशा वेळी आणि मृत्युच्या संबंधातील विधीच्या वेळीही 'गोमेध' केला जावयाचा .अशा प्रसंगी गायीचा सर्रास बळी दिला जात होता .गायीच्या मांसाचा मोठ्या प्रमाणात व्यापार होत असे आणि गोमांस ब्राम्हणांसह सर्वचजण खात होते .कौटिल्याच्या अर्थशास्त्रातही ब्राम्हण गोमांस खात होते याचे पुरावे आहेत, असे मुकंदीलाल यांनीही म्हटले आहे.

प्राचीन काळीच गायींचा बळी देणे आणि गायीचे मांस खाणे ही प्रथा होती असे नाही, तर इ.स.दहाव्या शतकापर्यंत भारतात सर्रासपणे गोमांस खाल्ले जात होते .गाय हा प्राणी दहाव्या शतकापर्यंत आजच्यासारखा पवित्र मानला जात नव्हता .ख्रिस्तपूर्व 3000 वर्षांपासूनची भारतीय संस्कृती आहे .मध्य आशियातून आलेल्या आर्यांच्या टोळ्यांनी मोहेंजादारो व हरप्पा येथील प्रगत संस्कृतीचा विध्वंस केला . इतिहास संशोधकांना या संस्कृतीवर प्रकाश टाकणारे पुरावे मिळाले .त्यात तेराकोट्टा चित्रे आहेत .या चित्रांत, प्रतिकृतीत कोठेही गाय नाही .बैल, हत्ती, घोडे, उंट, कुत्री, हरणे, माकडे या प्राण्यांची चित्रे-प्रतिकृती मिळाल्या .इतकेच काय तर विंचूही तेराकोट्टा चित्रांत पाहावयास मिळतात .पण गायींची प्रतिकृती नाही. याचे कारण हेच आहे की हे प्राणी त्यावेळी भारतीय संस्कृतीला महत्वाचे वाटत होते. गाय ही महत्वाची वाटत नव्हती .ज्याचा उपयोग असतो त्याचेच महत्व निमार्ण होते. ज्या प्राचीन भारतीय संस्कृतीचा

अभिमान बाळगला जातो त्या संस्कृतीत गायीला महत्वाचे स्थान नव्हते .मग ती पवित्र मानण्याचा किंवा पवित्र असण्याचा प्रश्न त्या काळात निमार्ण होत नाही.

प्राचीन काळात नाण्यांचा वापर सुरू झाला, त्यांवरही इतर प्राण्यांची चित्रे कोरलेली आहेत .पण गायीचे चित्र त्यावर नाही .इंडो-ग्रीक नाण्यांवर गरूड आहे .ख्रि.पू.330-325 वर्षांच्या काळातील नाण्यांवर घुबडे कोरलेली आहेत .ख्रि.पू.300 सालातील नाण्यांवर हत्ती आहे .मात्र नाण्यांवर गाय नाही .गाय पवित्र मानली गेली असती व गाय ही माता समजली असती तर घुबडा-गरूडाऐवजी एखाद्या नाण्यावर तरी गायीचे चित्र कोरले गेले असते .पाळीव प्राण्यांत गायीला भारतात स्थान नव्हते .बळीसाठी, गोमांसाकरीता गायीचा उपयोग होत होता .ऋग्वेद काळापासून गाय इतर प्राण्यांच्याबरोबर येऊ लागली . इराणीयन आर्यात गायीला विशेष महत्व दिले जात असे .गोमूत्र व गायीचे शेण झोरस्ट्रियन्स पवित्र मानीत .पुढे हिंदुही गोमूत्र व गाईच्या शेणाला विशेष महत्व देऊ लागले) .काऊ कल्ट इन इंडिया : मुकुंदीलाल (महाभारताच्या काळानंतर भारतात गायीची उपयुक्तता वाढली आणि गाय हा पाळीव प्राणी झाला .तरीही महाभारतात गोमेध यज्ञ आणि गायी मारण्याचा उल्लेख आहे .राहुल सांकृत्यायन यांनी महाभारतातील वनपर्व, द्रोणपर्व व शांतीपर्वात गायी मारण्याचा उल्लेख असल्याचे दाखवून दिले आहे . सांकृत्यायन यांनी वनपर्वातील श्लोक दिला आहे .त्याचा अर्थही त्यांनी सांगितला आहे .तो असा ...हे ब्रम्हन् राजा रांतीदेवाच्या पाकखान्यात रोज दोन हजार गायी मारल्या जातात ....राजा रांतीदेवाला गायीचे मांस फुकट वाटण्यात आनंद व पुण्यकर्म वाटत होते .गोमांसाचे पदार्थ व गोमांस राजा रांतिदेव लोकांना वाटत असल्यामुळे इतक्या गायी त्याच्या काळात मारल्या जात होत्या .माळव्याचा राजा रांतिदेव याने मोठ्या प्रमाणावर गायी मारल्या .त्यामुळेच गायीचे महत्व नंतरच्या काळात वाढत गेले . गायीची उपयुक्तता अधिक जाणवू लागली .महाभारताच्या वनपर्वात राजा रांतिदेव याने मारलेल्या गायींचा उल्लेख आहे .यावरून महाभारताच्या काळात व त्यानंतरच गायीचे महत्व वाढत गेले हे स्पष्ट होते .राजा रांतिदेव याने ज्या प्रकारे गायी मारल्या त्यामुळे दुभत्यासाठी गायी कमी पडू लागल्या असणार! त्यामुळे महाभारत काळापासून गायीला महत्व येत गेले .तरी गायीची ‘गोमाता’ होण्यास त्यानंतरचा बराच काळ उलटावा लागला!

**राज्यारोहणाच्या वेळी गायीच्या कातड्याचे आसन**

सार्वजनिक ठिकाणी प्राचीन काळी गायी मारून गोमांसाची विक्री केली जाईच !पण शुभ समारंभाच्या वेळी गाय किंवा तिचा गोवंश असलेला बैल मारला जावयाचा विवाहाच्या प्रसंगी बैल मारून त्याच्या ताज्या ताज्या सोललेल्या कातड्यावर वधू-वरांना बसविले जाई .राज्यारोहणाच्या वेळी राजालाही मारलेल्या गायीच्या किंवा बैलाच्या नुकत्याच सोललेल्या कातडीवर बसविले जात असे .नेपाळचे राजे महेंद्र यांचा राज्यारोहण समारंभ झाला तेव्हा पाकिस्तानमधून गायीचे ताजे कातडे विमानाने आणले होते .ही घटना 5 मे 1956 रोजीची आहे .नेपाळचा राजा हिंदू आहे .आणि हिंदू राजांच्या राज्यारोहणाच्या प्रथेनुसार राजे महेंद्र यांचा राज्यारोहण समारंभ पार पडला होता .राजे महेंद्र यांच्या राज्यारोहणाची ‘टाईम्स ऑफ इंडिया’त तेव्हा बातमी प्रसिद्ध झाली होती, ती अशी ....“राजे महेंद्र यांच्या राज्यारोहणासाठी पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री हिमदुल हक चौधरी यांच्याबरोबर गायी-बैलाचे नुकतेच सोकलेले कातडे आणले गेले होते हे फार थोड्या लोकांना माहिती होते .नेपाळ सरकारला वाघ, बिबट्या, सिंह, मांजर, चित्ता, पँथर यांची कातडी मिळवणे कठीण नाही .परंतु नेपाळमध्ये गोवंशाचे तांबूस-काळे कातडे मिळवणे फारच अवघड आहे .राज्यारोहणाकरिता अशा कातड्याची आवश्यकता ही दोनशे वर्षांची परंपरा आहे .ही गरज पाकिस्तानच भागवू शकत होते .पाक सरकारने तलवारीसह राजे महेंद्र यांना हा नजराणा दिल्यामुळे राज्यारोहण समारंभ पार पडला.” (टाईम्स ऑफ इंडिया, 6 मे1956)

गोवंशाची वाटेल तशी हत्या केली जाऊ नये म्हणून गायी मारण्याकरिता कौटिल्याने गायींची वर्गवारी केली .मांसल गाय मारावी; पण दुभती व गाभण गाय मारली जाऊ नये असा दंडक कौटिल्याने घालून दिला होता .बौद्ध साहित्यात गायीचे कातडे सोलणाऱ्या 'गोघटका'चा वारंवार उल्लेख आहे .'गोघटका' म्हणजे गायीचे कातडे सोलणारा .बौद्ध काळातही गायीचे मांस खाल्ले जात होते .इतके काय पण बुद्धानेही गोमांस खाल्याचा उल्लेख बौद्ध व जैन साहित्यात आहे .याचे दाखले राहुल सांकृत्यायन व बौद्ध धर्म स्वीकारलेले मुकुंदीलाल यांनी दिले आहेत .कोणते प्राणी खाल्ले जाऊ नयेत याची प्राचीन काळी यादी तयार केली होती .त्यात हत्ती, घोडा, साप, सिंह, वाघ, तरस व माणूस यांचे मांस खाऊ नये असे 'विनयपिटका'मध्ये दिलेल्या यादीत म्हटले आहे .या यादीत गोमांसाचा उल्लेख नाही, हे लक्षात घेण्यासारखे आहे .बुद्धाच्या काळात एखाद्याच्या अतिथ्यासाठी मुद्दाम गाय मारण्यास प्रतिबंध होता .पण विक्रीकरीता दुकानात ठेवलेले गोमांस आणून खाण्यास प्रतिबंध नव्हता .तिबेटमध्ये अद्यापही ही प्रथा आहे .मी स्वत :ईशान्य भारत, आसाम व पश्चिम बंगालच्या दौऱ्यावर असताना कामरूपची सीमा ओलांडून भूतानच्या हद्दीत गेलो .तेथे कामरूप-भूतान यांच्या सीमेवर गायी-बैलांच्या मांसाची दुकाने व कत्तलखाने होते .तेथून मांस भूतानमध्ये नेले जात होते .मी यासंबंधी चौकशी केली तेव्हा भूतानमध्ये बौद्ध धर्म असल्यामुळे तेथे जनावरे मारली जात नाहीत. पण मारलेल्या जनावरांचे मांस नेण्यास भूतानमध्ये प्रतिबंध बौद्ध धमार्ने केलेला नाही असे सांगितले होते .त्यांचा संदर्भ बुद्धाच्या काळातील वरील प्रथेशी आहे हे नंतर कळून आले .निदान माझी तशी समजूत आहे .हिंदूमधील वरिष्ठ जातीने दहाव्या शतकापासून गोमांस खाण्याचे बंद केले .पण त्यानंतर काही काळ खालच्या जातीत गोमांस खाल्ले जात होतेच !उत्तर रामचरितामध्ये वाल्मिकींच्या आश्रमातील सांघटकी व थंडायन यांचा संवाद आहे .त्यातही अतिथीला गोमांस, कालवडीचे मांस खाऊ घालण्याची प्रथा आहे असे म्हटले आहे . भवभूतीनेही ब्राम्हण गोमांस खात असा उल्लेख केला आहे .स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर यांनीही 'गाय माता नव्हे, देवता तर नव्हेच नव्हे, गाय उपयुक्त पशू आहे.' असे म्हटले आहे .मात्र गौतम बुद्धाने गायीची तुलना माता-पिता, बंधू, मित्र यांच्याशी केली होती .तरीही बुद्धाच्या काळात गोहत्या सार्वत्रिक होत होती .ब्राम्हणांना गोमांस खाऊ घालण्यासाठी राजा रांतिदेव दोन हजार गायी मारत होता. (काऊ स्लॉटर : संपादक - अ.भि.शहा)

शेतीला आणि दुभत्यासाठी बैल-गायी यांचीच अधिक उपयुक्तता आहे, याची खात्री झाल्यावर बुद्ध व अशोकाने गायींच्या संरक्षणाची दक्षता घेतली. पण महाभारतापासून गायीला महत्व प्राप्त होऊ लागले होते .अशोकाच्या काळात गायीची हत्या बंद करण्याचा प्रयत्न सुरू झाला .आपल्या साम्राज्यात अशोकाने गोहत्याबंदी केली .मुस्लिमांच्या आगमनानंतर सुफी पंथाचे लोक गायीला मानू लागले पण मुस्लिम सत्ता स्थिरावली आणि काही मुस्लीम सत्ताधारी आक्रमकपणा धारण करू लागले .मग त्यांनी हिंदूंना पवित्र वाटणारी गाय मारण्याचे तंत्र अवलंबले .कर्मठ, सनातनी हिंदूंनी मुस्लिम गोमांसभक्षक आहेत .यावर भर दिला आणि गायीला 'गोमाता' म्हणून पवित्र मानण्यास सुरवात केली .ते गाय पवित्र मानू लागले .तेव्हा आक्रमक मुसलमान सत्ताधारी व त्यांच्या जवळच्या लोकांनी गाय हे 'लक्ष्य' केले . शेती करणाऱ्या मुसलमानालाही हिंदूइतकीच गायीची उपयुक्तता आहे व ती त्याला तशी वाटतेही .त्याच दृष्टीने मुसलमानांनी गायीकडे पाहिले पाहिजे .आणि हिंदूनीही, गाय उपयुक्त आहे; पण वैदिक काळापासून गायीचा बळी दिला जात होता, सर्रासपणे आणि ब्राम्हणांसह आणि सारेजण दहाव्या शतकापर्यंत गोमांस खात होते .यज्ञात गायीचा प्रत्यक्ष बळी देण्याचे बंद झाल्यावरही पिठाची, कणकेची गाय करून तिचा प्रतिकात्मक बळी आजही दिला जातो, हे सर्व विसरता कामा नये !अबनींद्रनाथ टागोर यांनी मुकुंदीलाल यांना बंगालमधील घटना पत्र पाठवून सांगितली होती .इंग्रजांच्या आगमनानंतर

शिक्षण, नवे विचार, सुधारणा यांचे वारे सुरू झाले. तेव्हा सुधारणावाद्यांनी बंगालमध्ये पुन्हा मुद्दाम गोमांस खाण्यास सुरवात केली. त्याचा परिणाम असा झाला की, कर्मठांनी गायीला देवता मानण्यास सुरवात केली .आनंदमठ कादंबरीमुळे राष्ट्रमातेचे देवतेसारखे काल्पनिक चित्र रेखाटले गेले .तसेच गायीचे 'गोमाता' म्हणून प्रस्थ वाढविले होते.

**गाय हा उपयुक्त पशूच!**

शेतीच्या दृष्टीने गाय हा उपयुक्त प्राणी आहे तिच्या वंशाची सर्रास हत्या करण्याचा विचार सोडून उपयुक्ततेच्या दृष्टीने तिच्याकडे पाहिले पाहिजे .ज्या मुस्लीम माणसाची जमीन आहे आणि जो शेती करतो त्याला हे सांगण्याची आवश्यकता आहे असे नाही! धर्मांध मुस्लीम गायी मारून हिंदूंना डिवचतो आणि धर्मांध हिंदू मुसलमान सर्रासपणे गायीच मारतात असा प्रचार करतात .हीच भावना वाढीस लावण्यासाठी मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी गोवंश हत्या बंदीचा कायदा करणार अशी घोषणा केली होती .बाबराने फर्मान काढून गोहत्याबंदी केली होती .सिकंदरचा दुसरा मुलगा झेनुल ऐबिद्दिन (1417- 69) यांने काश्मिरमध्ये गोहत्याबंदी केली होती. (प्रा.प्र.बा.गजेंद्रगडकर) अहवाल ही बंदी आजही लागू आहे .काश्मिरमध्ये, बौद्ध व जैन धमाच्या उदयानंतर तीनशे वर्षे भारतात, गोमांस खाल्ले जात होते .बृहदारण्यक उपनिषदात गोमांसाचा कशा पद्धतीने पुलाव करावा हे सांगितले आहे. ('काऊ स्लॉटर' या पुस्तकाला अ.भि.शहा यांनी लिहिलेल्या प्रास्ताविकातून )

गोहत्या बंदीसंबंधात काही वर्षांपूर्वी अर्थतज्ञ डॉ.वि.म.दांडेकर यांनी अर्थशास्त्रीय दृष्टिकोनातून विस्ताराने विवेचन केले होते .त्या वेळी डॉ.दांडेकर यांनी उपस्थित केलेले प्रश्न आजही कायम आहेत....

1. लोकसंख्यपेक्षो जनावरांची संख्या एक दिवस अशा बंदीमुळे जास्त झालेली असेल, लोकसंख्या मर्यादित राहावी, पण जनावरांची संख्या वाढावी असे गोहत्याबंदीचा आग्रह धरणारांना वाटते काय?
2. लोकसंख्या व जनावरांची संख्या दोन्ही बरोबरीने वाढतच राहावी असे गोहत्याबंदीवाल्यांना वाटते काय? तसे झाले तर आपली सारी साधनसामुग्री जनावरांवरच खर्च होऊन माणूस व जनावर यात फरक राहणार नाही .
3. गोहत्याबंदी करावयाची, पण गायी व जनावरे यांची संख्या वाढू द्यावयाची नसेल तर मानवी कुटुंब नियोजनासारखे उपाय गायी जनावरांकरिताही योजावे लागतील, गायींनाही लूप बसविले तर त्यांना कालवडी-गोऱ्हे होणार नाहीत त्यामुळे त्यांची संख्या मर्यादित राहील .पण गायींना कालवडी -गोऱ्हेच झाले नाहीत तर गाय दुधच देणार नाही .आणि मग दूध न देणाऱ्या गायींचेही पोट भरीत बसवायचे काय?

दांडेकर यांनी हे प्रश्न करण्यापूर्वी, शंभर माणसांमागे पन्नास जनावरे असे प्रमाण पडते, तसेच लोकसंख्या वाढीचा वर्षाचा वेग अडीच टक्के आहे, आणि जनावरांच्याही वाढीचा वेग तेवढा आहे असे म्हटले आहे .एका एकरावर 370 माणसे हे प्रमाण आहे .जनावरांच्या वाढीमुळे माणसांना जागाच शिल्लक राहणार नाही हे त्यांनी सप्रमाण ममांडले आहे .शेतीची जमीन व पाणी मर्यादित आहे .वाढत्या प्रमाणावरील लोकसंख्या व जनावरे यांची गरज त्यावर पूर्ण होणार नाही .साधनसामग्रीचा विचार करता लोकसंख्या व जनावरांच्या वाढीवर मर्यादा ही घालावीच लागेल .गोहत्याबंदी केली आणि त्यांची अंमलबाजवणी चोख झाली तर चांगल्या जनावरांना पाणी व चारा यांचा पुरवठा करण्याचा प्रश्न निमार्ण होईल .आणि एक तर चांगल्या जनावरांना चारा पाणी द्यावे लागेल .यात लोकांचेच नुकसान आहे, चांगल्या चाऱ्याअभावी कमी दूध मिळेल; भाकड, लंगड्या-पांगळ्या व रोगट जनावरांना कमी प्रमाणात चारा-पाणी देऊन त्यांना अर्धपोटी ठेवून जगवावे लागेल. अशी जनावरे जगवणे हे प्रत्यक्ष हत्या करण्यापेक्षा क्रूर व पापीपणाचे ठरेल !भाकड जनावरे गोशाळेत पाठवून त्यांची तेथे देखभाल करावी असा

पर्याय गोहत्याबंदीवाल्याकडून मांडला जाईल .पण गोशालांचा खर्च कोणी, कसा करावयाचा? आज वृद्ध माणसांच्या वृद्धापकाळातील व्यवस्था करण्यासाठी पैसा नाही .आणि भाकड जनावरांकरिता, त्यांची देखभाल करण्याकरिता पैसा खर्च करणे यात कोणती मानवता आहे...? माणसांकडे दुर्लक्ष, त्यांच्यावर खर्च करावयाचा सोडून भाकड जनावरांवर खर्च करणे शहाणपणाचेही नाही आणि मानवेतेचेही नाही. गायीला 'गोमाता' म्हणतो, पण भारतातील गायींची काय अवस्था आहे? गायीला 'गोमाता' मानणाऱ्या भारतातील गायी संबंध दिवसात जेमतेम लिटर, दीड लिटर दूध देतात आणि गोमांस खाणाऱ्या पश्चिमी देशांतील गायी धष्टपुष्ट असून त्या रोज 75 ते 90 लिटरपर्यंत दूध देतात .सर्वच गायी-बैलांना उपाशी मरू द्यावयाचे की निरूपयोगी झालेल्या जनावरांना कत्तलखान्यात पाठवायचे, यापैकी कशाची निवड करणार? गोहत्याबंदी झाली की, त्यांचे प्रमाण वाढत जाईल आणि तेवढ्यांना पुरेसा चारा पाणी उपलब्ध होणार नाही. त्यामुळे सर्वच चांगल्या व भाकड जनावरांना अर्धपोटीच जगवावे लागेल .त्याचा परिणाम दुधावर व बैलाच्या कार्यक्षमतेवर झाल्याशिवाय राहणार नाही .म्हणून चांगल्या गायी-बैलांकरिता चारा-पाण्याची व्यवस्था करून त्यांचा जास्तीत जास्त उपयोग करून घेणे आणि भाकड व रोगी जनावरांना उपाशी, अर्धपोटी ठेवून त्यांचे हालहाल करीत त्यांना मारण्यापेक्षा कत्तलखान्याकडे पाठविणे देशाच्या दृष्टीने अधिक कायद्याचे होईल .गायीला माता मानले की, मग काही जण आईवडील वृद्ध झाले की मग त्यांना आपण मारतो का? असा प्रश्न करतात !म्हणून स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यासारख्या नेत्यालाही गाय ही माता नाही .गाय एक उपयुक्त प्राणी आहे असे सांगावे लागले.

काही राज्यांनी गोहत्याबंदी केली आहे .पण ते सर्व कायदे सारखे नाहीत .वेगवेगळ्या राज्यांत वेगवेगळे कायदे आहेत .उत्तर प्रदेशात संसर्गजन्य रोग झालेले गाय, बैल, कालवड, गोऱ्हे यांचा अपवाद करता गोवंशाची हत्या करण्यास बंदी आहे .बिहारमध्ये दुभत्या व उपयुक्त असणाऱ्या गोवंशाची हत्या करण्यास बंदी आहे .महाराष्ट्रात गोवंशहत्या-बंदी कायदा करण्यापूर्वी ज्या राज्यात गोवंश हत्याबंदी आहे तेथील परिस्थिती काय आहे याची पाहणी करावी .गोवंशहत्या बंदी असलेल्या राज्यांतील चांगल्या गायी-बैल, कालवडी -गोऱ्हे यांचे अन्नपाणी भाकड व रोगट गायी-बैल मारण्यास ज्या राज्यांनी मुभा ठेवली आहे त्या राज्यांतील परिस्थिती कशी, याचाही तुलनात्मक अभ्यास करावा !गोवंशहत्या बंदी ही मुसलमानांची जिरवणारी कारवाई आहे, असल्या भावनेतून पाहून कायदा केला जाऊ नये . मुसलमानांनीही गाय-बैल यांची उपयुक्तता लक्षात घेऊन भाकड जनावरांची हत्या करण्याची मागणी करावी .हिंदूंना खिजवण्याच्या, चिडवण्याच्या भूमिकेतून गायींची हत्या करू नये .वैदिक काळापासून इ.स.दहाव्या शतकापर्यंत ब्राम्हणांसह सर्वजण गोमांस खात हाते .गायीची उपयुक्तता लक्षात आल्यानंतरही भारतात मुसलमान येण्यापूर्वीपासून हिंदू गायींची सर्रास कत्तल करीत होते .यज्ञात गायींचा बळी देत होते .वैदिक काळ ही भारताची संस्कृती असे मानावयाचे पण त्या संस्कृतीत गोमांस ब्राम्हणही खात होते, गायीचा हिंदूही बळी देत होते याचा स्वीकार करावयाचा नाही यात अज्ञानापेक्षाही ढोंगीपणाचाच भाग आहे....

अ.नि.वार्तापत्रच्या (ऑगस्ट – सप्टेंबर 1995) सौजन्याने

●●●

# गोहत्या बंदी कायदा: एक पाउल मागे!

*अशोक गर्दे*

गेली दोनशे वर्षे सामाजिक व राजकीय सुधारणा करण्यात अग्रभागी असलेल्या आणि सतत प्रगतीपथावर चालणाऱ्या महाराष्ट्राने आता एक पाउल मागे टाकले आहे. हे नकळत घसरलेले पाउल नसून हा बुरसटलेल्या विचारांचा एक मोठा दुष्परिणाम आहे. गोहत्या बंदीचा कायदा आणून आणि गाय मारणाऱ्याला शिक्षा फर्मावून महाराष्ट्राने काय मिळवले? या एका फटक्याने भारतीय धर्मनिरपेक्षतेला आणि शास्त्रीय तर्काधिष्ठित विचारांना फाटा दिला! 'हिंदू धर्माचे रक्षण केले' असे ही म्हणता येत नाही, कारण हिंदूंच्या (माझ्या) धर्मशास्त्रामध्ये कोठेही 'गोमांस खाऊ नये' असे सांगितलेले नाही. कुठलेही "श्रुति-स्मृति-पुराणोक्त "वचन असे म्हणत नाही की गाय मारू नका व गोमांस खाऊ नका. गाय या प्राण्याला पवित्र मानणे व गोमांस न खाणे ही एक रूढी आहे, परंपरा आहे. ही रूढी पाळावी की नाही हे ठरवायचे स्वातंत्र्य व्यक्तीचे आहे, ही धर्माची सक्ती नाही. असे असूनही इतर धर्मीयांनी पण गोहत्या करून गोमांस खाऊ नये असा कायदा कारणे राष्ट्रहितासाठी –अगदी हिंदुराष्ट्रासाठी पण –आणि समाजहितासाठी अयोग्य, असमर्थनीय व अनर्थकारी आहे.

**धर्माचे अधिष्ठान नाही**

विसाव्या शतकाच्या मध्यावर घडलेल्या एका घटनेला उजाळा देऊ या. श्री अ.भि. शहा या पुण्यातील प्रखर बुध्दीवादी गृहस्थाने पुरीच्या शंकराचार्यांना आव्हान दिले. हिंदू धर्म परंपरेचे उत्तम प्रतीक असणाऱ्या वाद-प्रतिवाद प्रक्रियेनुसार समोरासमोर बसून इतर अनेकांच्या उपस्थितीत नक्की करूया, की आपल्या हिंदू धर्मात गोहत्या निषिद्ध आहे की नाही. उभयपक्षी केवळ शास्त्र ग्रंथांचा (श्रुति-स्मृति–पुराण यांचा) संदर्भ आपापले म्हणणे सिद्ध करण्यासाठी द्यावयाचा. इतर कुठलाही नाही. शंकराचार्यांनी आव्हान स्वीकारले. अ.भि.शहांनी एक उपयुक्त सूचना केली,"आपण हा सर्व संवाद ध्वनिमुद्रित करू या. असे केल्याने कुठल्याही पक्षाला 'मी असे म्हटलेच नव्हते' असे सांगता येणार नाही व हा महत्वाचा संवाद सर्व जनतेपर्यंत पोहोचविता येईल." शंकराचार्यांनी चक्क माघार घेतली! अ. भि. शहांनी एक सुंदर पुस्तक लिहून या प्रश्नाला निर्णायक उत्तर दिले. On the Horns of a Dilemma या त्यांच्या पुस्तकातून त्यांनी गोहत्या बंदीचा सर्व बाजूनी विचार केला व दाखवून दिले की सामाजिक व आर्थिक दृष्टीने गोहत्याबंदी करणे अयोग्य आहे.

चारही वर्णांचे स्त्री पुरुष रामायण काळात केवळ मांसाहारीच नव्हते, तर गोमांस खाणारे पण होते याला पुरावा वाल्मिकी रामायणात मिळतो. वल्कले नेसून वनवासाला निघालेले राम-लक्ष्मण-सीता जेव्हा सरयू नदी होडीत बसून ओलंडत होते, तेव्हा सीतेने केलेली नदीची प्रार्थना पहा," माते, आज आम्ही वनवासास निघत साल्यामुळे तुला योग्य असे अर्घ्य मी देऊ शकत नाही याबद्दल क्षमा असावी. परंतु जेंव्हा आम्ही परत येऊ तेंव्हा मी तुला मांस आणि भाताचे मोठे दान करीन." रामाने वालीची बाण मारून हत्या केली, त्यावेळी वाली मरण्यापूर्वी रामाला हत्या करण्याचे कारण विचारतो. चार पाच संभाव्य कारणापैकी एक असे आहे. " 'मला मारून खाता यावे' हे कारणही असू शकत नाही, कारण ब्राहमण व क्षत्रियांना निषिध्द असे पांचच प्रकारचे मांस आहे. त्यांत 'नखे असलेले प्राणी' पण आहेत, आणि मी वानर हा तर नखे असलेला प्राणी आहे." या पांच प्रकारच्या मांसांमध्ये खुर असलेया प्राण्यांचा समावेश नाही; म्हणजेच गोमांस निषिद्ध नव्हते. जे ब्राहमण क्षत्रियांना निषिद्ध नव्हते ते अर्थातच वैश्य आणि शूद्रांना पण निषिध्द नव्हते.

भगवद गीतेमध्ये सात्विक, राजस व तामस आहाराचा उल्लेख आहे तो अत्यंत वाचनीय आहे. सात्विक आहार हा सौम्य व स्निग्ध इत्यादी असतो, तर तामसिक हा तीक्ष्ण, कडू, तिखट इत्यादी असतो. कुठेही

मांसाहार राजस अथवा तामस असतो असे भगवान श्रीकृष्णाने पण म्हटले नाही. मनुस्मृती मध्ये स्पष्ट श्लोक आहे, " मांस खाणे, दारू पिणे आणि संभोग करणे यात काहीही दोष नाही; कारण ही सर्व प्राणीमात्राची साहजिक -नैसर्गिक - प्रवृत्ती आहे."

**नीतीकल्पनेत बसत नाही**

सुसंस्कृत समाजात व्यक्तींनी परस्परांशी कसे वागावे, काय करावे व काय करू नये हे नीतीमत्ता ठरवते. नीतीमत्तेची भिन्न पण परस्पर संबंधित अशी तीन अंगे आहेत: सदवृत्त (ethics), सदाचार (morals) व कायदा (laws). सद्‌वृत्ताची व्याख्या सरळ व सोपी आहे."समजा अ या व्यक्तीने स्वतःच्या सुखासाठी क ही कृती केली, की जिचा व्यक्ती ब वर कांही परिणाम होतो. हीच कृती क जर व्यक्ती ब ने केली, तर व्यक्ती अ सुखी राहील का? उत्तर 'हो' असल्यास कृती क ही सद्‌वृत्ताला धरून आहे, 'चांगली' आहे. उत्तर 'नाही' असल्यास कृती क 'वाईट' आहे." उदाहरण: 'मी तुमचे रु 1000 चोरले तर मी खुष, पण तुम्ही माझे घेतलेत तर मी नाखूष "म्हणून 'चोरी' सदवृत्त नाही. सदाचाराची व्याख्या आणखीनच सोपी आहे: जे जे करू नये अथवा करावे असे व्यक्तीच्या मनावर लहानपणापासून ठसविले जाते त्या सर्वांची बेरीज म्हणंजे सदाचार. जेंव्हा समाजाला/राष्ट्राला कांही संकेत सक्तीचे करावे असे वाटते तेंव्हा ते राष्ट्र तसा कायदा करते. कायदा मोडणारा शिक्षेस पात्र ठरतो. थोडक्यात सांगायचे म्हणजे सदवृत्त सर्व जगभर काल निरपेक्ष लागू असते, सदाचार संस्कृति सापेक्ष असतात व कायदा हा राष्ट्र अथवा प्रांत यावर अवलंबून असतो.

'माणसाने वागावे कसे' याचे उत्तर 'सदवृत्ताला धरून' असे आहे. वेगवेगळ्या धर्मांचे 'सदाचार' वेगळे असतात हे आपण सर्वच जाणतो. यातील बरेच सदाचार सद्‌वृत्तात मोडत नाहीत: कांही सद्‌वृत्ताविरुद्ध असतात तर काही तटस्थ असतात. हिंदू धर्मातील 'स्पृश्य-अस्पृश्यता मानणे ' हा सदाचार आपण हजारो वर्षे पाळत आलो होतो, पण तो सद्‌वृत्ताला धरून नसल्याने आपण तो सोडून दिला आहे, हो न? केवळ परंपरेने, रूढीने, काहीच सिद्ध होत नाही, समर्थनीय होत नाही. जैन मंडळी बटाटे व कांदे खात नाहीत, कारण त्यांच्या धर्माचा तो सदाचार आहे. सद्‌वृत्ताच्या दृष्टीने 'बटाटे खाणे' हे तटस्थ आहे. ('व्यक्ती अ ने बटाटे खाल्ले, तर व्यक्ती ब वर काहीच परिणाम होत नाही!) 'माणसाने माणूस खाणे' सोडल्यास बाकी सर्व 'खाणे' हे सद्‌वृत्ताने तटस्थ आहे. जो नियम बटाट्याला तोच गोमांसाला पण लागू होतो, नाही का?

**धर्म निरपेक्षता तुटते**

धर्म निरपेक्षता म्हणजे सरकारने कुठल्याही धर्माला (religion या अर्थी) शासनात स्थान न देणे, कुठल्याही एका धर्मानुसार कायदे न करणे, व आपापल्या धर्मानुसार वागण्याचे प्रत्येक नागरिकाला स्वातंत्र्य देणे. अर्थात, एकाद्या धर्माचा 'सदाचार' जर सद्‌वृत्ताला सोडून असेल तर तो कायद्यानुसार निषिद्ध ठरवणे हे पण धर्म निरपेक्षतेत अंतर्भूत आहे. म्हणूनच तर 'अस्पृश्यता पाळणे' हा गुन्हा ठरवला गेला आहे. 'गोमांस खाणे' हा हिंदुंचा सदाचार आहे; मुसलमान, ख्रिस्चन, बौद्ध, पारशी इत्यादींचा नाही. आणि हा हिंदू सदाचार सद्‌वृत्ताच्या दृष्टीकोनातून तटस्थ आहे. अशा तटस्थ प्रकाराबाबत कायदा कारणे हे चूक आहे. अशा कायद्यामुळे इतर धर्मीयांच्या स्वातंत्र्यावर कारण नसताना –त्यांच्या गोमांस खाण्याने हिंदूंचे काहीही बिघडत नसताना –अंकुश घातला जातो; हे धर्म निरपेक्षित नाहीच नाही.

**अंधश्रद्धेला खतपाणी**

आपण गायीचे दूध पितो म्हणून गाय जर पूजनीय, तर म्हैस का नाही तशीच पवित्र? गाय आपली माता, तर म्हैस का नाही? आणि कोणी जर बकरीचे अथवा उंटीणीचे दूध पीत असेल तर बकरी आणि उंटीण पण पूज्यच नाही का? 'गाय' वंदनीय आहे हे 'सिद्ध' करायला किंवा या रूढीचे समर्थन करायला

जे जे सांगितले जाते ते इतके लटके असते की ते सांगणारा पण कसा बसा त्यावर विश्वास ठेवायचा प्रयत्न करीत असतो हे ऐकणाऱ्याला कळते. ‘पाल अंगावर कुठे पडली की काय वाईट होते’ ह्यावर विश्वास ठेवणे ही जशी अंधश्रध्दा, तशीच गाय वंदनीय मानणे ही पण आहे हे लक्षात घ्यावे.

**प्रजातंत्रावर आघात**

लोकशाही म्हणजे प्रजा-तंत्र; लोकांसाठी लोकांनी निवडलेले सरकार लोकांसाठी चालवायचे असते. आणि राज-धर्म असे सांगतो की सर्व प्रजानन एकाच मापात तोलावयाचे असतात. कोणालाही वरचढ ठरवून त्यांच्या वागण्याच्या पद्धतीप्रमाणे इतर कोणालाही वागावे वागावे लागू नये. अर्थात कुठेही सद्‌वृत्ताचे उल्लंघन न होऊ देता सर्वांना समान लागू पडणारे कायदे करावयाचे असतात. गोहत्याबंदी कायद्यामुळे भारतातील जवळपास 25-40 टक्के लोकांनी ( इतर धर्मीय 4-5%, हिंदूमधील अनेक जाती-जमाती 15-20% आणि अश्रद्ध 10-15%) ‘काय खावे’ या साध्या गोष्टीवर निर्बंध येतो. असे होऊ नये.

**व्यक्तीस्वातंत्र्यावर गदा**

व्यक्ती स्वातंत्र्याच्या अनेकविध संकल्पनांसाठी सर्व धर्माच्या भारतीयांनी गेली 200 वर्षे मोठा लढा दिला आहे. जातीमुळे नक्की ठरलेला व्यवसाय आता मोकळा झाला आहे; स्त्रीने शिकावे आणि पाहिजे तो व्यवसाय करावा हे सांगावे लगत नाही. स्त्री-पुरुष समानता व समान संधी इत्यादी स्वातंत्र्ये आता अंगवळणी पडत आहेत. अशा वेळी ‘काय खावे’ या फुटकळ विचारासाठी ‘धर्म-रक्षणाचा दावा’ करत निर्बंध घालणे हा व्यक्तीस्वातंत्र्यावरील हल्ला प्रजेने मंजूर करू नये. जर असे कायदे गुळमुळीतपणे मन मारत मानू लागलो, तर उद्या ‘लाल आहेत म्हणून टोमाटो खाऊ नयेत’ असा जैन धर्म-रक्षणाचा कायदा पण मानावा लागेल!

ज्यांना गोमांस खाऊ नये असे वाटते, त्यांनी ते खाऊ नये. ज्यांना खावेसे वाटते, त्यांनी खावे: मात्र न खाणाऱ्यानी स्वतःला ‘श्रेष्ठ’ मानू नये, व खाणाऱ्याना दोष देऊ नये हेच खरे व्यक्तीस्वातंत्र्य. “खाणे” सद्‌वृत्त्ताने तटस्थ आहे म्हणून येथे व्यक्तीस्वातंत्र्य योग्य आहे.

**आर्थिक नुकसान**

गोहत्या व गो-रक्षण या मुळे राष्ट्राचे तीन प्रकारे आर्थिक नुकसान होते. निर्यातीत घट, धंदा कमी,व भाकड गायी मरे पर्यंत पाळण्यावर होणारा अनाठायी खर्च. गोमांस (beef) निर्यातीत भारत जगात प्रथम क्रमांकावर (17% भाग) आहे हे सत्य बहुतेकांना माहीतच नसते. मात्र येथे नमूद करणे जरूर आहे की बीफ या शब्दात म्हशी-रेडे यांचे मांस पण असते. जसा कोंबडी पाळण्याचा धंदा भारतात फोफावला आहे, तसाच गायी व बैल पाळून त्या मांसाचा व्यापार करण्याने अनेकांना काम मिळेल व राष्ट्रीय संपत्तीत वाढ होईल. बैल हा शेतीसाठी उपयुक्त प्राणी हळू हळू टांग्याला वापरात येणाऱ्या घोड्यांप्रमाणे नाहीसा होत चालला आहे. यांत्रिक शेती वाढतच जाणार, कारण ती कमी खर्चिक होत आहे. त्यामुळे जन्माला आलेले सर्व बैल व दूध न देऊ शकणाऱ्या सर्व गाई पाळण्याचा खर्च करावा लागेल. हा खर्च तुम्ही आम्ही दिलेल्या करांतून होणार! कां? तर बहुजन समाजाची अंध-श्रद्धा!

**अनाथांची उपेक्षा**

हा गोरक्षणाचा खर्च खरे पाहता ‘मानव’ रक्षणासाठी केला गेला पाहिजे. अनेक अनाथ बालके, अनेक गरीब म्हातारे-म्हाताऱ्या व अनेक गरीब रुग्ण जगण्यासाठी धडपडत असताना त्यांच्या उपयोगी पडू शकणारा पैसा गायी-बैलांवर खर्च करण्यात काय ‘माणुसकी’ आहे? “दया धर्मस्य मूलम्” हे लक्षात घेऊन आधी माणूस व नंतर जनावरे रक्षावीत हेच योग्य, नाही का?

**परदेशात अवगणना**

सर्व धर्माचे भारतीय आज जगभर पसरलेले आहेत आणि साहजिकच त्यांत बहुतांशी हिंदू आहेत. या सर्वांना असे कायदे बुचकळ्यात पाडतात. त्यांचे समर्थन करणे अयोग्य तर वाटतेच, पण केले तरी ते तार्किक दृष्ट्या लंगडे पडते. भारताची प्रतिमा सर्व बाजूनी उजळत असताना अशा 'धार्मिक' कायद्यांमुळे ती डागाळली जात आहे. असे होऊ नये यासाठी राजकीय पक्षांनी सावध राहिले पाहिजे.

**समारोप**

विश्व हिंदू परिषद, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि इतर हिंदू संस्थांनी 'गोमाता पूजावी, गोमांस खाऊ नये' ही रूढी पाळावी असे हिंदूना सांगणे हा त्यांचा अधिकार आहे. मात्र हिंदुमहासभा स्थापन करणाऱ्या वि. दा. सावरकर या विज्ञाननिष्ठ विवेकवाद्यांनी " वेदांचा आदर करा, पण समाज व्यवस्था मात्र आधुनिक विज्ञानानुसार करा "असे स्पष्ट सांगितले होते. प्रखर हिंदुत्ववादी असूनही सावरकर यांचा हिंदूंच्या गोमांस भक्षणाला विरोध नव्हता हे पण लक्षात घ्यावे.

भारतीय जनता पक्षाला हिंदूंना गोरक्षण करावयास सांगावयाचे असेल, तर हा त्यांचा पण अधिकार आहेच. आणि असे ते सर्व धर्मीयांना पण सांगू शकतील. असा सल्ला अमलात आणावा की नाही, हा अधिकार मात्र व्यक्तीचा. हिंदू असो वा इतर धर्मीय, त्यांना कायद्याचा बडगा दाखविणे हे धार्मिक आततायीपणाचे लक्षण आहे. अंधश्रद्धा नाहीशा करण्यासाठी भारतात अनेक संस्था काम करीत आहेत. एक दिवस ही गायीविषयीची अंधश्रद्धा पण नाहीशी होईल. मात्र जोपर्यंत लोकसभेतील निदान 68% टक्के विधायक भारतीय राज्य घटनेतील एकमेव धर्मसापेक्ष कलम –गोरक्षणाचे – काढून टाकीत नाहीत, तोपर्यंत भारत 21 व्या शतकात, तर्काधिष्ठित शास्त्रीय विचारसरणीत, संपूर्णपणे शिरला आहे असे मानता येणार नाही.

ashokgarde@hotmail.com

●●●

# गोहत्या बंदीः सावरकर आणि विवेकानंद

*दत्तप्रसाद दाभोळकर*

वीर सावरकर म्हणालेत, 'गाय हा एक उपयुक्त पशू आहे; ती माता नव्हे, देवता तर नव्हेच नव्हे. एक समर्थ समृद्ध राष्ट्र उभे करावयाचे असेल, तर भाकड गाय अवश्य कापा.' वीर सावरकर असे म्हणाले, त्या वेळी वणीला भरलेल्या सनातन धर्म परिषदेने ठराव केला होता - "आज पेशवाई असती, तर त्यांनी या धर्मबुडव्या सावरकराला हत्तीच्या पायाखाली चिरडला असता." सावरकर यावर एवढेच म्हणाले होते, 'गाढवांच्या स्वप्नात पण उकीरडेच येतात.'

खरं तर या प्रश्नावर स्वामी विवेकानंदानी वीर सावरकरांच्याहून अदिक भेदक विचार व्यक्त केलेत. विवेकानंदावर मात्र त्यावेळीही टीका झाली नाही. आपली रणनीती आपले बंधू महेंद्रनाथ यांना सांगताना ते म्हणाले होते, 'धर्मवेडासारखा मानवी मनाला होणारा दुसरा भयावह रोग नाही. मी धर्माचे वेड पांघरलेला एक विचारवंत आहे.'

विवेकानंद ग्रंथावलीच्या तिसऱ्या खंडात पृष्ठ 7 वर विवेकानंदांच्या एका शिष्याने आपला अनुभव दिला आहे. तो अनुभव असा – विवेकानंद मठात बसले होते. त्यांना भेटायला मुंबईचे काही गोरक्षक आले होते. त्यांनी 'आम्हाला आशिर्वाद द्या' असे सांगितले. 'तुम्ही मंडळींनी या कामासाठी किती पैसे जमा केले आहेत?' असे विवेकानंदाने विचारले. त्यांनी रक्कम सांगितल्यावर विवेकानंद म्हणाले, 'आज मध्यप्रदेशात माणसे भुकेने मरताहेत. हे सर्व पैसे तिकडे पाठवा.' ती माणसे म्हणाली, 'तुम्ही सांगताय ते खरे. पण ती माणसे मरताहेत, काराँ आमचे धर्मग्रंथ सांगतात- त्यांनी गेल्या जन्मात पाप केले

होते.' यावर विवेकानंद म्हणाले, 'अरे, ही रचना फारच सोपी आहे. मग त्या गाई मरताहेत, कारम त्यांनीही गेल्या जन्मी पाप केले असणार. तुम्ही कशाला उगाच काळजी करताय? ' ती माणसे म्हणाली, 'स्वामी, तुम्ही सांगताय ते खरे आहे. पण गाय ही आमची आई आहे ,असे आमचे धर्मग्रंथ सांगतात आणि आई कशीही असली तरी तिचे रक्षण करायला हवे.' विवेकानंद शांतपणे म्हणालेत, 'माझ्या देशाचे काही खरे नाही. येथे ढेकणाचे संरक्षण करण्यासाठीसुद्धा काही श्रीमंत व्यापारी हॉस्पिटल काढणारेत, असे ऐकतो.'

गोहत्येबद्दल अधिक नेमके विचार त्यांना मालमदुरा येथे त्यांना सन्मानपत्र दिले, त्याला उत्तर देताना सांगितले. ती नोंद विवेकानंद ग्रंथावलीच्या पाचव्या खंडात पृष्ठ 77 वर येते. विवेकानंद सांगतात, 'ज्याला आज आपण सामान्यतः धर्म म्हणतो, तो निरनिराळ्या ठिकाणचा लहान-सहान ग्रामदेवतांमध्ये आणि क्षुद्र – क्षुद्र खुळचट रूढीमध्ये सामावलेला आहे. स्थानिक रूढी असंख्य आहेत आणि परस्पर विरोधी आहेत. रूढी म्हणजेच खरा धर्म, अशी अज्ञानी लोक जी समजूत करून घेतात, त्यातच त्यांची मोठी चूक आहे. एखादी क्षुद्र सामाजिक रूढी बदलली म्हणजे काही तुमचा धर्म बुडत नाही. – मुळीच बुडत नाही. लक्षात ठेवा की, रूढी या नेहमीच बदलत आल्यात. याच भारतात असा एक काळ होता, की गोमांस खाण्यावाचून ब्राह्मण हा ब्राह्मण राहू शकत नसे. वेंदामध्ये तुम्हाला आढळेल की, जेव्हा एखाद संन्यासी, राजा किंवा थोर पाहुणा घरी येई; तेव्हा उत्तम बैल मारण्यात येत असे. नंतर पुढे लोकांच्या लक्षात आले की, आपला देश कृषिप्रधान आहे. उत्तम बैलांची हत्या केल्याने, शेतीचे नुकसान होईल; म्हणून ही रूढी बंद पडली व गोहत्या निषिध्द मानली गेली. काळाच्या ओघात दुसरे काही नियम केले गेले. तेही निरूपयोगी ठरून कालौघात विलीन होतील व दुसऱ्या स्मृती तयार होतील. अधिक सोप्या शब्दांत सांगावयाचे तर - जो सारभूत महत्वाचा भाग असतो, तो नित्य असतो; गौण गोष्टी या तात्कालिक महत्वाच्या असतात. जर विशिष्ट काळानंतर या गौण गोष्टींच्या जागी दुसऱ्या अधिक उपयुक्त गोष्टी आणल्या नाहीत, तर त्यांच्यापासून खरोखरच धोका असतो. '

या आणि इतर संदर्भात 'धर्म – त्याच्या पध्दती आणि उद्देश' या विषयावर भाषण देताना त्यांनी जे सांगितले, ते स्वामी विवेकानंद ग्रंथावलीच्या सातव्या खंडात पृष्ठ 94 वर येते. त्यांनी सांगितलंय - 'धर्मग्रंथात सांगितलंय म्हणून विश्वासच ठेवायचा असेल, तर ईश्वराने दिलेल्या या श्रेष्टतम देणगीचा उपयोग न करावयाचा आपल्याला काय हक्क आहे? मला खात्री आहे की, जो माणूस आपल्या तर्कबुध्दीचा उपयोग करतो पण त्याचा विश्वास नाही; त्याला ईश्वर क्षमा करील. पण जो माणूस ईश्वराने दिलेल्या शक्तिचा उपयोग न करता अंधपणे विश्वास ठेवतो, त्याला ईश्वर क्षमा करणार नाही. आंधळेपणाने विश्वास ठेवणारा माणूस स्वतःचा अधःपात करून घेतो, पशूंच्या पातळीवर उतरतो, स्वतःच्या इंद्रियशक्तीचा अधःपात करतो आणि नष्ट होतो.'

'साप्ताहिक साधना' (6 जून 2015)च्या सौजन्याने

●●●

# विवेकानंद आणि गोवधबंदी

गोरक्षण मंडळाचा एक प्रचारक स्वामी विवेकानंदांच्या भेटीला आल्यावर जो संवाद झाला तो जरा लक्षात घेऊया.

स्वामीजी : आपल्या या मंडळाचा उद्देश काय?

प्रचारक : आम्ही देशातील गाईंची कसायांच्या हातून सुटका करतो .जागोजागी गोशाळा बांधून तेथेरोगी, दुबळ्या आणि कसायांच्या हातून सोडविलेल्या गाईंचे पालनपोषण करतो.

स्वामीजी : फार चांगले काम आहे हे आपले .हा खर्च चालवायला पैशाची काय व्यवस्था करता तुम्ही?
प्रचारक : आपल्यासारखे उदार लोक दयाबुद्धीने जेकाही देतात, त्यातूनच हा खर्च आम्ही चालवितो.
स्वामीजी : आतापर्यंत आपल्यापाशी किती पैसा जमला आहे?
प्रचारक : मारवाडी व्यापारी या कामात सढळ हाताने पैसा ओततात. त्यांनी या कामासाठी बराच पैसा दिलेला आहे.
स्वामीजी : मध्यभारतात भयंकर दुष्काळ पडला आहे. खुद्द सरकारने नऊ लाख लोक 'अन्न अन्न' करीत मेल्याचे आपल्या अहवालात जाहीर केले आहे .आपल्या मंडळानेया भुकेलेल्यांना मदत करण्यासाठी काही करण्याचे ठरविले आहे का?
प्रचारक : असल्या दुष्काळ-बिष्काळाच्या कामात आम्ही अगदी भाग घेत नाही .गोमातेचे रक्षण करण्याच्या हेतूनेच आमचे हे मंडळ स्थापन झाले आहे.
स्वामीजी : लाखोंच्या संख्येने 'अन्न अन्न' करून आपल्यासारखीच माणसे दुष्काळात मरत असताना शक्य असूनही त्यांच्या पोटाला अन्न देऊन मदत करणे आपणाला योग्य वाटत नाही?
प्रचारक : नाही .हा दुष्काळ म्हणजे त्यांच्या कर्माचेच फळ आहे .जसे करावे तसे भरावे .जसे कर्म तसे फळ.
प्रचारकाचे हे उत्तर ऐकून स्वामीजींचे मुखमंडळ अगदी लाल झाले .त्यांच्या त्या विशाल डोळ्यांतून जणू आग बाहेर पडत आहे असे वाटले; पण त्या संतापाची ऊर्मी आतल्या आत दाबीत ते म्हणाले,
"ज्या सभा, जी मंडळे माणसासारख्या माणसांकडे सहानुभूतीच्या दृष्टिकोनातून पाहत नाहीत, आपलेच देशबांधव उपासमारीने तडफडत असताना त्यांचे प्राण वाचविण्यासाठी मूठभर अन्न न देता पशुपक्ष्यादिकांचे प्राण वाचविण्यासाठी धान्याचे ढीगच्या ढीग वाटण्यासाठी पुढे सरसावतात, त्यांच्याबद्दल मला काडीचीही सहानुभूती वाटत नाही .अशांकडून या समाजाचा काही फायदा होणे अशक्य आहे.माणूस आपल्या कर्माने मरतो म्हणून कानावर जर हात ठेवलेत, तर जगात प्रयत्नांना काही अर्थ राहणार नाही; आणि मग गाई वाचविण्याच्या या तुमच्या धडपडीला तरी काय अर्थ आहे? आपल्या कर्मानीच गाई कसायाच्या हाती पडतात आणि मरतात असे म्हणा!"
प्रचारक हे सारे ऐकून हादरलाच; पण स्वत:ला सावरूनतो म्हणाला, "आपण म्हणता ते तसं खरं; पण शास्त्रात सांगितलं आहे, गाय आपली आई आहे."
यावर किंचित हसून स्वामीजी म्हणाले, "हो, गाय आपली आई हे तर उघडच दिसते .नाही तर असली अलौकिक प्रजा आणखी कुणापोटी बरे निपजणार?" –
*(हा संवाद झालाय 1897मध्ये, श्री.प्रियनाथ मुखोपाध्याय यांच्या घरी, बागबाझार कलकत्ता येथे .तो शरच्चंद्र चक्रवर्ती यांनी शब्दांकित केला आहे आणि हा संवाद रामकृष्ण मठाने'स्वामी विवेकानंद ग्रंथावलीचे' जे दहा खंड प्रसिद्ध केलेत त्यातील तिसऱ्या खंडात सुरुवातीला दिला आहे.)*

●●●

# गोवंश हत्याबंदी कायदा - वस्तुस्थिती आणि भूमिका

*उमेश सूर्यवंशी*

महाराष्ट्र राज्यात नुकताच 'गोवंश हत्याबंदी कायदा' लागू झाला .1995 साली गोवंश हत्या प्रतिबंधक कायद्याचा मसुदा तत्कालिन युती सरकारने तयार केला होता .त्यात सुधारणा करण्याची सूचना केंद्राने राज्याला केली होती .30 जानेवारी 1996 रोजी सुधारीत प्रस्ताव राष्ट्रपतींकडे पाठवण्यात आला .तब्बल 19 वर्षांनंतर सध्याचे राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी स्वाक्षरी केल्ड्माने महाराष्ट्रात हा कायदा लागू झाला .महाराष्ट्राचे मुख्यामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या कायद्याबाबत अनुकूल तत्परता दाखवली .

महाराष्ट्राचा हा 'आदर्श' अन्य राज्यातही लागू करायचा विचार केंद्र सरकार करत आहे आणि यासाठी कायदा मंत्रालयाचे मत मागितले आहे .गोवंश हत्याबंदी कायद्याशी संबंधित नेमक्या वस्तुस्थितीचा वेध घेण्याचा हा प्रयत्न .

**वस्तुस्थिती**

गोवंश मांस मुस्लिम धर्मीय लोकच केवळ भक्षण करतात या भ्रामक कल्पनेचा मोठा गाजावाजा अथवा अफवा समाजामध्ये आहे .भारत देशात 40 टक्के लोक गोवंश मांस भक्षण करणारे आहेत .त्यातील 12 टक्के मुस्लिम सोडले तर 28 टक्के हे दलित-आदिवासी, भटके विमुक्त, इतर मागास वर्गातील काही जाती आदि बहुजन समाजातील लोक आहे व हे सारे धर्माने हिंदूच आहेत .वैदिक परंपरेचा प्राचीन इतिहास पाहिला तर अनेक ग्रंथांमधून गाय, बैल, खोंड, वळू असे अन्य गोवंशातील प्राणी यज्ञयागातून बळी दिले जात .यज्ञात बळी दिलेल्या या जनावरांचे मांस कुठे जात होते? तर ते राजा, पुरोहित व अन्य सरदार, वतनदार, जमीनदार यांच्यातच वाटून जायचे .यज्ञविधी म्हणजे गाईंचं मांस खाण्याच्या भोजनावळी होत्या .पं.महादेवशास्त्री जोशी म्हणतात, "ब्राम्हण ग्रंथावरूनही स्पष्ट होतं की, यज्ञप्रसंगी मांसरक्षणार्थ गाईची हिंसा केली जात असे.'' याज्ञवल्क्य हा गोमांसभक्षक होता .तो स्पष्टपणे म्हणतो, "माझ्याविषयी बोलायचे झाल्यास मी गोमांस खावे या पक्षाचा आहे.'' ( शतपथ ब्राह्मण ) संस्कृत साहित्याचे जाणकार राजवैद्य माताप्रसाद सागर यांनी अनेक विद्वानांच्या ग्रंथाआधारे 'प्राचीन भारतमें गोमांस भक्षण-एक तथ्य' या शीर्षकाचे पुस्तक लिहिले आहे .त्यात वेद, उपनिषद, स्मृती, ब्राम्हणग्रंथ, रामायण, महाभारत, पुराणे, ग्रंथांमधील गोमांस भक्षणाचे संदर्भ शोधून त्यावर विवेचन केले आहे .

सांगण्याचा हेतू हा की, हिंदू अथवा वैदिक धर्मात गोमांस सर्रास खायले जायचे .जर हिंदू धर्मात गाईचे मांस निषेधार्ह असेल तर भारतात असणारे विविध धर्म व त्या धर्मात वर्ज्य असणारे प्राण्यांचे मांस यावरही बंदी घालायला हवी .उदा .मुस्लिम धर्मात डुक्कराच्या मटणावर बंदी आहे .उद्या मुस्लिमांनी डुक्कराच्या मांसावर बंदी घालण्याची मागणी केली तर ती योग्य ठरेल काय? म्हणूनच गोवंश हत्याबंदी कायद्याच्या इतर बाजूही समजून घ्यायला हव्यात.

**शेतकरी व गोवंश हत्याबंदी**

गोवंश हत्याबंदीचा कायदा शेतकरी बांधवांसाठी हिताचा नाही .कायद्याचा शेतकऱ्यांवर अथवा कृषी क्षेत्रावर काय परिणाम होईल याचा अभ्यास करण्यात आला व त्याचे सविस्तर सादरीकरण भाजपाच्या काही नेत्यांनी केले आहे .घटनेच्या कलम 48 नुसार राज्यांना आधुनिक व वैज्ञानिक पद्धतीने कृषी आणि पशुपालनाचा प्रयत्न करता येतो .प्राण्याच्या वाणात सुधारणा, त्याचे संरक्षण, गाय, वासरू व अन्य दुधाळू प्राण्यांच्या हत्येवर बंदी आणता येते .घटनाकारांचा दृष्टिकोन हा धार्मिक नसून आधुनिक व आर्थिक आहे .या पार्श्वभूमीवर या कायद्याद्वारे शेतकऱ्यांचे हित कसे जोपासले जाईल हा प्रश्न आहे. एका जनावराला रोज साधारणपणे 45 लिटर पाणी व 10 किलो चारा लागतो .महाराष्ट्रात पाण्याचा प्रश्न गंभीर आहे .कित्येक ठिकाणी टँकरने पाणी पुरवठा होतो .या परिस्थितीत भाकड जनावराला पाणी कसे देणार? पूर्वी प्रत्येक गावाला गायराने असत .शेतकऱ्यांनी बरीच गायराने कसण्यासाठी ताब्यात घेतल्याने आणि काही गायराने भूमिहिनांना दिल्यामुळे जनावरांना चरण्यासाठी चारा कमी उपलब्ध आहे .चारा विकत घेऊन जनावरांना घालणे शेतकऱ्यांना परवडणारे नाही .भाकड, म्हातारी, आजारी गुरांना केवळ गोवंशातील आहेत म्हणून मारू नये हे सांगणे सोपे आहे परंतु त्यांचा कायमस्वरूपी सांभाळ चाराटंचाई व पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्याला आर्थिकदृष्ट्या पेलणारे नाही हे वास्तव आहे .आपल्या डोळ्यासमोर जनावराचा मृत्यू पाहणेऐवजी कत्तलखान्यात परस्पर मृत्यू

शेतकऱ्यांना परवडतो .ही जनावरे विकून होणारे तुटपुंजे अर्थार्जनही शेतकऱ्यांना या कायद्याच्या अंमलबजावणीने सोडावे लागेल .याउलट या कायद्याने शेतीसाठी निरूपयोगी ठरलेले बैल, वांझोट्या गाई, आजारी जनावरे पोसण्याची पाळी शेतकऱ्यांवर येऊन त्याच्या कर्जबाजारीपणात वाढच होईल . कुचकामी भाकड जनावरांची राज्यात अंदाजे 4 लाख एवढी संख्या आहे .यावरून त्याची भयानकता समोर येते .

**'अर्थकारण' काय सांगते?**

या कायद्याने महाराष्ट्राच्या अर्थकारणावर दूरगामी परिणाम होणार आहेत .भाकड जनावरे पोसण्याचा भुर्दंड जसा शेतकरी बंधूंवर पडणार आहे .तसाच परिणाम 'चर्मोद्योग' या व्यवसायावर होणार आहे . कसाई वा खाटीक या धंद्यात जवळजवळ 15 लाख लोक आहेत .गोवंश मांसाच्या खरेदी विक्रीबरोबरच गुरांची कातडी कमावणे, चामड्याच्या वस्तू तयार करणे, हाडांची पूड करून तिचा वापर खते आणि रंग तयार करणे .अशा व्यवसायात कोट्यावधी लोकांची उपजीविका अवलंबून आहे .पुरेशा प्रमाणात जनावरांचे चामडे उपलब्ध झाले नाही तर या व्यवसायात महागाई वाढेल .चामड्यांची पादत्राणे, बॅगा महाग होतील .राज्यातून जनावराच्या मांसाची बाहेरील देशात निर्यात होते .या कायद्याने हा व्यवसाय बंद होऊन परकिय चलनाला मुकावे लागेल .कदाचित चामड्याच्या वस्तू अपरिहाङ्मतेमुळे परदेशातून आयात कराव्या लागल्यास त्याची किंमत भरमसाठ असेल .ग्रामीण भागातील ढोर-चांभार, होलार, कसाई हे बलुतेदार उद्धवस्त होतील शिवाय जनावरांच्या खरेदी-विक्री करण्यासाठी असलेल्ङ्मा नगरपरिषदा, बाजारसमित्या यांचेवरही विपरित परिणाम होईल .जनावराच्या विशिष्ट भागापासून वैद्यकशास्त्राला लागणारा सर्जिकल धागा, हेट्रासानलीनसारखी औषधे, केमिकल्स, इसेन्स या वस्तूंचे उत्पादन बंद करावे लागेल .या वस्तूंच्या अपरिहार्य वापरामुळे पुन्हा परदेशातूनच आयात करावी लागेल .गोवंश मांस खाणारे 40 टक्के लोकांना गोमांस बंद झाल्याने बोकडाचे, मेंढी, बकरीचे, कोंबडीचे मटण घ्यावे लागेल जे आर्थिकदृष्ट्या सर्वसामान्य माणसाच्या खिशाला सहज परवडणारे नाही .राज्यात अंदाजे 600 कत्तलखाने अधिकृतरित्या आहेत .ते बंद करावे लागतील परिणामी बेकारांच्या संख्येत वाढ होईल .

**थोरांच्या विचारांना तिलांजली**

थोरांच्या प्रतिमांचे पूजन करायचे आणि विचारांचे दमन करायचे असा व्यवहार सरकार करत आहे .केंद्र सरकार व महाराष्ट्र सरकार स्वत:ला सावरकरवादी विचारांचे मानते .सावरकर म्हणतात, "एक वेळ थोडी गोहत्या झाली तरी चालेल, परंतु देशाच्या बुद्धीची हत्या नको.'' "गाय हा उपयुक्त पशू आहे ती माता नव्हे'' असेही सावरकर विचार प्रसिद्ध आहेत .मग केंद्र व राज्य सरकार सावरकर विचारांना तिलांजली कशापाई देतेय?

राष्ट्रपिता महात्मा गांधी सुद्धा गाईला पवित्र मानत .पण त्यांच्या मते गोरक्षण म्हणजेच गोसंवर्धन होय .गांधी म्हणत, ''गाय पवित्र असली तरीही मानव पासून गाईचे संरक्षण करण्याचा मार्ग त्यांच्या हृदय परिवर्तनाचा आहे .गाईला वाचवण्यासाठी माणसाची हत्या करणे, हा धर्म नव्हे.'' महात्मा गांधींच्या या विचारावर अधिक भाष्य करण्याची गरज नाही .

हिंदू समाजात गाईविषयी जो समज आहे त्यावर स्वामी विवेकानंद यांनी प्रखर टीका केली आहे .ते म्हणतात 'गाय आणि माणूस यामध्ये माणूस महत्वाचा मानला पाहिजे .दुष्काळात जेव्हा माणसे उपाशी मरत असतात तेव्हा गोशाला काढून गाई वाचविण्याऐवजी माणसे कशी जगतील हे पाहावे.' असं मत स्वामी विवेकानंदांनी मांडले होते.

**सरकारने काय कमावले? काय गमावले?**

गोवंश हत्याबंदी कायदा करून महाराष्ट्र सरकारने आपण शेतकरी हित विरोधी गरीबांच्या हितविरोधी, थोरांच्या विचारविरोधी, आधुनिक व वैज्ञानिक पद्धतविरोधी काम करत आहे हे सिद्ध होतेय . राज्यसरकारच्या या भूमिकेला केंद्राचाही पाठींबा आहेच .'पाठीवर मारा, पण पोटावर मारू नका' अशी म्हण आपणाकडे आहे .गोरगरीबांच्या तोंडचा सकस घास सरकारने काढून घेतला .त्याचबरोबर बहुराष्ट्रीय कंपन्यांना या व्यवसायाचे दालन उघडे करून आपण 'भांडवलदारवर्गाचे हित' जोपासतो हे सुद्धा पुन्हा सिद्ध केले .जागतिक 'बी' बाजारात तब्बल 20 टक्के वाटा भारताचा आहे .1960 पासून 65 देशांमध्ये गोवंश मांस निर्यात केले जाऊन सुमारे 25 हजार कोटी रूपयांचे परकीय चलन मिळत होते . हा कायदा देशभर लागू झाल्यास यावर पाणी सोडावे लागणार .हा कायदा करताना राजकीय दृष्टीने आपणच हिंदू धर्मियांचे हितरक्षक आहोत असा आभास सरकार निर्माण करू पाहतेय .परंतु वस्तुस्थिती पाहता हिंदू बांधवांचे सर्वाधिक नुकसान शेतकरी, कारागीर, गोवंश मांस खाणारे, थोरांचे विचार हे हिंदू धर्मीय बहुसंख्य आहेत होणार आहे .मुस्लिम विरोध प्रकट करण्याचा सरकारचा हेतु प्रथमदर्शनी दिसून येतोय .

खरे तर नुसते मुस्लिमच नव्हे तर ढोर, होलार, कसाई, खाटीक या दलित घटकांच्याही विरोधात सरकारची भुमिका आहे .मसबका साथ, सबका विकास' या घोषणेच्या विपरीत व्यवहार सरकार करतंय एवढं खरं .केवळ मूठभर लोकांच्या भ्रामक कल्पनांना व भावनांना गोंजारण्यासाठी समस्त बहुजन वर्गाचा रोष सरकार पत्करत आहे .सरकार व या कायद्याचे पाठीराख्यांना खरोखरच गोवंशाचे संवर्धन करायचे असेल तर भाकड, आजारी जनावरांना सांभाळण्याचे 'पुण्यकर्म' त्यांनी स्वत:कडे घ्यावे . विनाकारण शेतकरी बंधूंना भुर्दंड कशापाई? ज्यांना हा कायदा योग्य वाटतो त्या प्रत्येकाने किमान एक जनावर तरी दारात बांधून त्याचे पालनपोषण करावे .कत्तलखान्यात काम करणाऱ्या 20 लाख लोकांच्या उपजीविकेचा मार्ग कसा सोडणार? त्यावरील उपाय जाहीर करावेत .

या कायद्याला अनुसरून काही बाबतीत सरकारनेही भूमिका जाहीर करावी .यज्ञामध्ये गोवंश कापण्याची प्रथा हिंदू धर्मग्रंथात आढळून येते .नव्या कायद्यानुसार आता यज्ञ व धर्मग्रंथ रद्दबादल ठरवले जावेत .पिंडदानावेळी कणकाची गाय करून तिला ठार मारले जाते .प्रतिकात्मक का होईना याद्वारेही गाय मारली जातेच .सरकारने पुढील काळात या 'संस्काराविषयी' भूमिका जाहीर करावी . 'नेपाळ'सारख्या कधीकाळच्या हिंदू राष्ट्रात कालीमातेला गाईचा बळी दिला जातो .सध्याच्या सरकारचे विशेषतः केंद्राचे नेपाळशी 'सख्य' पाहता नेपाळ सरकारला ही प्रथा थांबवावी असे सरकार सांगेल काय?

'गाय' माता आहे अशी भावना असणाऱ्या लोकांना खुश करण्यासाठी सरकारने हा कायदा केला आहे . लोकांच्या या भावनेचा आदर करूनच एक प्रश्न उपस्थित होतो .शेतकरीबांधव हा जमिनीलाच आपली आई मानतो .म्हणूनच वर्षानुवर्षे तोट्यात जाऊनही तो शेती करतो .यापाई आत्महत्याही करावी लागते . कायद्याच्या समर्थकांचा युक्तीवाद असा की, स्वत:चे आई-बाप म्हातारे झाले की त्यांना पोसण्याऐवजी कत्तलखान्यात पाठवणार का? कायद्याच्या समर्थकांना एवढेच सांगावे की, शेतकरी जमिनीलाच आई-बाप मानतो .शेतकऱ्याचे हे आई-बाप अर्थात जमीन त्याच्या संमतीशिवाय राष्ट्रहिताकरिता(?) ताब्यात घेणारे केंद्र सरकारचा 'भूमिग्रहण' कायदा येत आहे .त्याबद्दल तुमच्या भावना काय म्हणतात? आई-बाप जमीन ताब्यात घेऊन [ मुलाला] शेतकऱ्याला कत्तलखान्याची अर्थात उद्धवस्तकरणाची वाट दाखवणे योग्य आहे का?

थोडक्यात हा कायदा विचारपूर्वक केला नसल्याने त्यांच्या परिणामांचा विचार झालेला नाही . आर्थिकदृष्ट्या, सामाजिकदृष्ट्या, आधुनिकदृष्ट्या विचार केलेला नाही .धर्मभावना चेतवण्याचा व आपल्या राजकीय मतपेटीला खुश करण्याच्या हेतुने केलेला हा कायदा बहुजनवर्गाला लाभदायक नाही .

'अ.नि.वार्तापत्र' (मे, 2015)च्या सौजन्याने

umeshsuryavanshi@yahoo.in

•••

# राजकारणाच्या खेळात पवित्र गोमांस

*डॉ. राम पुनियानी*

समाजातील कोणा वर्गाच्या खाण्याच्या सवयींना राजकारणाचा विषय बनविला जाऊ शकतो काय? कोणी एक पशु की ज्याला समाजातील एक वर्ग, मातेसमान पुजतो राजकारणाच्या खेळाचा विषय होऊ शकतो काय? जरी हे अकल्पनीय वाटत असले, तरी भारतीय राजकीय परीदृश्यावर गाय महत्त्वपूर्ण बाब बनली आहे. महाराष्ट्र विधानसभेने पारित केलेल्या "महाराष्ट्र पशु संरक्षण (संशोधन) विधेयक 1995"ला राष्ट्रपतींनी नुकतीच मंजुरी दिली आहे. या नव्या कायद्याप्रमाणे गायींबरोबर बैलांच्या हत्येवरही प्रतिबंध लावण्यात आला आहे. या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्याला दहा वर्षाच्या कैदेची शिक्षा आणि 10 हजार रुपये दंड होऊ शकतो. जेव्हा मी या कायद्यातील पशु संरक्षण शीर्षक वाचले तेव्हा मला ते सर्व पशूंबाबत ज्यांना माणसे खातात, त्या सर्व पशूंबाबत आणि वा माणसे ज्या पशूंचा विविध कामांसाठी उपयोग करतात त्या सर्व पशूंबाबत वाटले. परंतु पुढे वाचल्यावर माझ्या हे लक्षात आले की हा कायदा केवळ गोवंशावर लागू होणारा आहे. एका दशकापूर्वी, भारतीय इतिहासाचे अनन्य अभ्यासक प्रो. द्विजेंद्र नाथ झा यांना त्यांनी त्यांचे 'होली काऊ बीफ इन इंडिअन डायेटरी ट्रेडिशन' (भारतीय खाद्य परंपरेत पवित्र गोमांस) हे पुस्तक प्रसिद्ध केल्यास त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील, अशा धमकीचे फोन आल्याचे वाचल्यावर मला मोठा धक्का बसला होता. हे विद्वत्तापूर्ण पुस्तक भारतीय खाद्यान्नातील गोमांस भक्षणाचा अनेक शतकांच्या परंपरांवर केंद्रित आहे.

स्पष्ट आहे की, नव्या कायद्याचा उद्देश गोमांस भक्षण आणि गोवधाच्या बहाण्याने अल्पसंख्यांकांना लक्ष्य बनविणे हा आहे. सन 2014च्या सार्वत्रिक निवडणुकीत प्रचारामध्ये देण्यात येणाऱ्या घोषणांमध्ये 'मोदी को मतदान, गाय को जीवदान' आणि 'बीजेपी का संदेश, बचेगी गाय, बचेगा देश', या घोषणा भाजपच्या 'गो विकास प्रतिष्ठान'कडून देण्यात आल्या होत्या.

धर्माच्या नावे केल्या जाणाऱ्या राजकारणामध्ये अशा प्रकारच्या भावनात्मक आणि ओळखीच्या मुद्द्यांचा वापर ही आम बाब आहे. भाजपाने लोकांच्या भावनांशी संबंधित राम मंदिराचा मुद्दा आपल्या राजकारणाचा विषय बनविला होता आणि आपली ताकद वाढविली होती, ही गोष्ट आपण जाणतोच. गाय, अनेक वर्षापासून संघ-भाजपच्या राजकारणाचा भाग बनून राहिली आहे. गाईच्या हत्येवरून शेकडो दंगे भडकावण्यात आले आहेत. 1964मध्ये संघाने विश्व हिंदू परिषदेची स्थापना केल्यानंतर योजनाबद्ध रीतीने गाईचा मुद्दा वेळोवेळी उठविला जात आहे. गाय आणि गोमांस भक्षणाबाबत अनेक चुकीच्या भावना प्रचारित केल्या जात आहेत. गोमांस भक्षणाला मुस्लीम समुदायाबरोबर जोडणे ही त्यातील एक घृणास्पद गोष्ट आहे. मुसलमानांतील कसाई वर्गाला घृणास्पद बनविले जात आहे. गोमांस भक्षण मुसलमानांसाठी अनिवार्य गोष्ट आहे असा भ्रम निर्माण व्हावा अशा रीतीने प्रचार केला जात आहे. हिंदूंना गाय पवित्र आहे म्हणून मुसलमान तिचा वध करतात अशी समाजातील मोठ्या वर्गाची धारणा बनविली गेली आहे. गोमांस भक्षणाची परंपरा मुसलमानांच्या आक्रमणानंतर भारतात

निर्माण झाली, असाही प्रचार केला जात आहे. या धारणा खोट्या आहेत, परंतु तरीही समाजाचा एक मोठा हिस्सा त्या खऱ्या मानत आहे.

ही मिथके हळूहळू निर्माण करण्यात आली. गोमांसाशी संबंधित मुद्द्यांवर गाईंचे व्यापारी आणि दलितांविरुद्धच्या हिंसाचाराच्या बातम्या येतच असतात. गाईचा वापर समाजाला जातीयवादावर ध्रुवीकृत करण्यासाठी करण्यात येत आहे. गाईच्या कातड्याचा व्यापार करणाऱ्या दलितांची हरियाणातील गोधनासह अनेक ठिकाणी हत्या करण्यात आली आहे आणि विहिंपच्या नेत्यांनी या हत्यांना उचित ठरविले आहे.

खरी गोष्ट ही आहे की, गोमांस खाणे आणि गायींचा बळी देणे, या परंपरा भारतात वैदिक काळापासून चालत आल्या आहेत. कित्येक धर्मग्रंथात यज्ञात गायीचा बळी देण्याचा उल्लेख आहे. अनेक पुस्तकांमध्ये गोमांस खाण्याचाही उल्लेख आहे. तेत्रेय ब्राह्मणातील एक श्लोक 'अथो अन्नम विया गऊ' (गाय खरे भोजन आहे) असे सांगतो. विविध देवतांना विविध प्रकारचे गोमांस प्रिय आहे. प्रो. डी. एन. झा यांनी आपल्या उत्कृष्ट पुस्तकात याची अनेक उदाहरणे दिली आहेत.

भारतात अहिंसेची कल्पना कृषी आधारित समाजाच्या विकासाबरोबर आली. जैन धर्म सर्व प्रकारच्या हिंसेविरुद्ध होता. बौद्ध धर्महीं अहिंसेचा उद्गाता आणि पशुबळींच्या विरोधात होता. या धर्मांनी प्रतिपादलेल्या अहिंसा सिद्धांताला प्रतिक्रिया म्हणून आणि त्याला प्रत्युत्तर म्हणून, बऱ्याच काळाने ब्राह्मणवादाने प्रतिक रूपाने गाईचा अंगीकार केला. कारण ब्राह्मणवाद स्वतःला हिंदू धर्माचा पर्याय या रुपात प्रचारित करू इच्छित होता, म्हणून त्यांनी गाय सर्व हिंदूंना पवित्र आणि पूजनीय आहे असा प्रचार सुरु केला. सत्य हे आहे की हिंदू समाजाचे अनेक वर्ग, विशेषतः दलित आणि आदिवासी फार आधीच्या काळापासून गाईचे मांस खात आले आहेत. ही गोष्ट वेगळी आहे की हिंदुत्त्वाच्या वाढत्या प्रभावामुळे, ज्यांच्यासाठी गोमांस प्रथिनांचा समृद्ध स्त्रोत होता असे अनेक समुदायांना ते खाणे सोडणे वा सोडण्याबद्दल विचार करणे, यासाठी भाग पाडले जात आहे.

भाजपाच्या साथीदारांच्या दाव्याच्या विरुद्ध, स्वामी विवेकानंदांनी अमेरिकेतील एका मोठ्या सभेत, "तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की प्राचीन काळी खास समारंभांमध्ये जे गोमांस खात नसत त्यांना चांगले हिंदू मानले जात नसे," असे वक्तव्य केले होते. "अनेक प्रसंगी बैलाचा बळी देणे आणि खाणे ही गोष्ट आवश्यक होती." [शेक्सपियर क्लब, पेसेडिना, कॅलिफोर्निया येथे 2 फेब्रुवारी 1900ला 'बौद्ध भारत' या विषयावर बोलताना ('द कम्प्लीट वर्क्स ऑफ स्वामी विवेकानंद, खंड 3, अद्वैत आश्रम, कलकत्ता, 1997, पृष्ठ 536)

स्वामी विवेकानंदाद्वारे स्थापित रामकृष्ण मिशनद्वारा प्रायोजित काही अन्य संशोधन परियोजनांनीही या तथ्याला पुष्टी दिली आहे. यातील एकात "ब्राह्मणांसह सर्व वैदिक आर्य मांसे, मांस आणि अगदी गोमांस सुद्धा खात होते" असे म्हटले आहे. खास पाहुण्यांचा सन्मान करण्यासाठी जेवणात गोमांस वाढले जात असे. जरी वैदिक आर्य गोमांस खात होते तरी दूध देणाऱ्या गाईला मारले जात नसे. गाईला अघन्य (जिला मारले जात नाही असा शब्द प्रयोगात होता.) पण अतिथी साठी जो शब्द प्रयुक्त होता तो होता, गोहन (ज्याच्यासाठी गाईला मारले जाते.) केवळ बैल, दूध न देणाऱ्या गाई आणि वासरांना मारले जात असे. (सुनीतिकुमार चटर्जी व अन्य यांनी संपादित केलेले 'द कल्चरल हेरीटेज ऑफ इंडिया', खंड 1, प्रकाशक रामकृष्ण मिशन, कलकत्तामधून कुन्हन राजांचा 'वैदिक कल्चर' हा आलेख, पृष्ठ 217)

महाराष्ट्र सरकारच्या या विधेयकाला राष्ट्रपतींनी मान्यता दिल्यानंतर मुंबईच्या देवनार कत्तलखान्यातील हजारो श्रमिक, जे यामुळे आपला रोजगार गमावणार आहेत, त्यांनी 11 मार्चला या

विरोधात मुंबईत जोरदार निदर्शने केली. वेगवेगळ्या धर्मांचे अनेक व्यवसायी महाराष्ट्र शासनाच्या या जातीयवादी कृतीला विरोध करण्यासाठी मुंबईच्या आझाद मैदानात एकत्र आले. नव्या कायद्याविरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. गोमांसावरील प्रतिबंध हा नागरिकांना आपले भोजन निवडण्याच्या मुलभूत अधिकाराचे उल्लंघन असल्याचे या याचिकेत म्हटले आहे.

समाज, अशा राजकीय लक्ष्य प्राप्त करण्यासाठी लोकांच्या भावनांशी संबंधित अशा मुद्द्यांच्या दुरुपयोगाविरोधात एकत्र येईल, अशी आशा आम्हाला वाटते. लोकांनी काय खावे वा खाऊ नये याचा निर्णय लोकांवरच सोपवायला हवा आणि मांस व्यवसायाशी संबंधित असलेल्यांची रोजी-रोटी हिरावून घेतली जाता कामा नये.

ram.puniyani@gmail.com

•••

# गोवंश हत्याबंदी कायदा मागे घ्या!

*डॉ.सुलभा ब्रह्मे*

2014 साली अवर्षणाचा मोठा फटका मराठवाडा व वऱ्हाडाला बसल्याने सध्या पाणी-टंचाईची भीषणता दिवसेंदिवस वाढत आहे .टँकरचा पाणी पुरवठा अपुरा, बेभरवशाचा असल्याने माणसांनाच पाणी मिळणे मुश्कील तर गुरांना पाणी कोठून आणणार? दुष्काळामुळे चारा-वैरण हाती लागत नाही .तेव्हा गुरांना जगवायचे कसे? गुरांच्या छावण्यांवर गुरांची प्रचंड आबाळ होते .पण गाई-बैल जगवण्याच्या आशेने शेतकरी छावणीवर गुरे दाखल करतात .पण तीही सुविधा उपलब्ध नसल्याने गुरे जगवणे अशक्य झाले आहे .डोळ्यांसमोर गुरांना वैरण-पाण्याविना तडफडत तरी कसे ठेवणार म्हणून नाईलाजाने गुरांच्या बाजारात गुरे दाखल करावी लागतात .1976च्या महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायद्यान्वये गोहत्येवर बंदी घालण्यात आलेली आहे .तो दखलपात्र गुन्हा असून त्याबद्दल 6 महिने शिक्षा व 1000 रू .दंड ठोठावण्याची कायद्यात तरतूद आहे .पण तो कायदा तसा कागदोपत्रीच राहिलेला आहे .युती सरकार सत्तेवर आल्यावर त्याच्या अंमलबजावणीची हवा निर्माण झाली व गाईची खरेदी बंद झाली. तेव्हा काय करावे अशा विवंचनेत शेतकरी असताना नव्या वर्षा मार्च 2015मध्ये युती शासनाने गोवंश हत्याबंदी कायदा करून शेतकरी वर्गावर मोठा आघात केला आहे.

1995 मध्ये शिवसेना-भाजप युती सरकारने विधिमंडळात `महाराष्ट्र प्राणी संवर्धन) सुधारित (कायदा' संमत करून घेतला होता .1996 साली मान्यतेसाठी राष्ट्रपतींकडे पाठवला, तो 19वर्षे तेथेच पडून होता. परंतु 2014 साली महाराष्ट्रात भाजप-शिवसेना युती पुन्हा सत्तारूढ झाल्यावर त्यांनी त्याचा पाठपुरावा केला आणि केंद्रामध्ये मोदी सरकार असल्याने राष्ट्रपती मुखर्जी यांनी तत्परतेने त्यावर मान्यतेची मोहोर उमटवली. या नव्या गोवंश हत्या बंदी कायद्यान्वये गाई, बैल व वळू यांच्या हत्येवर बंदी घालण्यात आली आहे .त्या हेतूने गाई, बैल व वळूची खरेदी, विक्री करता येणार नाही, विकत घेऊन मांस स्वत:च्या ताब्यात ठेवता येणार नाही, राज्याबाहेरून आलेले गोवंशमांसही ताब्यात ठेवता येणार नाही. म्हणजे गोवंशमांस सेवनावरही परिणामतः बंदी आलेली आहे .यापैकी कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन केल्यास पाच वर्षाचा तुरूंगवास व दहा हजार रूपये दंडाच्या शिक्षेची तरतूद कायद्यात आहे . हा गुन्हा दखलपात्र व अजामीनपात्र ठरवण्यात आला आहे .या कायद्याची अंमलबजावणी सुरू झाल्याने आता दुष्काळग्रस्त शेतकरी पुरे हवालादिल झाले आहेत .दुष्काळात तेरावा महिना !आता गाई नव्हे तर बैलही विकणे हा गुन्हा झाला आहे. पाणी-वैरणीविना गुरे सांभाळणे तर अशक्य आहे .तेव्हा शेतकरी

तहसिलदार, जिल्हाधिकारी कचेरीवर गुरे नेऊन बाजारभावाने किंमत द्या व गुरे सांभाळा अशी मागणी करत आहेत .परंतु शासन थंड आहे.

बैल हा पारंपारिक भारतातील शेतीचा आधारस्तंभ होता .नांगरणी, वखरणी, मोटेने पाणी उपसा, बैलगाडीने वाहतूक, तेल घाणा अशी सर्व कामे बैलाच्या सहाय्याने चालत .गाय वासरे देते, गायीच्या दुधाचे पोषणमूल्य उच्च असते .गायी-बैलांचे शेण, खत, गोवNया, सारवण यासाठी उपयोगी पडते . पारंपारिक गावगाडयामध्ये मृत गाय-बैल ओढण्याचे काम महार जातीचे, त्यांचे मांसही खाल्ले जाई, चामडे, शिंगे, हाडे याचा यथायोग्य उपयोग केला जाई .गाय-बैल मोठया ममतेने शेतकरी सांभाळतो . परंतु भाकड गायी सांभाळून गोवंशवृद्धी कशी होणार?

गेल्या पन्नास वर्षांत डिझेल, विजेचे पंप आले, ट्रॅक्टर-ट्रॉली, यंत्रे आली त्यामुळे बैलांचे महत्त्व कमी होत चालले आहे .त्याबरोबर गावठी गाईचे महत्त्व व संख्या कमी होत आहे .मोकाट चराईची क्षेत्रे कमी झाल्याने भाकड गायी व निकामी बैल, संकरित गायीचे गोऱ्हे यांचा सांभाळ कठीण झाल्याने त्यांची विक्री करणे एवढाच मार्ग उरला .भाकड गायी व निकामी बैल सांभाळण्याची ऐपत नाही म्हणून शेतकरी अशी गुरे विकून चार पैसे मिळवतात .निकामी गोवंशीय गुरे वापरण्याची सुसंघटित व्यवस्था अस्तित्वात आहे .बाजारात विकलेली गोवंशीय गुरे कत्तलखान्यात गेल्यावर ती सुव्यवस्थितपणे कापली जाऊन त्यांचे मांस, कातडी, शिंगे, हाडे या सर्वांच्या उपयुक्ततेप्रमाणे प्रक्रिया करून त्याचा वापर केला जातो .कत्तलखाने, गोमांस प्रक्रिया व विक्री, कातडयांचे बूट, चपला, बॅगा, वाद्ये, चामडी वस्तू बनवणे आणि शिंगे, हाडे यांचा सौदर्य प्रसाधने, औषधे, साखर इ. उद्योगांमध्ये वापर यातून हजारोंना रोजगार उपलब्ध होतो व मूल्यवर्धन होते .गोमांस तुलनात्मकदृष्टया स्वस्त असल्याने गरीब कुटुंबांच्या आहारात प्रथिनांचा स्रोत म्हणून तो मौल्यवान असतो .नव्या कायद्यामुळे महाराष्ट्रातील लाखो शेतकरी, बैलांची कातडी कमावणारे व कातडी वापरणारे कारागीर व उद्योग, बैलांचे व्यापारी, खाटिकी व्यवसायातील व्यापारी, वाहतूकदार, कामगार, कर्मचारी, निर्यातदार यांचे मोठे आर्थिक नुकसान होणार आहे व काहींवर तर बेकारीचे संकट कोसळले आहे .तुलनात्मकदृष्टया किंमत कमी असलेले बीफ हा प्रथिनांचा मौल्यवान स्रोत म्हणून त्यावर अवलंबून असलेल्या लाखो ग्राहकांवर मोठा अन्याय केला जात आहे .तेव्हा शासनाने विवेकदृष्टी वापरून गोवंशहत्या बंदी कायदा ताबडतोब मागे घ्यावा.

---

**महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जाहीर पत्र**

*गोवंश हत्याबंदी कायदा महाराष्ट्र सरकारने जारी केला आहे .हा कायदा धार्मिक कारणाने पारित केला आहे काय? तसे नसेल तर गोवंशहत्या बंदीचे कारण काय ते लक्षात येत नाही .आर्थिक पैलूंचा विचार केला तर या कायद्यामुळे फार मोठे आर्थिक नुकसान होणार आहे .भाकड गायी व निकामी बैल सांभाळण्याची ऐपत नाही म्हणून शेतकरी अशी गुरे विकून चार पैसे मिळवतात.विशेषतः महाराष्ट्रातील मराठवाडा-विदर्भातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तर स्वत:पुरतेही पाणी मिळण्याची भ्रांत असताना गुरांना पाणी-वैरण कोठून आणणार, या मोठया विवंचनेत शेतकरी सापडलेले आहेत . शासनाने विक्रीवर बंदी घातल्यामुळे बैल काय मोकळे सोडून देऊन पाण्या-चाऱ्याविना तडफडत मरताना पाहायचे? शासनाने कायदा केलाच आहे .तेव्हा गुरांच्या बाजारात विक्रीस बंदी असलेली सर्व गुरे शासनाने रास्त किंमतीला विकत घ्यावी आणि त्यांना सांभाळण्याची सोय करावी .अर्थात या गुरांची खरेदी आणि भाकड गुरे नीट सांभाळण्याचा खर्च शासनाला करावा लागेल, म्हणजेच जनतेवर कराचे ओझे वाढून सर्वांचेच आर्थिक नुकसान होणार आहे .गोवंश हत्याबंदी केल्यामुळे निकामी गोवंशीय गुरे वापरण्याची जी सुसंघटित व्यवस्था अस्तित्वात आहे, ती पूर्णपणे कोलमडून पडणार*

*आहे .बाजारात विकलेली गोवंशीय गुरे कत्तलखान्यात नेल्यावर ती सुव्यवस्थितपणे कापली जाऊन त्यांचे मांस, कातडी, शिंगे, हाडे या सर्वांच्या उपयुक्ततेप्रमाणे प्रक्रिया करून त्याचा वापर केला जातो . कत्तलखाने, गोमांस प्रक्रिया व विक्री, कातड्यांचे बूट, चपला, बॅगा, वाद्य, चामडी वस्तू बनवणे आणि शिंगे, हाडे यांचा सौंदर्य प्रसाधने, औषध, साखर इ .उद्योगांमध्ये वापर यातून हजारोंना रोजगार उपलब्ध होतो व मूल्यवर्धन होते .गोमांस तुलनात्मकदृष्टया स्वस्त असल्याने गरीब कुटुंबांच्या आहारात प्रथिनांचा स्वस्त म्हणून तो मौल्यवान असतो .एका फटक्याने ही सर्व अर्थव्यवस्था व पोषण व्यवस्था कोलमडवण्यात आली आहे .याचे कारण आम्हास अनाकलनीय आहे.*

*तरी मुख्यमंत्र्यांनी या निर्णयाचे कारण काय ते सांगावे .शेतकऱ्यांकडून भाकड जनावरे विकत घेण्याची आणि ती सांभाळण्याची चांगली सोय करावी व त्याचा खर्च कसा करणार ते स्पष्ट करावे .नव्या कायद्यामुळे जे शेतकरी, खाटीक, व्यापारी, उद्योजक, वाहतूकदार, कामगार, कर्मचारी आदींच्या उपजीविकेवर घाला पडला आहे, त्यांच्या आर्थिक नुकसानीचे मापन कसे करणार व नुकसानभरपाई कशी करणार, त्याचा आर्थिक भार कोण उचलणार याचाही खुलासा करावा . हे सर्व नेटकेपणे जमणे कठीणच आहे .तेव्हा कायदा ताबडतोब मागे घेणे हेच उचित आहे.*

डॉ.सुलभा ब्रह्मे

---

‘जीवनमार्ग’च्या सौजन्याने

sulabhabrahme2013@gmail.com

●●●

# लोकशाही विरोधी, मूलभूतहक्काविरोधी

*संपादकीय*

वासाहतिक काळात ब्रिटिशांच्या सरस आर्थिक-राजकीय प्रारूपामुळे इथला उच्चवर्णीय समाज आपल्या पारंपरिक सत्तेला मुकला असला तरी आधुनिक शिक्षण आणि अर्थ-सत्ता-अधिकार प्रारूपात तोच उच्चवर्णीय बनत गेला. आणि या प्रक्रियेतून दुहेरी परिणाम घडत गेला. एका बाजूला हा वर्ग ब्रिटिशांच्या कार्यक्षम आर्थिक-राजकीय प्रारूपामुळे न्यूनगंडात गेला पण काही पिढ्या स्थिरावताच तो आपल्या धार्मिक - सांस्कृतिक परंपरेच्या आत्यंतिक समर्थनाकडे वळला. आणि यातूनच हिंदू धर्माची नववेदांती मांडणी पुढे आली. स्वामी दयानंद सरस्वती, स्वामी विवेकानंद, बंकिमचंद्र यांसारख्यांनी लोकप्रिय हिंदू प्रतीकांना वसाहतविरोधी म्हणून वापरायला सुरुवात केली. कालौघात हा नववेदांती दृष्टिकोन स्वातंत्र्य चळवळीचे प्रभावशाली तत्त्वज्ञान बनला. नंतरच्या काळात गांधींनीही याचा अतिशय हुशारीने उपयोग केला असला तरी त्यांनी अतिशय जाणीवपूर्वक या दृष्टिकोनातील मुस्लीमद्वेषाला बदलवून ब्रिटिशविरोधी बनवण्याचा प्रयत्न केला. पण तोपर्यंत म्हणजे गांधीजींच्या स्वातंत्र्य चळवळीच्या पटलावर उदय होतानाच इथल्या ब्राह्मण परंपरावाद्यांनी या नववेदांती दृष्टिकोनाला आणखीन संकुचित बनवत मुस्लीम-दलित आणि इतर अल्पसंख्याकांच्या विरोधातील हिंदुत्ववादी विचारसरणीत बदलवून टाकले होते.

स्वातंत्र्याच्या उष:काली संविधान सभेच्या चर्चेतही गोहत्याबंदीचा विषय चर्चिला गेला. पूर्व पंजाबचे एक निर्वाचित सदस्य पंडित ठाकूरदास भार्गव यांनी राज्याच्या ध्येय-धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे यातील कलम 38अ, ज्यात एकूणच पशुसंवर्धन आणि गोहत्याबंदीबाबतच दुरुस्ती सुचवण्यात आली होती, असा

एक प्रस्ताव सभेपुढे मांडला. त्यानंतर मध्य आणि बेरार प्रांतातील एक सदस्य सेठ गोविंददास यांनी या दुरुस्तीला अनुमोदन देत यातील गाई या शब्दाला अतिव्याप्त करत आत्तासारखेच त्यात वळू, बैल यांचाही समावेश व्हावा असा आग्रह धरला. याहीपुढे जाऊन दोघांनीही हे कलम मार्गदर्शक तत्त्वांत अंतर्भूत करण्याऐवजी तो मूलभूत हक्कांत समाविष्ट करण्याविषयी आग्रह धरला. पण इतर सन्माननीय सदस्यांचा याविषयीचा दृष्टिकोन आणि मत यांचा विचार करून डॉ. आंबेडकरांनी याचा समावेश मार्गदर्शक तत्त्वांतच आणि त्याच्या आधीच्या सीमित अर्थासकटच केला.

मार्क्स एकदा हेगेलच्या एका निरीक्षणावर टिप्पणी करताना म्हणाला होता की, इतिहास स्वत:ला पुनरुक्त करतो... पहिल्यांदा शोकांतिका म्हणूनतर दुसऱ्यांदा प्रहसन म्हणून! आता संविधान बनवतानाच्या पहिल्या प्रयत्नात अपयशी ठरल्यानंतर पासष्ट वर्षांनंतर 2015च्या या कायद्याच्या यशस्वीतेच्या या इतिहासपुनरुक्तीला आपण काय म्हणणार, शोकांतिका की प्रहसन?! संविधान सभा ही जरी थेटपणे लोकांद्वारे निवडून दिली नसली तरी किती जाणीवपूर्वक तिने जनभावनेचा आदर करतच अशा अतिशय संवेदनशील मुद्द्यांबाबत योग्य ते निर्णय घेतले होते. पण पासष्ट वर्षांच्या लोकशाहीच्या सरावानंतरही अशा संवेदनशील मुद्द्यांत प्रक्षोभासाठीच्या जाणीवपूर्वक फटी ठेवत, इतर समुदायांचा-वर्गांचा विचार न करताच ज्या एकांगीपणे हाताळले जात आहे हे पाहून अत्यंत दु:ख होते. पासष्ट वर्षांनंतर पंडित ठाकूरदास भार्गव आणि सेठ गोविंददास या दोघांच्या दोन्हीही मागण्यांना आज या कायद्याद्वारे पुनर्स्थापित केले गेले. गायीच्या व्याख्येला सकारात्मकरीत्या अतिव्याप्त करत तर नकारात्मकरीत्या याचा मूलभूत हक्कांत समावेश करत! एकाचवेळी शोकांतिका आणि प्रहसनही!!त्यामुळे भाजप नेते म्हणतात त्याप्रमाणे या निर्णयापाठीमागे (गोहत्या बंदी) पशुपर्यावरणाचा आणि शेतकऱ्यांच्या हिताचा नव्हे तर भविष्यात अगदी घटनात्मक लोकशाही चौकटीत या कायद्याचा आधार घेत धार्मिक विग्रह वाढवण्याचाच हेतू आम्हाला स्पष्ट दिसतो आहे.इतर अनेक राज्यांतील अशा प्रकारचे कायदे, 1966 सालचा संघ आणि तिच्या भगिनी संस्थांनी काढलेला गोहत्या कायद्याला व्यापक करण्याची मागणी करणारा मोर्चा असो किंवा नंतरच्या काळात सर्वोच्च न्यायालयाचे या संदर्भातील काही खटल्यांतील निकाल पाहता गोहत्या या शब्दाला अतिव्याप्त करत त्यात बैल-वळू यांसह आजारी, अनुत्पादक आणि दुष्काळी पशुधनाचा समावेश करण्यास सर्वच पातळ्यांवर नकार दर्शवण्यात आला.

खरे तर आकडेवारी पाहिल्यास पशुधनातील बैल आणि वळूंची संख्या धोकादायक रीतीने कमी झाली आहे, याउलट गाईंची संख्या वाढतेच आहे. पशु धनाचा व्यावहारिक आणि शास्त्रीयदृष्ट्या आपण वापर न केल्यास आर्थिक, रोजगार आणि इतर तोट्यांसह इतरही नैसर्गिक असंतुलनाला आपणाला सामोरे जावे लागेल. आधीच अरिष्टात सापडलेल्या शेतकऱ्यांची पशूंना पोसण्याची अक्षमता, दुष्काळ व इतरही अनेक कारणांसह मुळातच या पशूंचा असणारा पुनरुत्पादनाचा अल्पकाळानंतरचा दीर्घ अनुत्पादनाचा काळ पाहाता यावर धार्मिक पवित्रतेच्या दृष्टिकोनातून नव्हे तर व्यावहारिक आणि शास्त्रीय दृष्टिकोनातून पाहायला हवे. नाहीतर हा फक्त आपल्या पशुधनाचाच अपव्यय आणि अर्थ व रोजगारनिर्मिती विकास संधी यांचा अनादर ठरेल. तसेच बहुसंख्य गरीब वर्गाच्या जीवनपद्धतीशी केलेली प्रतारणा ठरेल.

व्यापार मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार गेल्या वर्षीपासून भारत म्हशीच्या मांसाच्या निर्यातीत इतर देशांना मागे टाकत क्रमांक एकवर पोहोचला आहे. यात उत्तर प्रदेश आणि आंध्र प्रदेशनंतर महाराष्ट्राचा तिसरा क्रमांक लागतो. APEDAच्या आकडेवारीनुसार 2012-13 या वर्षात ही निर्यात 10.76 लाख मेट्रिक टन इतकी होती आणि त्याचे रुपयांतले मूल्य जवळजवळ 17.40 हजार कोटी इतके होते.

पुढच्या 2 वर्षांत म्हणजे 2014-15 या वर्षात ती 14.75 लाख मेट्रिक टन इतकी वाढून तिचे निर्यातमूल्य 29.28 हजार कोटी इतके होते. म्हणजेच भारताची बीफ निर्यात ही बासमती तांदळाच्या प्रमाणात क्रमांक दोनची असली तरी निर्यात मूल्यात ती क्रमांक एकवर होती. यावरून भारतीय शेतीच्या अरिष्टाचा वर्तमानकालीन संदर्भ लक्षात घेता भविष्यात या क्षेत्रातील रोजगार, विकास आणि व्यापारसंधी याकडे आपण डोळसपणे पाहायला हवे.

निवडणुकीआधी विकासाच्या नावावर भुलवणाऱ्या भाजपने सत्तेच येताच हिंदुत्वासाठी पर्यायी विकासमार्गही खुडायला सुरुवात केली. बीफ निर्यातीबरोबरच चामड्याचेही मोठे व्यापारक्षेत्र आहे आणि ते विस्तारतच आहे. एका बाजूला बीफ व्यापारातील फक्त कत्तलीच्या चर्चेलाच गडद करायचे आणि त्याच वेळी मात्र बीफच्या पंचतारांकित हॉटेल्समधल्या मेन्यूकार्ड आणि तिथे मिळणाऱ्या बीफ पदार्थांबाबत किंवा उच्चभ्रूंच्या अत्यंत लोकप्रिय असणाऱ्या महागड्या चामड्याच्या वस्तूंबाबतच काहीही बोलायचे नाही याला काय म्हणावे?जातीनिबद्ध भारतीय समाजात हलक्या आणि अस्वच्छ समजल्या गेलेल्या या क्षेत्रात अजूनही प्रामुख्याने फक्त राखीव पूर्वास्पृश्यच कार्यरत आहेत. तीच गोष्ट अल्पसंख्याकांच्या बाबतही खरी आहे. याबरोबरच भारतात जिथे 80 टक्के जनता दर दिवस फक्त 20 रुपयांवर गुजराण करते पण त्याचवेळी आत्यंतिक कष्टसाध्य उपजीविका करण्यास बाध्य असते तिथे स्वस्त पण प्रथिनयुक्त असा त्यांचा पारंपरिक बीफ आहाराचा घासही त्यांच्या तोंडून कायद्याच्या दमदाटीने काढून घेण्याचा हा लोकशाहीविरोधी, मूलभूत हक्कविरोधी बेकायदेशीर कुटील डाव आहे. थोडक्यात, हा कायदा प्राणी-पशू, निसर्ग वा शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन केलेला आहे असे म्हणता येणार नाही.

(मुक्त शब्द च्या जुलै 2015च्या अंकातील संपादकीय संपादित स्वरूपात)

मी मराठी Live च्या सौजन्याने

•••

# बलवीर पुंज यांची गोहत्याबंदी

## *विप्लव मेश्राम*

भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष बलवीर पुंज यांचा गोहत्याबंदीच्या समर्थनार्थ लिहिलेला लेख दैनिक लोकमतच्या 11 एप्रिल 2015च्या अंकात छापण्यात आला .गोहत्या बंदीचे समर्थन करताना त्यांनी असा तर्क केला की, गोमांस देशांतर्गत उपयोगाकरिता असो की, निर्यातीकरिता, त्याचा परिणाम पर्यावरणावर प्रतिकुल असा होईल .गोमांसाकरीता गायी पाळल्या तर त्याकरता जंगलांचे रूपांतर कुरणांत करावे लागेल .त्यांनी लॅटीन अमेरिकेच्या अनेक देशांची उदाहरणे दिली की, जंगलांचे कुरणांत रूपांतर करून गवताळ प्रदेश निर्माण केल्यामुळे तेथे पावसाचे प्रमाण घसरून अनेक गंभीर परिणाम झाले .आपल्या तर्काच्या समर्थनाकरिता वंदना शिवा यांच्या `द स्टोलन हार्वेस्ट' व फ्रान्सिस लॅपे मूर यांच्या `वर्ल्ड हंगर' ह्या पुस्तकांची नावे त्यांनी दिली.

अजब तर्क आहे !अगदी बिनडोक !!गोहत्येवर बंदी लादल्यावर जीवंत असलेल्या गायी दगड, माती चरणार काय? त्यांना चाराच लागणार नाही व म्हणून कुरणांची गरजच भासणार नाही असे घडणार काय? आहेत त्या पशूंची संख्या स्थिर ठेवण्याकरिता पशुंच्या कुटुंब नियोजनाची व्यवस्था भाजप सरकार करणार काय?

पुंज पुढे सांगतात की, औषध उद्योगांत जिलेटीन निर्माण करण्याकरिता लागणाऱ्या ढोरांच्या हाडांसाठी मृत ढोरांची) नैसर्गिकरिता मेलेल्या (हाडं वापरावी .औषध उद्योगातील जिलेटीन उत्पादनाकरिता लागणारा कच्चा माल म्हणजे ढोरांच्या हाडांच्या मागणीचा पुरवठा नैसर्गिकरित्या मेलेल्या ढोरांच्या हाडांनी साधणार आहे काय? आणि जी अर्थव्यवस्था केवळ नफा ह्यावर आधारलेली आहे, ती व्यवस्था हाडांच्या पुरवठयाकरिता केवळ नैसर्गिक मृत ढोरांवर समाधानी राहील व एवढयाकरिता अनैसर्गिक मृत्यूंचा थैमान घालणार नाही याची हमी पुंज देतील काय? आणि असे घडू नये म्हणून मुळातच `नफा'वर जगणारी भांडवलदारी व्यवस्था उलथून पाडण्याची पुंज व त्यांच्या पक्षाची भूमिका आहे काय? वीज निर्मितीकरिता पुंज यांनी गाईचे शेण वापरण्याचा सल्ला दिला आहे .ते म्हणतात की, काही दशकांत कोळशाचे साठे संपतील .तेव्हा वीज निर्मितीकरिता इंधन म्हणून शेणापासून तयार होणारा बायोगॅस वापरण्यात यावा .देशाला लागणाऱ्या एकूण वीज निर्मितीकरिता जे बायोगॅस लागेल त्याकरिता किती शेण लागेल, त्याची पूर्तता कशी होईल, ट्रान्सपोर्टेशनची काय व्यवस्था होईल? कारण गाई देशभर विखुरलेल्या असतील, ह्याची कोणतीही माहिती पुंज यांनी दिलेली नाही.

कमीत कमी प्रायोगिक तत्वावर तरी केवळ दिल्ली शहराकरिता शेणापासून निर्मित बायोगॅस आधारित वीजनिर्मितीचा प्रकल्प मोदी सरकारने उभारून दाखवावा .जैतापूर प्रकल्पाकरिता पंतप्रधान मोदी फ्रान्सबरोबर करार करीत आहेत .पुंज यांनी मोदींना तत्काळ थांबवून हा प्रकल्प गाईच्या शेणावर चालविण्याचा सल्ला का दिला नाही? गेल्या वीसेक वर्षांपूर्वी महाराष्ट्र शासनाने खेडयापाडयात घरोघरी बायोगॅसच्या चुलींचा प्रकल्प राबविला होता, त्याची काय गत झाली? एका तरी घरी ही बायोगॅस चूल वीस वर्षांपासून पेटत आहे काय? पुंज महाशयांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री फडणवीसांबरोबर संपर्क साधून माहिती घ्यावी.

पुढे पुंज महाशय म्हणतात की, `वैदिक काळात गोमांस भक्षणाची परंपरा होती असे डावे लोक म्हणतात व हा युक्तिवाद थांबविण्याकरिता मान्य करू या की कदाचित तसे होत असेल', पुंज महाशय कदाचित नाही तर खचितच तसे होते .अगदी वेदच नाही तर स्मृतिंतही ह्याचे स्पष्ट दाखले आहेत .तैतरीय संहिता स्पष्ट घोषणा करते - `अथो अन्नंते गौ' म्हणजे गाय खरोखर अन्न आहे .केवळ डावे पक्ष म्हणतात म्हणून वैदिक पूर्वज तोंडात गोमांसाचा घास ओतत नव्हते .मनुस्मृतित तर भक्षण योग्य पशू पक्षांची लांबलचक यादीच दिलेली आहे .त्यात स्पष्ट म्हटले आहे की, वशिष्ठ ऋषीने हजार गायी फस्त केल्यावरही त्यांना तपोबलामुळे पाप लागले नाही !ऋग्वेदांत आले आहे की, वामदेव ऋषीने पोटांत भुकेचा आगडोंब उसळला तेव्हा कुत्र्याचे आंतडे शिजवून खाल्ले .पुंज महाशय !डावे पक्ष म्हणतात म्हणून नाही तर ज्या श्रृति, स्मृति, पुराणं, महाकाव्यांना तुम्ही पवित्र मानता त्यांतच गोमांससहीत अन्य पशू -पक्षी भक्षणांच्या परंपरांचे दाखले विखुरले आहेत .डोळे उघडून वाचा इतकेच!!

पुंज पुढे म्हणतात, `गेल्या 7000 वर्षात परिस्थिती खूप बदलली आहे .धार्मिक मान्यतेमुळे अस्पृश्यतेचे पालन करण्यात येत होते, पण अस्पृश्यता आता संपुष्टात आली असून घटनेनेसुद्धा ती अमान्य केली आहे .एकेकाळी सती प्रथेचे समर्थन होत होते आणि विधवा स्त्रियांना चितेवर उडी मारून आत्मदहन करावे लागत होते, तेव्हा अनेक धार्मिक प्रथांना विरोध करणारे लोक गोहत्याबंदीलाही विरोध करून गोमांस भक्षणाचे परंपरेच्या आधारे समर्थन करीत आहेत.'

पुंज महाशय हातचलाखी करीत आहेत .एक तर 7000 वर्षाचा कोणता इतिहास ते सांगतात .`इ.स .पूर्व 5000 वर्षांपूर्वी भारतात कोणती परिस्थिती होती?' ह्या वाक्याने ते आपली परंपरा हजारो वर्षे मागू नेऊ पाहतात .भारतातील प्रथम नागरी संस्कृती मोहेंजोदारो-हडप्पाचा प्रारंभ इ.स.पूर्व 3000ला झाला .या संस्कृतीचा आर्यांशी संबंधच नव्हता !या संस्कृतीच्या अवसान काळात इ.स.पूर्व 1500मध्ये आर्यांनी

हल्ले करून तिच्या नष्ट होण्यात शेवटची भूमिका वठवली .इ.स.पूर्व 5000 म्हणजे 7000 वर्षांपूर्वी भारताच्या तुरळक भागांत नव-पाषाण युग होते.

अस्पृष्यता नष्ट झाली) ती आजतागायत पूर्णपणे नष्ट झाली नाही, अजूनही त्याचे अवशेष आहेतच (ती काही धार्मिक उदारपणामुळे नाही तर अस्पृश्यांच्या आणि विशेषत :डॉ .बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीमुळे! आणि ज्या सती प्रथेला पुंज महाशय स्त्रियांचे `आत्मदहन' संबोधतात, ते आत्मदहन नसून बळजबरीने चितेत विधवांना ढकलून केलेले खून होते !`आत्मदहन' शब्द वापरून पुंज महाशय अघोरी, अमानुष खुनांना गोंडस नांव देत आहेत .अस्पृश्यता व सती प्रथेच्या विरोधात जेव्हा चळवळी सुरू झाल्या, तेव्हा `धर्म बुडाला' अशी आवई देणाऱ्या सनातन्यांचाच वारसा पुंज महाशय व त्यांचा संघ परिवार चालवित आहे .काही दशकांपूर्वा जेव्हा रूपकंवर सती प्रकरण घडले तेव्हा त्याचे उदात्तीकरण व समर्थन करण्यात पुंज महाशयांच्याच पक्ष व संघपरिवार आघाडीवर होता हे विसरणे शक्य नाही.

अस्पृश्यता, सतीप्रथेचे समर्थन व गोमांस भक्षणाचे समर्थन समान पातळीवरचे नाहीत .अस्पृश्यता व सतीप्रथा अमानवी व असमानतेचे प्रकार आहेत .तसे खाण्याचे नाही .परंतु पुंज त्यांना एकाच पारडयात तोलतात .पुंज महाशयांच्या पक्षाचेच सरकार महाराष्ट्रात आहे .या भाजप सरकारने `गोवंश हत्या बंदीचा' कायदा केला .गोमांस बाळगणे हा गुन्हा ठरविला .गडचिरोलीच्या भामरागड तालुक्यात वटेली गांव आहे .ह्या गावात आदिवासी गायी पाळतात त्या खाण्याकरिता .शेतीकरिता ते बैलांचा वापर करीत नाहीत व दूधही पीत नाहीत .दूध पिणे ते पाप समजतात .अशी अनेक गांवे गडचिरोलीत आहेत .आता फडणवीस ह्या आदिवासींना जेल यात्रा घडविणार आहेत काय?

पुंज महाशय आपल्या लेखात `वाघ वाचवा मोहीम' व `गोहत्त्या प्रतिबंध' याची तुलना करतात व प्रश्न उपस्थित करतात की, वाघ वाचवा मोहीम योग्य आहे तर गोहत्या प्रतिबंध कां नाही? वाघ वाचवा मोहीम ही पर्यावरण, जंगल व जैव विविधतेकरता आवश्यक आहे .शिवाय पर्यटनामुळे शासनाला आर्थिक फायदाही मिळतो .तुमच्या भाकड गायी व म्हातारे बैल आणि रस्त्यावर धुमाकूळ घालणारे मोकाट सांड बघायला तुम्ही स्वत:ही जाणार नाही .पर्यटकांची तर बातच नाही .गोहत्याबंदीचा हा प्रकार निव्वळ धार्मिक भावनांना चिथावणी देण्याचा राजकीय घाट आहे.

मात्र एक बाब कबूल करावी लागेल, पुंज महाशयांनी आपल्या लेखात मोगल बादशाह अकबर आणि बहादूरशाह जफर यांनी गोहत्याबंदी केली होती असे म्हटले आहे .नशीब !नाहीतर पूंज महाशयांच्या पक्षातील अनेक खासदार, तथाकथित साधू आणि साध्व्या व एकूणच संघ परिवार मोगल बादशाहसहीत सर्वच मुस्लिमांच्या विरूद्ध उघडपणे गरळ ओकतात.

भारतातील कृषीक्षेत्रांत अनेक बदल होत आहेत .यंत्रांचा उपयोग वाढीला लागला आहे .बैल आज जरी शेतीच्या कामात असतील तरी पण तो दिवस काही फार दूर नाही जेव्हा कृषी कार्यातून जनावरे कालबाह्य होतील, म्हणून `गोवंशाचा शेतीला उपयोग'चे तुणतुणे वाजविण्यात अर्थ नाही .आणि आज जरी बैलांचा वापर शेतीत होत असला तरी म्हातारी, निरूपयोगी जनावरे, भाकड गायी वगैरे आधीच तोटयाची शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना परवडणारी नाहीत.

कोणी काय खावे? आणि काय नाही? हा ज्याचा त्याचा हक्क आहे .केवळ धार्मिक भावनांना हात घालून राजकारण करण्याकरिता कायदा करणे म्हणजे शुद्ध मूर्खपणा व हुकुमशाही पद्धत आहे.

जीवनमार्ग (28 जून – 4 जुलै 2015)च्या सौजन्याने

•••

# अल्पसंख्याकांसोबत शेतकऱ्यांनाही मारणार काय?

*सुरेश द्‌वादशीवार*

छत्तीसगडच्या भाजप सरकारने शाळांमध्ये सूर्यनमस्कार आवश्यक केले .राजस्थानच्या भाजप सरकारने गीतेचा अभ्यास अनिवार्य केला .मध्य प्रदेशच्या भाजप सरकारने शालेय अभ्यासक्रमात हिंदूंच्या धर्मग्रंथातील उतारे समाविष्ट केले आणि गुजरातच्या भाजप सरकारने सगळ्या सरकारी शाळांत सरस्वतीपूजन आवश्यक ठरविले .महाराष्ट्राच्या भाजप सरकारने गोवंश हत्याबंदीचा कायदा करताच हरियानाच्या भाजप सरकारनेही तो त्या राज्यात लागू केला .दिल्लीतील दंगलीत मृत्यू पावलेल्या चार हजार शिखांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी पाच लाख रुपये देणाऱ्या केंद्रातल्या भाजप सरकारने गुजरातमधील दंगलीत मृत पावलेल्या दोन हजारांवर मुसलमानांना तशी मदत देण्याचा साधा विचारही केला नाही .गुजरातच्या न्यायपीठाने त्या दंगलीतील सगळ्या गुन्हेगारांना ससन्ममान मुक्त करणारे निर्णयच अलीकडे दिले, हे या संदर्भात महत्त्वाचे .सरकारी शाळा या कोणत्या पक्षाच्या मालकीच्या नाहीत आणि गुजरातची न्यायालयेही भाजपने स्थापन केलेली नाहीत .गोवंशाच्या हत्येवर बंदी घालणारा कायदा करण्याआधी महाराष्ट्राच्या व हरियानाच्या सरकारांनी त्या वंशाचे पालन करणाऱ्या आणि त्यावरच अवलंबून असणाऱ्या लोकांच्या त्या कामातील अडचणी कधी जाणून घेतल्या नाहीत .हा सारा देशाच्या राजकारणाने त्याच्या समाजकारणाला उजवे, कर्मठ आणि धर्मभोळेपणाकडे जाणारे वळण देण्याच्या चालविलेल्या प्रयत्नांचा भाग आहे .या देशात हिंदू समाज मोठा म्हणजे 80 टक्क्यांएवढा आहे आणि त्याला या मार्गाने प्रसन्न करून आपली आसने स्थिर करण्याच्या या सरकारांच्या हेतूची ही परिणती आहे .एखादा कसाई विकत असलेले मांस गाईचे आहे की बकरीचे, असा संशय आल्यास काय करायचे, या प्रश्नाला हरियाना सरकारने दिलेले अचाट उत्तर -त्या 'मांसाचे नमुने फोरेन्सिक लॅबोरेटरी'त पाठवायचे हे आहे .सुनंदा पुष्कर या प्रसिद्ध स्त्रीचा 'मृत्यू' होऊन आता एका वर्षाचा काळ लोटत आला .तिचा व्हिसेरा त्याच्या विश्वसनीय तपासणीसाठी दोन महिन्यांपूर्वी इंग्लंडच्या फोरेन्सिक लॅबोरेटरीत पाठविण्यात आला .त्याचा अहवाल सरकारच्या हाती अजून यायचा आहे .आपल्या अशा लॅबोरेटरीजची स्थिती केवढी चिंताजनक आहे, ते सांगणारी ही बाब आहे .या लॅबोरेटरीज गाईचे मांस निश्चित करून त्याविषयीचा अहवाल देईपर्यंत कसायांची दुकाने बंद राहायची नाहीत आणि त्यांची गिऱ्हाइकेही त्यासमोर वाट पाहत थांबायची नाहीत .कोणतीही पूर्वतयारी न करता आणि कोणालाही विश्वासात न घेता कधी काळी केलेल्या घोषणांनी ठरविलेली धोरणे अमलात आणण्याचे असे परिणाम यापुढे आपण आणखी अनुभवणार आहोत.

हिंदूंच्या प्रार्थना, गीता, सूर्यनमस्कार वा सरस्वतीपूजन ज्या सरकारी शाळांत आवश्यक केले गेले, तेथे मुसलमान, ख्रिश्चन, ज्यू, शीख, जैन व बौद्ध समाजाची मुले कशी जातील व राहतील? गीतापठणासोबत कुराणातील आयती येणार नाहीत आणि बुद्धवंदनाही चालणार नाही .भारताच्या बहुधर्मी समाजाला धर्मनिरपेक्ष बनविण्याऐवजी एकधर्मी बनविण्याचा हा उद्‌योग याआधी अनेकांच्या मनात होता; मात्र त्यातून एकात्म राष्ट्र उभे होण्याऐवजी द्‌विराष्ट्रवाद उभा राहिला, हा इतिहास आपण एवढ्यातच विसरलो काय? द्‌विराष्ट्रवादाची भाषा बोलणारे तेव्हाही 'फायनल सोल्युशन'वर आलेले आपण पाहिले . परवाच भाजपच्या एका खासदाराने ही फायनल सोल्युशनची वेळ आहे असे सांगितले. धर्म आणि राजकारणाचे हे भांडण नाही.

कायद्‌याचे व तो ज्यांच्या पोटावर उतरेल त्यांच्यातले आहे .धर्माची किंवा गाईची पूजा हा या प्रकारावरचा उतारा नव्हे .गाय हा पशू आहे असे म्हणणारा विज्ञाननिष्ठ क्रांतिकारकही धार्मिकच होता .

त्याला अधार्मिक ठरविण्याचे सामर्थ्य कोणात आहे? अशा वेळी त्याचे नाव न स्मरणे, हाच त्यावरचा उपाय होतो .सोय असेल तेव्हा स्मरण, गैरसोय असेल तेव्हा विस्मरण -हा धर्माचा भाग मात्र होत नाही .बोलून दाखविले .फायनल सोल्यूशनचा अर्थ त्याला ठाऊक असला तरी तो देशाच्या लक्षात राहिला असेलच, असे नाही .हिटलरने त्याच्या अखेरच्या काळात ज्यू धर्माचे लोक नाहीसे करण्यासाठी हे 'फायनल सोल्युशन' पुढे केले .त्यानुसार लक्षावधी ज्यूंना ज्वालागृहात घालून ठार मारण्याचा व तो धर्म संपवून टाकण्याचा उद्योग त्याने करून पाहिला .इतिहास सांगतो, त्याने साठ लाखांवर ज्यूंची अशी जाळून हत्या केली. भाजपच्या खासदाराला ज्यांचे फायनल सोल्युशन करायचे आहे, ते वर्ग कोणते आहेत?

सन 2011 च्या जनगणनेनुसार भारतात हिंदूंची संख्या 80 टक्के म्हणजे 82 कोटी 70 लाख एवढी होती .त्या खालोखाल मुसलमानांची संख्या 19 टक्के म्हणजे 13 कोटी 80 लाख होती .शिवाय त्यात 2 कोटी 40 लाख ख्रिश्चन, 1 कोटी 90 लाख शीख आणि जैन व बौद्ध मिळून 40 लाख लोक होते . उजव्या कर्मठांचा राग यांतल्या मुसलमान व ख्रिश्चनांवर आहे .मात्र त्यांच्याबाबत हे सोल्युशन वापरण्यात फार अडचणी आहेत .हिटलरने साठ लाख ज्यू मारले तरी जगात ज्यू शिल्लक राहिले आणि त्यांनी इस्राईल हा स्वतःचा देश उभा केला .अमेरिकेने द .व्हिएतनामच्या चाळीस लाख लोकांवर वर्षानुवर्षे बॉम्बवर्षाव केला; पण अखेर अमेरिका हरली आणि हो-चि-मिन्ह हा स्वातंत्र्याचा प्रतिनिधी म्हणून जगासमोर उभा राहिला .मोठा समाज मारता येत नाही आणि लहानांचे चिवटपणही संपविता येत नाही .ज्या काळात बादशाही वा हुकूमशाही होती, तेव्हा जे शक्य झाले नाही ते आताच्या लोकशाहीच्या काळात यशस्वी व्हायचेही नाही .जी गोष्ट फायनल सोल्युशनने झाली नाही आणि अमेरिकेच्या नापाक बॉम्बसना जमली नाही; ती गोष्ट सूर्यनमस्कारांनी आणि सरस्वतीच्या पूजनाने करता येईल असे ज्यांना वाटते, त्यांच्या आशावादाविषयी आदर व्यक्त करूनही त्यांना हे नम्रपणे सांगितले पाहिजे की, तुम्ही चुकीची व दुहीची बीजे पेरत आहात .यातून तुम्हाला हवे ते कधी साध्य होणार नाही .विषाच्या बीजाला अमृताची फळे कधी येत नाहीत.

मग ओडिशात बाराशे चर्चेस जाळून तुम्ही काय साधले? गुजरातेत शेकडो मशिदी उद्ध्वस्त करून तुम्ही काय मिळविले? कर्नाटकात अन्य धर्मीयांची शेकडो पूजास्थाने तुम्ही नाहीशी केलीत, त्यातून तुमच्या हाती काय लागले? दिल्लीतले मोदींचे सरकार हे याच कृत्यांचे अपत्य आहे, असे तुम्ही मानता काय? तसे तुम्ही समजत असलात, तरी मोदी ते मानत नाहीत आणि ते खरेही नाही .मोदींचे सरकार केंद्रात आल्यानंतर अवघ्या नऊ महिन्यांत त्याला देशाची राजधानी गमवावी लागली आहे .ज्यांनी ती हिरावून घेतली, ते सूर्यनमस्कार किंवा सरस्वतीपूजन यातली कोणतीही गोष्ट करणारे नव्हते .शिवाय त्यांनी कुराण वा बायबलही हाती घेतले नव्हते .ते धर्माने हिंदू होते व आहेत .भारताने स्वीकारलेली धर्मनिरपेक्षतेची (सेक्युलरिझम) संकल्पना केवळ वैचारिक कारणांसाठी त्याने अंगीकारली नाही; ती राजकीय कारणांसाठीही आपण स्वीकारली आहे .'काश्मीर भारतात असणे ही भारतात राहणाऱ्या कोट्यवधी मुसलमानांच्या सुरक्षिततेची हमी आहे', हे पं.नेहरूंनी पाकिस्तानला ऐकविलेले वाक्य एका वेगळ्या संदर्भात आपण समजून घेणे गरजेचे आहे .धर्मनिरपेक्षता स्वीकारताना भारताच्या घटनाकारांसमोर फक्त काश्मीरच नव्हते; अरुणाचल, नागालँड, मणिपूर, मिझोरम, त्रिपुरा आणि मेघालय हे प्रदेशही होते .शिवाय त्यात केरळ, भोपाळ आणि हैदराबादचाही विचार होता .हे सारे केवळ धर्माचा विचार करणाऱ्यांना न पचणारे आहे .पण देशाचा एकात्म विचार करणाऱ्यांना तो याच मार्गाने करावा लागणार आहे .

स्वतःला साधू, बैरागी, संत, बुवा, बापू, बाबा, श्रीश्री किंवा साध्व्या म्हणवून घेणारेच जोवर असे बोलत होते, तोवर त्याची चिंता करण्याचे कारण नव्हते .या माणसांकडून तोंडची वाफ व ऐकणाऱ्यांचा वेळ दवडण्याखेरीज फारसे काही होत नाही आणि स्वतःला त्यांचे शिष्य म्हणविणारे आपापल्या कुंपणातच बहुधा राहत असतात .आताची गोष्ट वेगळी आहे .या माणसांची भाषा आता सत्तेवर आलेली सरकारेच बोलू लागली आहेत आणि सरकारे अशी अनुकूल असली की, अनुयायांचे वर्ग कोणता उत्पात घडवू शकतात ते2002 च्या गुजरात दंगलींनी देशाला दाखवून दिले आहे .मारणारे मोकळे राहिले, मारू देणारे सुटत राहिले आणि पूर्वीची कठोर न्यायालये नंतर मवाळ होतानाही दिसली .त्यांतल्या काहींवर कर्मठांचे झेंडे लागले असावे, असे चित्र उभे राहिले; त्याखेरीज 'मोदी हे एक अतिशय स्वच्छ, प्रगतिशील व प्रामाणिक गृहस्थ आहेत' असे घटनेने केलेल्या सत्तेच्या विभाजनात न बसणारे वाक्य न्या.एच.एम.दत्तू या देशाच्या सरन्यायाधीशाने उच्चारले नसते .सत्तास्थाने आणि त्यांचे समर्थक जेव्हा एका भाषेत बोलतात, तेव्हा ती भाषा फार काळजीपूर्वक समजावून घ्यावी लागते .देशातील सगळ्या नागरिकांची 'रामजादे' आणि 'हरामजादे' अशा दोन वर्गांत विभागणी करणारी निरांजना ही नुसती साध्वी नाही, ती मंत्रीही आहे .मोदीना म्हणजे भाजपला न मानणाऱ्या साऱ्यांनी देश सोडून चालते व्हावे, असे म्हणणारा साक्षीबुवा किंवा आदित्यनाथ हे नुसते साधू नाहीत; ते लोकसभेचे सभासद आहेत . 'सोनिया गांधी जन्माने नायजेरियन असत्या तर' असे वर्णविद्वेषी व बेशरम उद्गार काढणारा गिरिराज सिंह संत नाही, मंत्री आहे .त्याचप्रमाणे गीतापठण ते सरस्वतीपूजन म्हणणारे लोक साधे धर्मसेवक नाहीत, मुख्यमंत्री आहेत .राज्यकर्तेच जेव्हा असे धर्माचे झेंडे खांद्यावर घेतात, तेव्हा ते साधे सत्ताधारी राहत नाहीत, धर्मांध होतात आणि त्याच वेळी ते हिंस्रही होण्याची भीती उभी होते .मग ते हिंदू स्त्रियांना पोरांचे कारखाने बनवायला निघतात आणि प्रत्येक हिंदू स्त्रीने चार ते दहा पोरे जन्माला घातलीच पाहिजेत, अशा प्रतिज्ञा त्या स्त्रियांनाच करायला लावतात .हे सारे ऐकून घेणारे लोकही काही काळ आपण क्रांतिपथावरून किंवा ध्येयपथावरून चालत असल्याचा भ्रम अनुभवत असतात.

गोवंशाचे रक्षण हे आपल्या धर्माने एके काळी आपले कर्तव्य मानले; मात्र या संबंधीचे वास्तव कधी तरी लक्षात घेतलेच पाहिजे .या प्राण्यांचे मांस फक्त हिंदूंमधल्या व त्यातही आर्यावर्त म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशातील वरिष्ठ जातीच्या लोकांनीच वर्ज्य मानले .सन 1993 मध्ये मानववंशशास्त्रज्ञांनी देशात केलेल्या अध्ययनातून समोर आलेली एक आकडेवारी येथे नोंदविण्याजोगी आहे .देशातील एकूण 4635 मानवी समूहांपैकी 88 टक्के समूह मांसाहारी आहेत .या मांसाहारी समूहांत गोमांसभक्षण करणाऱ्यांची संख्या किती, ते या अहवालाने सांगितले नसले तरी इतर अभ्यासकांच्या मते ती निम्म्याएवढी भरावी अशी आहे .ख्रिश्चन, मुसलमान व अन्य धर्मांच्या लोकांनीच तो त्यांच्या चरितार्थाचा भाग मानला, असे नाही; हिंदूंमधील कनिष्ठ मानल्या जाणाऱ्या अनेक जातींत हे मांस त्यांच्या खाद्यपदार्थांचा भाग होते .गरिबांचा एक मोठा वर्गही मांसाहारी म्हणून ते वर्ज्य मानत नव्हता .कोंबड्या, बकरे, बदक वा इतर प्राण्यांचे मांस महागडे म्हणून त्याला परवडणारे नव्हते .हा वर्ग गाई, बैल व तशाच इतर प्राण्यांच्या मांसावर आपली भूक व आवड भागवीत राहिला आणि अजूनही तो तसा आहे .आदिवासींचे अनेक वर्गही त्याला अपवाद नाही .नागालँड, मणिपूर, अरुणाचल, मिझोरम, त्रिपुरा, आसाम व बंगालच्या अनेक भागांतील लोक, तसेच केरळमधील अवर्णांएवढेच सवर्णांमधील मोठे वर्ग गोमांस खाणारे आहेत .केरळातील अनेक ब्राह्मण कुटुंबातही ते वर्ज्य मानले जात नाही .या सामाजिक बाबीला एका आर्थिक वास्तवाची असलेली जोडही महत्त्वाची आहे .ग्रामीण भागातला शेतकऱ्यांचा मोठा वर्ग गाईगुरांना वास्तव अर्थाने गोधन मानतो .वर्षाकाठी जवळची जुनी जनावरे विकणे आणि आलेल्या पैशांत काही भर घालून नवी जनावरे विकत घेणे, ही

त्याची वर्षानुवर्षांची परंपरा आहे .या पैशातून ही माणसे आपल्या घरादाराला हातभारही लावतात . विकलेली जनावरे पुढे कुठे जातात याची फारशी काळजी ती करीत नाहीत .नव्या कायद्यामुळे शेतकऱ्यांचे हे अर्थतंत्र मोडीत निघणारे व याच्यावर भाकड जनावरे पाळण्याची नवी जबाबदारी लादणारे आहे .आपले संसार ज्यांना नीट राखता व ओढता येत नाहीत, त्यांनी या भाकड जनावरांचे काय करायचे असते? हरियानाचे मुख्यमंत्री खट्टर म्हणतात, 'आमचे सरकार अशा गुरांसाठी जागोजागी पांजरपोळ उघडील.' म्हणजे त्यांना पुन्हा सरकारी अनुदाने देणे आले व भाकड जनावरे तिथवर पोहोचविणे आले .ज्यांना माणसांचे वृद्धाश्रम धड चालविता येत नाहीत, ते भाकड जनावरांचे हजारो पांजरपोळ कसे चालवतील? खट्टरांचे सरकार तर प्रत्येक गाईच्या व बैलाच्या गळ्यात इलेक्ट्रॉनिक कॉलर बसविण्याची भाषा बोलत आहे .कारण काय, तर म्हणे त्यांची चोरी होता कामा नये .'भारतात बाईहून गाई जास्तीच्या सुरक्षित होणार आहेत', असे परवा सलमान रश्दी म्हणाले ते अशा वेळी खरे वाटण्याजोगे आहे.

देशी गाईचे वा बैलाचे सर्वसाधारण वय पंधरा ते वीस वर्षे एवढे असते .यातली गाय वयाच्या चौथ्या वा पाचव्या वर्षापासून पुढची फक्त पाच ते सहा वर्षे दूध व वासरे देऊ शकते .पुढला तिचा काळ एक भाकड जनावर म्हणून निभत असतो .बैलही अखेरची आठ ते दहा वर्षे कामाबाहेर जातो .या भाकड गुरांचा भार सरकारने उचलला नाही, तर तो शेतकऱ्यांना वाहावा लागणार आहे आणि ही बाब शेतकऱ्यांच्या -उशिरा म्हणजे -कायदा लागू झाल्यानंतर ध्यानात येऊ लागली आहे .याविषयीचा असंतोष आता खेड्यांमध्ये संघटितही होऊ लागला आहे .गाईला गोमाता म्हणणारी व तिच्या आरत्या करणारी शहरी माणसे गायी पोसत नाहीत, शेती करीत नसल्याने त्यांना बैलही पाळावे लागत नाहीत . प्लॅस्टिकच्या पिशव्यांमधून येणारे व भैय्या आणून देत असलेले दूध विकत घेणारी ही माणसे गाईगुरांच्या व्यवस्थापनातील या अडचणी व खर्च कसा ओळखणार? जरा दुष्काळ पडला की, गुरांच्या पाण्याची आणि चाऱ्याची व्यवस्था सरकारने करावी, अशी ओरड ग्रामीण भागात सुरू होते .भाकड जनावरांची गर्दी वाढली की ही ओरड कायमची होईल, हे भविष्य नजरेआड कसे करायचे? प.महाराष्ट्रातला ऊस पिकवणारा धनवान शेतकरी या भाकड जनावरांचा शेणासाठी, म्हणजे सेंद्रिय खतांसाठी वापर करतो .त्यासाठी त्याच्याजवळ शेतातल्या कोरड्या उसाची तणकटे व कचरा भरपूर असतो .तो त्यांना उसाची मळीही खाऊ घालतो .तरीही त्याला जर भाकड जनावरांचे ओझे वाटत असेल. कोरडवाहू शेती करणाऱ्या गरीब शेतकऱ्यांचे काय? त्याला त्याची पोरे वाढविणे अवघड होत असेल, तर तो या भाकड गुरांचे ओझे कसे वाहणार? महाराष्ट्रापुरते बोलायचे तर -मराठवाडा आणि विदर्भातला सारा शेतकरीवर्गच उद्या या भाकड गुरांच्या ओझ्याखाली वाकलेला दिसेल. हे गोहत्येचे समर्थन नाही .मात्र गोरक्षणाचा कायदा करण्याआधी त्याविषयी ग्रामीण भागातील खऱ्या गोरक्षकांशी चर्चा न करण्याचे आणि त्यांना विश्वासात घेऊन गोरक्षणाच्या सरकारी व्यवस्था अगोदर न आखण्याचे हे संभाव्य परिणाम आहेत.

गठ्ठा मतांच्या भयापोटी लोकप्रतिनिधी गप्प राहणार आणि मिळालेली मते आणखी घट्ट होतील या आशेने सरकार या नव्या कायद्याला चिकटून राहणार .यात भरडला जाणारा वर्ग मग प्रतिनिधित्वावाचूनचा होतो आणि आजवरच्या व्यवहारात गुंतलेला वर्ग गोमातेच्या हत्येचे म्हणजे मातृहत्येचे पातक कपाळी चिकटविले जाणार म्हणून गप्प राहतो .धर्म व परंपरा यांचे नाते विचारांहून भावनांशी अधिक आहे .त्यात तर्क नसतो, श्रद्धाच तेवढी असते .पशुपालनाच्या ज्या अवस्थेत समाजाने गाई-गुरांची खिल्लारे बाळगली, तेव्हाही त्यांनी गोमांस वर्ज्य मानले नाही, हे वास्तव अशा वेळी कोण सांगणार? आणि सांगितले तरी, आताच्या धर्मोन्मादी काळात ते कोण ऐकणार? धर्म आणि राजकारणाचे

हे भांडण नाही .कायद्याचे व तो ज्यांच्या पोटावर उतरेल त्यांच्यातले आहे .धर्माची किंवा गाईची पूजा हा या प्रकारावरचा उतारा नव्हे .गाय हा पशू आहे असे म्हणणारा विज्ञाननिष्ठ क्रांतिकारकही धार्मिकच होता .त्याला अधार्मिक ठरविण्याचे सामर्थ्य कोणात आहे? अशा वेळी त्याचे नाव न स्मरणे, हाच त्यावरचा उपाय होतो .सोय असेल तेव्हा स्मरण, गैरसोय असेल तेव्हा विस्मरण -हा धर्माचा भाग मात्र होत नाही.

या देशातील बहुसंख्य कत्तलखाने हिंदूंच्या व जैनांच्या मालकीचे आहेत, हे वास्तव तरी सांगायचे की नाही? ते चालविताना या मालकांचा व्यवसायधर्म त्यांच्या खऱ्या धर्माहून मोठा ठरत असतोच की नाही?... असो .यापुढचा काळ अशा आणखी अनेक विसंगतींना सामोरे जायला लावणारा आहे .मात्र या विसंगती समाज मुकाट्याने खपवून घेतो, असे कोणत्याही राजकारणी माणसाने व पक्षाने समजण्याचे कारण नाही .समाजाला ते अनुभवातून कळतच असते .तशा समाजाला अडवायला लोकसभेतले बहुमत कामी येत नाही .दिल्लीतील लोकसभेच्या सातही जागा मोदींच्या पक्षाने जिंकल्या .एका वर्षातच त्या राज्याच्या विधानसभेतील 70 जागांपैकी अवघ्या तीन जागा त्याला जिंकता आल्या. मोदींच्या मागे त्यांच्या पक्षाचे 282 खासदार आहेत आणि त्या बळावर ते सारेच काही घडवू शकतील, असे कोणी समजण्याचे कारण नाही .राजीव गांधींच्या मागे लोकसभेत413 सभासद होते .पण त्यांचे सरकार त्याच्या सत्तेची पाच वर्षेही पूर्ण करू शकले नाही, हे कसे विसरता येईल?... या संदर्भात समाजवादी पक्षाच्या मुलायमसिंहांनी लोकसभेत केलेले एक वक्तव्यही नोंदविण्याजोगे आहे .नरेंद्र मोदींना उद्देशून मुलायमसिंह म्हणाले, “तुम्ही फक्त 31 टक्के मते मिळवून सत्तेवर आला आहात .तुमच्या विरोधात देशाने 69 टक्क्यांएवढे मतदान केले आहे .आम्ही विभागलो होतो, एवढ्याच एका कारणाने तुम्ही सत्तेत आला आहात .आज मात्र (भूमी अधिग्रहण विधेयकाला विरोध करण्यासाठी) आम्ही सारे एकत्र आलो आहोत, हे लक्षात घ्या...” मुलायमसिंह हे आपल्या पवारांसारखेच निसरडे राजकारणी नेते आहेत . तरीही त्यांच्या इशाऱ्यात तथ्य आहे आणि तसेही एकूणच सारे राजकारण निसरडे म्हणावे असेच असते की नाही?

जाता-जाता एका गोष्टीचे स्मरण पुन्हा एकवार .भारत हा प्रकृतीने मध्यममार्गी देश आहे .एखाद्या प्रसंगी संतापाने तो डाव्या वा उजव्या बाजूला झुकलेला दिसला, तरी सारे स्थिरस्थावर होताच तो पुन्हा त्याच्या मूळच्या मार्गावर येतो, हे वास्तवही अशा वेळी ध्यानात ठेवायचे असते.

‘साप्ताहिक साधना’ (25 एप्रिल 2015) च्या सौजन्याने)

sdwadashiwar@gmail.com

•••

# आता गोमाता केवळ पूजेपुरतीच उरणार का?

*नीळकंठ रथ*

आपल्या देशातील गोधनात आणि गोधनाच्या संख्येत अतिशय मूलभूत स्वरूपाचे स्थित्यंतर घडून येत असल्याची चिन्हे अलीकडील काळात दृग्गोचर होत आहेत (या ठिकाणी व इथून पुढे लेखात सर्वत्र मगोधन’ या संज्ञेत गाई, बैल, गोèहे, कालवडी, खोंड या सगळ्यांचा अंतर्भाव केलेला आहे). आपल्या देशातील गोधनाच्या संख्येत 1956 ते 1960 या पाच वर्षांच्या काळात दर वर्षी सरासरी दोन टक्के दराने वाढ घडून येत होती. त्याच काळात वार्षिक सरासरी वाढीचा हाच दर ओडिशामध्ये साडेचार टक्के असा होता, तर उत्तर प्रदेशात ही वाढ दरसाल सरासरी 2.7 टक्के दराने घडून येत होती. गोधनामधील

वार्षिक वाढीचा हा दर जवळपास देशाच्या लोकसंख्यावाढीच्या दराइतकाच होता. देशातील दर 100 व्यक्तींमागे 50 गोधन असे चित्र त्या काळात दिसत होते. एकंदरीने, सगळीच परिस्थिती हाताबाहेर जाण्याची भीती त्या काळात वाटत असे. परंतु, त्यापुढील अर्धशतकभरात ते चित्र सुदैवाने पालटले. सन 1992 मधील आकडेवारीनुसार, त्या वर्षी देशात एकूण गोधन होते 20 कोटी इतके. दर 100 व्यक्तींमागे 23 असे ते प्रमाण भरले. त्यानंतरच्या दोन दशकांदरम्यान देशातील गोधनामध्ये जवळपास 6.69 टक्क्यांची घट घडून येऊन गोधनाची संख्या 20 कोटींवरून 19 कोटींपर्यंत खाली आल्याचे संबंधित आकडेवारी आपल्याला सांगते.

परंतु, या बदलाचे अंतरंग अधिक बारकाईने न्याहाळावयास हवे. कारण आपल्या देशातील देशी गोधन आणि संकरित वाणाचे परदेशी गोधन या दोहोंतील बदलांची दिशा या काळात भिन्न-भिन्न राहिलेली दिसते. संकरित वाणाच्या परदेशी गोधनाची संख्या सातत्याने वाढत असल्याचे वास्तव पुढे येते आहे. एकंदर गोधनामध्ये संकरित वाणाच्या गोधनाचे संख्याबळ 1992 मध्ये साधारणपणे दीड कोटीच्या आसपास होते, तीच संख्या 2012 मध्ये पोहोचलेली दिसते जवळपास चार कोटींच्या परिघात. संकरित वाणाच्या गोधनाचे देशातील एकूण गोधनामध्ये 1992 मध्ये असणारे सात टक्क्यांचे प्रमाण तिपटीने उंचावून 2012 मध्ये 21 टक्क्यांवर पोहोचलेले होते. एकूणातून हे संकरित वाणाचे गोधन वगळले तर आपल्या ध्यानात येते ते असे की, 1992 ते 2012 या काळात देशी वाणाच्या गोधनाच्या संख्येत साधारणपणे 19 कोटींवरून जवळपास 15 कोटींपर्यंत घट झालेली आहे. म्हणजेच, 20 वर्षांच्या काळात देशी वाणाच्या गोधनामध्ये जवळपास 20 टक्क्यांनी घसरण घडून आलेली दिसते.

देशी वाणाच्या बैलांची संख्या घटल्याममुळेच ममुख्यत: एकूण देशी गोधनाच्या संख्येत ही घट झालेली आहे. देशी वाणाच्या बैलांची आपल्या देशातील एकूण संख्या 2003 मध्ये होती जवळपास 7 कोटी 75 लाख इतकी. सन 2007 पर्यंत या संख्येत अंमळ घट घडून आली व ती 7 कोटी 67 लाखांपर्यंत उतरली. मात्र 2007 ते 2012 या पाच वर्षांच्या काळात तीच संख्या झपाट्याने खालावून 6 कोटी 19 लाखांपर्यंत घसरली. सन 2003 ते 2012 या दशकभरादरम्यान देशी वाणाच्या बैलांची संख्या सुमारे 1 कोटी 56 लाखांनी घटली.

देशी वाणाच्या बैलांची संख्या घटण्यामागील कारण अतिशय सोपे व सरळ आहे. आपल्या देशात दर शेतकरी कुटुंबामागील सरासरी लागणी क्षेत्र काळाच्या ओघात सातत्याने आणि लक्षणीयरीत्या आकुंचन पावत आलेले दिसते. पदरी जमीन असणाऱ्या आपल्या देशातील एकूण शेतकऱ्यांपैकी, तीन-चतुर्थांशापेक्षा अधिक शेतकरी हे लहान आहेत. म्हणजे त्ङ्मांच्ङ्माकडे दोन हेक्टरपेक्षाही कमी जमीन आहे. (लहान शेतकऱ्यांचा विचार केला, तर या गटात धारणक्षेत्राचे सरासरी आकारमान अवघे 0.67 हेक्टर म्हणजे 1.78 एकर इतकेच भरते). परिणामी, एखादा बैलही पदरी बाळगणे बहुसंख्य लहान शेतकऱ्यांना जड जाते, मग बैलजोडी सांभाळण्याची तर बातच सोडा.

नांगरटीच्या कामासाठी हा शेतकरीवर्ग एक तर दुसऱ्या शेतकऱ्यांची बैलजोडी आणून आपल्या शेतात नांगर धरतो अथवा थेट ट्रॅक्टरच भाड्याने आणून आपले शेत नांगरून घेतो. मोठे शेतकरीदेखील जवळ बैलजोडी बाळगण्यापेक्षा ट्रॅक्टरलाच अधिक पसंती देताना दिसतात. शेतकरी त्यांचे बैल व्यापाऱ्यांना विकतात आणि पुढे व्यापारी त्याच बैलांची रवानगी खाटकांकडे करतात. गोवंशाबद्दल पूज्य भाव मनात बाळगणाऱ्या या हिंदुधर्मीय शेतकऱ्यांना त्यांच्या बैलांचे हे भागधेय ठाऊक असते, मात्र ते हतबल असतात. कारण, बैल पदरी बाळगल्याने अखेरीस बैल आणि आपले कुटुंब या दोहोंच्या भाळी उपासमारच लिहिलेली आहे, हे त्यांना पुरते उमगलेले असते.

देशी वाणाच्या बैलांची संख्या घटण्यास यापूर्वीच प्रारंभ झालेला आहे आणि आता देशी वाणाच्या गाईंची संख्यादेखील त्यांच्याच पावलावर पाऊल टाकताना दिसते. देशातील गाईंच्या संख्येमध्ये 2007 ते 2012 या पाच वर्षांच्या कालावधीदरम्यान वाढ घडून आल्याचे आकडेवारी सांगत नाही (किंबहुना, देशी वाणाच्या गाईंच्या संख्येत पहिल्यांदाच अंमळ घट झालेली दिसते). दुसरीकडे, एकंदर गोधनामध्ये संख्येने आणि प्रमाणाने वाढत्या राहिलेल्या संकरित वाणाच्या परदेशी गाईंनी दुधाचा पुरवठा वाढता राहण्याची तरतूद केलेली आहे. देशातील एकूण गोधनामध्ये संकरित गोधनाचे प्रमाण आजमितीला जवळपास एक-पंचममांशाहून अधिक आहे. देशी वाणाच्या गाई-बैलांच्या संख्येत भविष्यात हळूहळू घटच होत जाईल. किंबहुना, देशातील एकंदरच गोधनाच्या संख्येला येत्या काळात ओहोटी लागेल. ते स्वाभाविकच ठरते. कारण, दुधाची वाढती गरज संकरित वाणाच्या गाई आणि म्हशी पुरवत राहतील. त्याच वेळी, बैल ठेवणे परवडण्याजोगे नसल्याने बैलांच्या संख्येतही उतरती भाजणी दिसून येईल.

हे झाले देशपातळीवरील चित्र. मात्र, राज्या-राज्यांतील वास्तव यांपेक्षा निराळे दिसते. महाराष्ट्र, ओडिशा, गुजरात आणि तमिळनाडू या चार राज्यांतील गोधनाचे वास्तव आपण अधिक तपशिलाने इथून पुढे न्याहाळणार आहोत. या चारांपैकी महाराष्ट्रात गोवंशाच्या हत्येवर अलीकडेच राज्य सरकारने बंदी जारी केलेली आहे. ओडिशातील गोधनाच्या संख्येतील वाढीचा वार्षिक सरासरी वेग सुमारे अर्धशतकापूर्वी उभ्या देशात सर्वाधिक होता. गुजरातमधील गोधनात 25.2 टक्के अशी देशभरातील पाच राज्यांपैकी सर्वाधिक वाढ घडून आलेली आहे (राजस्थान, उत्तर प्रदेश, छत्तीसगड आणि आसाम या अन्य चार राज्यांचा क्रमांक गुजरातच्या खालोखाल या बाबतीत लागतो. या चार राज्यांतील गोधनामध्ये अनुक्रमे 9.94 टक्के, 3.57 टक्के, 3.41 टक्के आणि 2.65 टक्के अशी वाढ झाल्याचे दिसते), तर तमिळनाडूतील गोधनामध्ये देशभरात सर्वाधिक घट घडून आल्याचे संबंधित आकडेवारीवरून ध्यानात येते. महाराष्ट्रातील गोधन 2007 मध्ये जवळपास 1 कोटी 62 लाखांच्या घरात होते. सन 2012 पर्यंतच्या पाच वर्षांत गोधनाच्या एकंदर संख्येमध्ये सात लाखांनी घसरण होऊन ती संख्या 1 कोटी 55 लाखांपर्यंत खाली आलेली होती.

परंतु इथे नोंदविण्याजोगी बाब म्हणजे, संकरित वाणाचे परदेशी बैल आणि देशी वाणाच्या गाई-बैलांच्या संख्येतच मुख्यत: घट झालेली होती. तर दुसरीकडे, संकरित वाणाच्या गाईंची संख्या 6 लाख 30 हजारांनी वाढलेली दिसते. संकरित वाणाच्या गोधनामध्ये संकरित बैलांचे प्रमाण 2007 मध्ये जवळपास 17 टक्क्यांच्या आसपास होते, तेच प्रमाण 2012 दरम्यान तेच प्रमाण 12 टक्क्यांपर्यंत उतरलेले दिसते. जन्माच्या वेळी गोधनामध्ये कालवडी व गोऱ्हे यांचे प्रमाण मनुष्यमात्रांप्रमाणेच साधारणपणे सारखे असते, ही बाब या संदर्भात आवर्जून नोंदवून ठेवावयास हवी. असे असूनही संकरित वाणाच्या गोधनामध्ये संकरित बैलांचे प्रमाण तुलनेने खूपच कमी दिसते. संकरित वाणाचे बैल निरुपयोगी असतात, अशी भावना शेतकऱ्यांमध्ये वसत असल्याने त्यांची गच्छंती लवकरात लवकर करण्याकडे त्यांचा कल असतो. सन 2012 मधील आकडेवारीनुसार संकरित बैलांचे महाराष्ट्रातील एकंदर संकरित गोधनामधील प्रमाण होते अवघे एक-अष्टमांश इतके. परंतु याहीपेक्षा अधिक लक्षवेधी बाब म्हणजे, 2007 ते 2012 या काळात राज्यातील देशी बैलांच्या संख्येतही 76 लाख 30 हजारांवरून 67 लाख 80 हजारांपर्यंत घट घडून आलेली दिसते. ही घट जवळपास साडेआठ लाखांची भरते. परंतु याहीवरची कडी म्हणजे, याच पाच वर्षांच्या काळात महाराष्ट्रातील देशी गाईंच्या संख्येतही 54 लाख 30 हजारांवरून 50 लाख 53 हजारांपर्यंत घट झालेली होती. देशी वाणाच्या गाईंच्या संख्येत झालेल्या या घसरणीची भरपाई सुमारे सहा लाखांनी वाढलेल्या संकरित वाणाच्या गाईंनी केलेली दिसते. म्हणजेच,

या पाच वर्षांत 12 लाखांहून अधिक गोधनाची रवानगी कत्तलखान्यांकडे बहुश: केली गेली. आता, गोवंशाच्या हत्येवर महाराष्ट्र सरकारने पुरती बंदी जारी केल्याने, यापुढील काळात ते कोठे जाईल?

ओडिशातील परिस्थिती मात्र बऱ्यापैकी वेगळी आहे. गेल्या 50 वर्षांच्या कालखंडात राज्यातील गोधनातील वाढीमध्ये लक्षणीय बदल झाल्याचे लक्षात येते. ज्या ओडिशा राज्यात 1956 ते 1960 या काळात दर वर्षी सरासरी साडेचार टक्के दराने गोधन वाढत राहिले, त्याच ओडिशातील गोधनाच्या संख्येमध्ये 2007 ते 2012 या पाच वर्षांच्या काळात 5.6 टक्क्यांची घट घडून आली. म्हणजेच, दर वर्षी सरासरी एक टक्का दराने घसरण झाली. ही बाब स्वागतार्हच म्हणायला हवी. पण बस्स, तेवढेच!

संकरित गोधनाचे ओडिशातील एकूण गोधनामध्ये असणारे प्रमाण 2007 मध्ये 14 टक्के इतके होते, तेच प्रमाण 2012 मध्ये 11 टक्क्यांपर्यंत उतरलेले दिसते. त्यांतल्या त्यांत दिलासादायक बाब म्हणजे, संकरित गोधनातील या बदलात मुख्य वाटा होता तो संकरित बैलांच्या संख्येत 8लाख 80 हजारांवरून 3 लाख 20 हजारांपर्यंत घडून आलेल्या घसरणीचा आणि संकरित गाईच्या संख्येमध्ये झालेल्या वाढीचा. देशी बैलांच्या संख्येत मात्र ओडिशामध्ये नजरेत भरेल असा काहीही फरक पडलेला दिसत नाही. परंतु नोंद घ्यावी अशी रोचक बाब म्हणजे, याच काळात ओडिशातील देशी गाईच्या संख्येमध्ये 50 लाख 30 हजारांवरून 48 लाख 10 हजारांपर्यंत घट घडून आल्याचे ध्यानात येते. ज्या वेळी 2012 मध्ये पशुधनाचे सर्वेक्षण तिथे चालू होते, त्या वेळी दुभत्या गाईच्या संख्येतही घसरण झालेली दिसत होती. दुसरीकडे, संकरितवाणाच्या दुभत्या गाईच्या वाढलेल्या संख्येने देशी दुभत्या गाईच्या संख्येतील घसरणीची भरपाई केलेली दिसते. बस्स, याच्या पलीकडे काही नाही. मागे 1960 मध्ये ओडिशा राज्याच्या विधान मंडळाने एक कायदा मंजूर केला होता. 'गोवध बंदी कायदा, 1960' (1961 चा पाचवा कायदा) असे त्या कायद्याचे नाव होते. अर्थात, शारीरिक दृष्ट्या अपंग झालेल्या, रोगी आणि/किंवा 18 वर्षांपेक्षा अधिक वय असलेल्या गोधनाचा वध करण्यास कायद्यामध्ये वाव ठेवण्यात आला होता. मात्र, त्यासाठी सक्षम अधिकाऱ्याकडून तसे प्रमाणपत्र घेणे बंधनकारक होते. हा कायदा अस्तित्वात असल्यामुळेच असेल कदाचित, पण संकरित बैलांची हत्याही 2007 पर्यंत ओडिशामध्ये केली जात नसे.

ओडिशा, बिहार आणि पश्चिम बंगाल या राज्यांतून अलीकडील काही वर्षांत गोधनाची बेकायदा निर्यात बांगलादेशामध्ये व्यापक प्रमाणावर केली जाते. देशाच्या उत्तर तसेच पश्चिम भागातील काही राज्येही अशा निर्यातीमध्ये मागे नाहीत. बांगलादेशामध्ये दर वर्षी कत्तल केल्या जाणाऱ्या गोधनापैकी जवळपास दोन-तृतीयांश गोधन तिथे बाहेरून आयात केलेले असते. कातडी, शिंगे, चामडे आणि कातड्यापासून बनवलेल्या वस्तू बांगला- देशामधून मोठ्या प्रमाणावर निर्यात केल्या जातात. गोधनाच्या वाहतुकीबाबतही ओडिशामध्ये काही बंधने लागू केलेली आहेत. अनुत्पादक गोधनाची विल्हेवाट लावण्यावर शेतकऱ्यांना कायद्याने बंदी केल्याममुळे, अन्य कोणत्याही अधिक प्रगत राज्यातील गोधनाचे व त्यावर बेतलेल्या अर्थकारणाचे चित्र जसे दिसेल, तसेच आजच्या ओडिशाचे रंगरूप या बाबतीत दिसते.

देशातील अन्य राज्यांच्या तुलनेत गुजरातमधील परिस्थिती वेगळीच राहिलेली आहे. सन 2007 ते 2012 या पाच वर्षांच्या कालावधीदरम्यान गोधनाच्या संख्येमध्ये वाढ दर्शविणाऱ्या पाच राज्यांमध्ये गुजरातमधील गोधनात घडून आलेली 25.2 टक्क्यांची वाढ ही सर्वाधिक भरते. देशी तसेच संकरित अशा दोन्ही वाणांच्या गाईच्या संख्येत भर पडल्याने ही सगळीच्या सगळी वाढ वास्तवात उतरल्याचे संबंधित आकडेवारीवरून आपल्या ध्यानात येते. संकरित गोधनाचे गुजरातमधील एकंदर गोधनात असणारे प्रमाण 2007 मध्ये 14 टक्क्यांपेक्षा अंमळ

अधिक होते. तर, एकूण संकरित गोधनामध्ये संकरित बैलांचे असणारे प्रमाण 19 टक्क्यांपेक्षा कमी होते. या बाबतीत गुजरातचे चित्र ओडिशाच्या तुलनेत वेगळे दिसते. गुजरातमधील शेतकरी त्यांच्याकडील संकरित बैल काढून टाकतात, हेच यावरून सूचित होते. देशी बैलांच्या बाबतीतही हेच चित्र दिसते, मात्र त्याचे प्रमाण तुलनेने कमी आहे. एकंदर गोधनामध्ये बैलांचे प्रमाण भरते जवळपास 48.5 टक्क्यांच्या घरात. सन 2012 पर्यंत मात्र देशी तसेच संकरित बैलांच्या संख्येत चांगली 8.8 टक्क्यांची घट झाल्याचे दिसते. मात्र, देशी तसेच संकरित गाईच्या संख्येमध्ये याच काळात घसघशीत वाढ झालेली दिसते. देशी आणि संकरित वाणाच्या गाईच्या संख्येमध्ये 77 लाखांवरून 99 लाखांपर्यंत वाढ घडून आल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होते. संकरित गाईच्या संख्येमध्ये 9 लाख 30 हजारांवरून 17 लाख 30 हजारांपर्यंत वाढ घडून आल्याचे दिसत असतानाच दुसरीकडे, देशी गाईच्या संख्येमध्ये 35 लाखांवरून 50 लाखांपर्यंत वाढ झाल्याचे वास्तव पुढ्यात येते. गुजरातमधील हे चित्र अन्य अनेक राज्यांतील चित्रापेक्षा वेगळे दिसते. दुधाच्या उत्पादनाच्या बाबतीत देशातील एक अग्रेसर राज्य असा गुजरातचा लौकिक आहे. गीर हा देशी गाईचा एक दुधाळ वाण या प्रांतात पूर्वीपासूनच विपुल प्रमाणात आढळतो. परंतु, या चित्राचाच आणखी एक पैलू दुर्लक्षिण्याजोगा नाही. गाईच्या संख्येमध्ये भरीव वाढ घडून आलेली दिसत असली तरी, बैलांच्या संख्येत मात्र गुजरातमध्ये लक्षणीय अशी घट झालेली आहे. हे जे व जसे घडले, त्याला कोणत्याही प्रकारचा प्रतिबंध केला गेला असता तर काय घडले असते, याची केवळ कल्पना केली तरी पुरे.तमिळनाडूमधील वास्तव म्हणजे जणू आरसाच ठरावा. गोवधबंदीसारखे निर्बंध लागू केले गेले नाहीत, तर अन्य राज्यांत गोधनाच्याबाबतीत कसे चित्र दिसेल याची झलक आपल्याला तमिळनाडूमध्ये बघावयास मिळते. संकरित वाणाच्या परदेशी गोधनाचा प्रवेश अन्य राज्यांच्या तुलनेत तामिळनाडूमध्ये बराच आधी झालेला होता. संकरित वाणाचे राज्यातील एकंदर गोधनामध्ये असणारे प्रमाण 2007 पर्यंत जवळपास दोन-तृतीयांशांपर्यंत (66 टक्के) उंचावलेले होते. तर, त्यानंतरच्या केवळ पाचच वर्षांत, म्हणजे 2012 मध्ये हेच प्रमाण उंचावून पोहोचले होते 72 टक्क्यांवर. इथे आवर्जून नोंद घ्यावी अशी बाब म्हणजे, 2007 ते 2012 या काळात राज्यातील सर्वच प्रकारच्या गोधनामध्ये घट घडून आल्याचे संबंधित आकडेवारीवरून आपल्या ध्यानात येते. संकरित वाणाच्या गाई-बैलांच्या संख्येत या काळात 1 कोटी 12 लाखांवरून 88 लाखांपर्यंत घसरण घडून आली. टक्केवारीच्या भाषेत बोलायचे, तर ही घट भरते 21.2 टक्क्यांची. देशी गोधनाच्या बाबतीत घडून आलेली अशी संख्यात्मक घट अधिकच तीव्र होती. तमिळनाडूमधील देशी गोधन या काळात 35.4 टक्क्यांनी घटले. संख्यात्मक दृष्ट्या सर्वाधिक घट झालेली दिसते ती बैलांच्या संख्येमध्ये. तमिळनाडूमधील बैलांच्या संख्येमध्ये जवळपास 41 टक्क्यांनी घसरण झालेली दिसते; तर दुसरीकडे गाईच्या संख्येत मात्र तुलनेने कमी म्हणजे 14.8 टक्क्यांची घट झाल्याचे आकडेवारी सांगते. त्यातल्या त्यातही पुन्हा, तुलनेने मोठी घट घडून आली ती देशी गाईच्या संख्येत. तमिळनाडूतील देशी गाईची संख्या 2007 ते 2012 या पाच वर्षांच्या काळात तब्बल 30 टक्क्यांनी घसरली. गोवधबंदीसारखे निर्णय व्यवहारात लागू केले गेले नाहीत तर, येत्या दोन दशकभरांदरम्यान देशी गोधन तमिळनाडूमध्ये जवळपास नगण्यच बनावे.

ओडिशामधील शेतीचे व पशुपालनाचे विश्व नीट समजावून घ्यायला हवे. दर शेतकरी कुटुंबामागे असणारी अत्यल्प जमीनधारणा, बहुविध पीकपद्धतीचा अभाव, स्वल्प सिंचन, नागरीकरणाची कमी असणारी पातळी आणि शेतीवर असणारे सघन अवलंबन... अशी सगळी परिस्थिती असल्याममुळे जेमतेम घरच्यापुरतेच पिकवणाऱ्या बहुसंख्य शेतकरीवर्गाच्या लेखी गोधन तसे ङ्कारसे महत्त्वाचे ठरत नाही. त्यांतच, भरीस भर म्हणून की काय, ओडिशामध्ये गोवंशबंदीचा अंमल व्यवहारात जारी करण्यात

आलेला आहे. असे असूनही बांगलादेशामध्ये केल्या जाणाऱ्या गोधनाच्या बेकायदेशीर निर्यातीममुळे परिस्थिती अधिक खालावलेली नाही. (आताशा, भारतामधून बांगला- देशामध्ये केल्या जाणाऱ्या गोधनाच्या चोरट्या निर्यातीस आळा घालण्याच्या दृष्टीने भारत व बांगला- देशादरम्यानच्या सीमावर्ती प्रदेशात भारतीय सैन्यदलांनी पावले उचलल्याममुळे निर्यातीमध्ये बव्हंशी घट झाल्याचे अनुभवास येते. परिणामी, बांगलादेशातील बाजारपेठमधील गोधनाच्या किमतींमध्ये एकदम तेजी आलेली दिसते. तसेच तिथून केली जाणारी गोधनजन्य जिनसांची निर्यातही रोडावलेली आहे). या चित्राशी पूर्णपणे विसंगत असे चित्र तमिळनाडूमध्ये दिसते. अतिशय वेगाने होणारे नागरीकरण, विकसित असे सघन सिंचनाचे जाळे आणि रोजगारासाठी शेतीवर असलेल्या अवलंबनामध्ये वेगाने होणारी घसरण, हे तमिळनाडूमधील वास्तव होय. परिणामी, अधिक दुधाळ असणारे संकरित वाणाचे गोधन हाच इथून पुढच्या काळात तमिळनाडूतील दुग्धोत्पादनाचा कणा बनेल, असे चित्र आता तिथे हळूहळू उभारताना दिसते.

चांगल्यापैकी दुधाळ अशा देशी गाईबाबतीत गुजरातमध्ये बऱ्यापैकी आशादायक परिस्थिती दृष्टीस पडते. असे असूनही, संकरित गोधनाचे एकंदर गोधनामधील प्रमाण सतत वाढतानाच दिसते. भविष्यातही हाच कल दिसावा. देशी वाणाच्या गोधनाचे महत्त्व उतरणीस लागण्यास अधिक काळ जावा लागेल, अशी चिन्हे दिसतात. बैलांच्या हत्येवर बंदी घातली गेली, तर देशी तसेच विदेशी गाईच्या संख्येत आणि पर्यायाने दुधाच्या उत्पादनामध्ये वाढ घडून येणे दुष्करच भासते.

गोधनातील बदलांचे देशपातळीवर जे सरासरी चित्र दिसते, त्याचेच प्रतिबिंब महाराष्ट्रामध्ये पडलेले आहे. सद्य:स्थितीला बाधा उत्पन्न करणारी काही परिस्थिती उद्भवली नाही, तर भविष्यात महाराष्ट्राची वाटचाल गोधनाच्याबाबतीत तमिळनाडूच्या दिशेने व्हावी. परंतु सध्याप्रमाणे सर्व प्रकारच्या गोधनाच्या हत्येस आणि गोमांसाच्या विक्रीवर बंदी कायम राहिली, तर मात्र महाराष्ट्राचे चित्र क्रमाने ओडिशातील चित्राप्रमाणे दिसू लागेल. किंबहुना, ओडिशापेक्षाही महाराष्ट्रातील वास्तव अधिक भीषण बनेल, असे वाटल्यावाचून राहत नाही. गाई-बैलांच्या विक्रीस संपूर्ण पाबंदीच असेल, तर शेतकरी करतील तरी काय? निरुपयोगी, भाकड बनल्याने त्यांचे पालन-संगोपन परवडेल? शेतकऱ्यांना अशक्य बनलेले सारे गोधन चाराछावण्यांमधून सांभाळणे सरकारला शक्य होणार आहे काय? हत्येवर बंदी जारी राहिल्याने अशा गोधनाची संख्या येत्या काळात वृद्धींगतच राहील. दुष्काळी परिस्थिती उद्भवल्यानंतर त्या मानाने मर्यादित मात्रेने असणारे गोधन चाराछावण्यांद्वारे तगवून धरतानाच आजमितीस सरकारची होत असलेली धावपळ आपण सगळे बघत असतोच. सांभाळ अशक्य बनल्याने शेतकऱ्यांनी सोडून दिलेले असे गोधन उद्या केवळ खेडोपाडीच नव्हे तर शहरोशहरीही ममोकाट भटकायला लागल्याने शेतीबरोबरच एकंदर नागरी जीवनाच्याच सुरक्षाव्यवस्थेपुढे केवढे बिकट आव्हान उभे राहील, याची कल्पना तरी आपल्यापैकी कोणाला आहे काय?

देशी वाणाच्या दुभत्या गोधनाची आपल्या देशातील संख्या इथून पुढच्या काळात वाढती राहण्याची चिन्हे एकंदरीने अवघडच भासतात. गुजरातमधील गीर आणि आंध्र प्रदेशातील अंगोल वाणाच्या गोधनाची आयात बऱ्याच वर्षांपूर्वी ब्राझीलने केली होती. गीर आणि अंगोलिया दोन वाणांची चांगली गुणवान जनावरे वेगळी निवडून त्यांच्या पद्धतशीरपणे केलेल्या वंशवृद्धीद्वारे अशी गीर वाणाच्या गाईची प्रजाती आणि उच्च दर्जाचे गोमांस देणाऱ्या अंगोल वाणाची निपज ब्राझीलने मोठ्या परिश्रमपूर्वक साध्य केलेली आहे. या दोन्ही जिनसांची निर्यातही ब्राझीलमधून केली जाते. परंतु आपल्या देशातील स्थानिक गोधनाची गुणवत्ता उंचावण्याच्या दृष्टीने आजवर आपण कोणतेही प्रयत्न केलेले नाहीत. काही देशी वाणांच्या बाबतीत अगदी अलीकडे काही प्रयोग सुरू झाल्याचे दिसते. मात्र गोवंशहत्याबंदीसारखी पावले उचलली जाण्याने अशा प्रयोगांची मृत्युघंटा घणघणायला लागेल, असे

म्हणण्यावाचून पर्याय नाही. परिणामी, आपल्या देशातील देशी तसेच संकरित गोधन यथावकाश लयाला जाईल.

गोवंशाच्या हत्येवरील बंदीच्या मागे असणारी कारणमीममांसा सर्वविदित आहे. 'पवित्र गोधना'ला भेडसावणाऱ्या (हत्येच्या) संभाव्य अरिष्टाबाबत देशभरातील हिंदुधर्मीयांपैकी एक ममोठा गट सततच सqचत राहत आलेला दिसतो. गोवधबंदीच्या तरतुदीचा समावेश घटनेमध्ये केला जावा, असा आग्रह काँग्रेससह अन्य पक्षांतील खासदारांच्या एका प्रभावी गटाने घटना समितीमध्ये सातत्याने लावून धरला होता तो त्यामुळेच. परंतु या गटाच्या मागणीला होणारा विरोधही तेव्हा तितकाच तीव्र व ताकदवान होता. परिणामी, गोहत्येला बंदी घालण्याबाबतची तरतूद घटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये अंतर्भूत केली जाण्याचा मध्यममार्ग तडजोडीखातर मग स्वीकारला गेला. मूलभूत हक्कांच्या धर्तीवर घटनेतील मार्गदर्शक तत्त्वे ही बंधनकारक असत नाहीत, ही बाब या संदर्भात अधोरेखित करावयास हवी.

गोहत्येस प्रतिबंध करणारा कायदा अस्तित्वात आणला जावा, यासाठी राजकीय नेतृत्त्वाच्या एका गटाने तसेच हिंदू धर्माच्या समर्थकांनी स्वातंत्र्यानंतर या तरतुदीचा आधार घेत, दबाव निर्माण करण्यास सुरुवात केली. या मागणीचा पाठपुरावा करण्यासाठी पुरीतील गोवर्धन मठाच्या शंकराचार्यांनी 1966 च्या नोव्हेंबर महिन्यात उपोषणही (सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंतचेच?) आरंभले. हिंदुत्व विचाराची पाठराखण करणाऱ्या राजकीय पक्षाची सत्ता आता केंद्रासह देशातील काही राज्यांमध्ये आल्यानंतर आज 50 वर्षांनी त्याच मागणीचे पुनरुज्जीवन पुन्हा एकवार केले जाताना दिसते आहे. गोवंशहत्येवरील निर्बंध आणि गोमांसाची साठवणूक व व्यापार यांवर महाराष्ट्र सरकारने अलीकडे जारी केलेली बंदी हा सगळा त्याचाच परिपाक होय.

गाय हा हिंदुधर्मीयांच्या लेखी पूज्य पशू होय. हिंदू लोक तिला गोमाता मानून तिची आराधना करतात आणि गाईचे दूध, शेण, गोमूत्र यांसारखे जिन्नस धार्मिक कृत्यांमध्ये वापरले जात असल्याने गोहत्याबंदी जारी करण्यात यावी, ही पूर्वापार चालत आलेली कारणमीममांसाच आता नव्याने केल्या जात असलेल्या मागणीच्या मुळाशी आहे. हिंदू पुराणांमध्ये निर्देश असलेले 33 कोटी देव गाईच्या शरीरात वस्तीस असतात, अशी हिंदुधर्मीयांची धारणा आहे. गाईच्या शरीरात हे 33 कोटी देव कसे आणि किती दाटीवाटीने सामावलेले असले पाहिजेत, यांबाबत विनायक दामोदर सावरकर यांनी केलेली ममोठी मार्मिक टिप्पणी या संदर्भात वाचण्याजोगी आहे- *'विष्णू, ब्रह्मा, शंख, चंद्र, सूर्य, सोम, यम प्रभृती झाडून साऱ्या देवांची तिच्या शरीरात एकच दाटी झालेली. कोणी डोळ्यांत, कोणी दातांवर, ज्याला जिथे साधले तिथे तो लगटला. पाठीच्या कण्यात तर, मधल्या सुटीत शाळेतील उनाड पोरे एखाद्या बाकावर गमतीने करतात तशी, देवांच्या दाटीची इतकी रेटारेटी चाललेली आहे की, वाळत घातलेले स्वत:चे गहू खाताना त्या गाईला पाहून गोभक्तदेखील जेव्हा एखादे लाकूड तिच्या पाठीत घालतो तेव्हा दहा-पाच तरी लंबे झाल्यावाचून राहूच नयेत! वर ही गर्दी झालेली पाहून कुल पर्वत खालूनच तिच्या पायांत घुसले. नाग पुच्छात, महर्षी केसाकेसांच्या भोकात! 'पुच्छे नागा: खुराग्रेषु ये चाष्टौ कुलपर्वता:। मध्ये देवगणा: सर्वे लोमकूपे महर्षय:'! पण सगळ्यांत अत्यंत केविलवाणी दशा झाली त्या बिचाऱ्या मरुताची नि वरुणाची!* *Bone for the latecomers* *या न्यायाने उरलेल्या ज्या दोन जागीच शक्य त्या समाधानात राहण्याची वेळ आली त्यांजवर. त्या दोन जागा म्हणजे 'अपाने तु मरुद्देवो योनौच वरुण: स्थित:'! आणि मूत्रे गंगा'!!!''* (गाय- एक पशू देवता तर नव्हेच नव्हे! : सावरकरांचे सामाजिक विचार, संकलन- प्रा.विद्याधर पुंडलिक, मॅजेस्टिक प्रकाशन, जानेवारी 1973).

अंतिमत:, पवित्र अशा गोमातेचे दर्शन खेडोपाडी दुर्लभ व दुर्मिळ होण्यामध्ये या सगळ्याची परिणती संभवते. येत्या काळात तोच धोका दिसतो. गोभक्तांना आराधना करता यावी व गोमय मिळावे केवळ

याचसाठी देवळांमधून गाईचा सांभाळ पुढच्या काळात केला गेला, तर त्याचे आश्चर्य वाटावयास नको. प्राचीन काळातील ज्यूधर्मीय लोक गाईची सोन्याची मूर्ती निर्माण करून तिची उपासना करत असत. तसेच काही तरी आपल्या देशातही संभवते. देशी वाणाच्या गोधनाची गुणवत्ता लक्षणीयरीत्या उंचावण्याबाबत त्वरेने काही पावले उचलली गेली नाहीत, तर यापेक्षा निराळे चित्र दिसण्याची आशाच नको. देशी गोधनाची गुणवत्ता उंचावण्यासाठी जरी भले पावले एकीकडे उचलली गेली तरी दुसरीकडे गोवंशहत्याबंदी जारी राहिली, तर सगळ्यांवरच पाणी पडेल. मग दस्तुरखुद्द देवाधिदेवही पवित्र अशा गोमातेचे रक्षण करू शकणार नाही!

(टीपः गोधनासंदर्भातील या लेखात नमूद करण्यात आलेली सर्व आकडेवारी 2007 व 2012 या दोन वर्षी देशभरात घेण्यात आलेल्या अनुक्रमे 18 व्या व 19 व्या पुधन गणनेद्वारे उपलब्ध झालेल्या माहितीमधून घेतलेली आहे, तर देशभरातील लहान शेतकऱ्यांच्या सरासरी जमीनधारणेबाबतची सांख्यिकी अगदी अलीकडील वर्षासाठी उपलब्ध असलेल्या कृषिगणनेमधून घेतलेली आहे. भारतामधून बांगलादेशामध्ये केल्या जाणाऱ्या गोधनाच्या चोरटा व्यापारासंदर्भातील तपशील तारीख 4 जून 2015 रोजीच्या दैनिक हिंदू'मध्ये प्रकाशित झालेल्या मजकुरावर बेतलेला आहे.

सर्वश्री चंदा निंबकर, शरदिनी रथ, तपन मिश्र आणि सत्यजित रथ यांनी प्रस्तुत लेख वाचून त्याबाबत काही सूचना केल्या, त्यांबद्दल त्यांचे आभार).

(अनुवाद : अभय टिळक)

'साप्ताहिक साधना' (11 जुलै 2015) च्या सौजन्याने

nrath66@yahoo.co.in
agtilak@gmail.com

•••